CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २३ जुलै २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २३५ | पाने १२ | किंमत रु. ८/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# 'सर्वत्र चांगला पाऊस पडू दे, शेतकरी सुखी राहू दे' : मुख्यमंत्री





### श्री संत तुकाराम महाराज व श्री ज्ञानेश्वर महाराज पादुकांचे फडणवीसांनी घेतले दर्शन

### वारकऱ्यांसाठी उपलब्ध केलेल्या सुविधामुळे पालकमंत्री व जिल्हा प्रशासनाच्या कामाचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जुलै -**

'राज्यात सर्वत्र चांगला पाऊस पडू दे, सर्वांना सुखी ठेव,‌ असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दसूर पाटी येथे जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुकांचे दर्शन घेताना घातले. त्यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी रथाचे काही वेळ सारथ्यही केले.

वारीत चालणारे सर्व वारकरी हे माऊलीचे जिवंत स्वरूप असल्याने वारीत चालण्याचा आनंद व्यक्त करतांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, माऊलीकडे एकच मागणं आहे ते म्हणजे सर्वत्र पाऊस चांगला पडू दे व शेतकरी बांधवांना सुखी समाधानी राहू दे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वात मागील दोन वर्षांपासून पालखीचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा शासन उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे यावर्षीच्या वारीला प्रचंड मोठ्या प्रमाणात भाविक येत असून मागील सर्व वाऱ्यांचा संख्यात्मक विक्रम तुटेल. जिल्हा प्रशासनाकडून वारीमध्ये उत्तम सुविधा करण्यात आल्या आहेत. एआय तंत्रज्ञानाचा वापर करून भाविकांची संख्या ही मोजली जात आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी वारकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी चांगले काम केले आहेत. वारीत स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून त्याप्रमाणे स्वच्छता झाली आहे. शौचालये, सफाई कर्मचारी, पुरेसा पाणीपुरवठा, पिण्याचे पाणी, जर्मन हँगर, चरण सेवा उपक्रम, आरोग्य पथके आदींच्या माध्यमातून सुविधा देण्यात येत आहेत, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पादुकांचे दर्शन घेण्याचा योग आला हे माझे मोठे भाग्य आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. प्रारंभी पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आषाढी वारी २०२६ च्या अनुषंगाने मुख्यमंत्री महोदयांना सविस्तर माहिती दिली.यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार अभिजीत पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते आदी उपस्थित होते.



पंढरपूर : संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व त्यांचे धाकटे बंधू श्री सोपानकाका यांचे पालखी सोहळे बुधवारी भंडीशेगाव येथे एकत्र आले. हा बंधूभेटीच्या सोहळ्याप्रसंगी वारकऱ्यांची अलोट गर्दी दिसून आली.

# पुणे जिल्ह्यातील धरणांत वाढतोय पाणीसाठा; उजनी धरण भरण्याच्या आशा

**पुणे, २२ जुलै**

पुणे शहरासह संपूर्ण जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला असून, पुणे घाट परिसराला आज पावसाचा 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला होता. अरबी समुद्र आणि पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या हवामान प्रणालीमुळे महाराष्ट्रात पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार पावसाचा अंदाज पुणे हवामान विभागाने वर्तवला आहे.सतत सुरू असलेल्या पावसामुळे खडकवासला धरण सकाळपर्यंत ७९.११ टक्के क्षमतेने भरले असल्याने धरणातून मुठा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू केला. पाणलोट क्षेत्रांत पावसाची अधूनमधून रिपरिप

| | |
|---|---|
| खडकवासला | ७९.११ टक्के |
| पानशेत | ७४.६१ टक्के |
| वरसगाव | ६८.५८ टक्के |
| टेमघर | ५३.१२टक्के |

सुरूच असल्याने खबरदारीचा उपाय व संभाव्य पावसाची शक्यता गृहीत धरून बुधवारी चासकमान धरणाचे पाचही दरवाजे प्रत्येकी २० सेंटीमीटरने उचलून धरणाच्या सांडव्याद्वारे ३५०० क्युसेक वेगाने भीमा नदीपात्रात विसर्ग सोडण्यात आला आहे. धरणाच्या डावा कालव्याद्वारे नियंत्रित पद्धतीने खडकवासला धरणातून १.५१ टीएमसी पाणीसाठ्याचा विसर्ग करण्यात आला.येत्या आठवड्यात पुणे शहरासह जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. धरणांमधील वाढता साठा लक्षात घेता महापालिकेने २२ जुलैपर्यंत पुण्यातील पाणीकपात रद्द केली आहे. ३०० क्युसेकने विसर्ग करण्यात आला आहे. एकूण चासकमान धरणातून ३८०० क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला.चासकमान धरणाच्या पाणलोट क्षेत्रांत पडत असलेल्या पावसाने ८.५४ टीएमसी क्षमता असलेले चासकमान धरण ९५.६४ टक्के म्हणजेच एकूण ८.१७ टी एमसी भरले. धरणात उपयुक्त जलसाठा ७.२२ टीएमसी आहे.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### शिंदे परिवाराकडून वारकऱ्यांना फराळ व औषधांचे वाटप

**करकंब, दि. २२ जुलै-**

करकंब येथील नाथ मंदिर परिसरात विविध दिंड्यांचे आगमन होत आहे. त्या दिंड्यातील वारकऱ्यांचे आरोग्य निरोगी रहावे व त्यांना प्रवासाचा थकवा जाणवू नये या निरपेक्ष भावनेतून करकंब येथील प्रतिक्षा शिंदे व शिंदे परिवाराच्या वतीने सकस व पौष्टिक असा फराळ तसेच प्रवासामध्ये उपयोगी पडतील अशा औषध साहित्यांचेही वाटप करण्यात आले. वारकऱ्यांची सेवा हीच ईश्वर सेवा मानत शिंदे परिवाराने वारकऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या घराण्याला लाभलेल्या वारकरी परंपरेच्या संस्कारातूनच वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य लाभत असल्याची भावना प्रतिक्षा शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली.





### सांगोला विद्यामंदिरमध्ये बापूसाहेब झपके यांची जयंती साजरी

**सांगोला, दि.२२ जुलै-**

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांची १०४ वी जयंती सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजमध्ये साजरी करण्यात आली. संस्थेचे कार्यकारिणी सदस्य विश्वेश झपके यांच्या हस्ते कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, प्रशालेचे प्राचार्य चारुदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक उत्तम सरगर, काकासो नरूटे, शुभांगी घोंगडे उपस्थित होते.



### कुचन प्रशालेत अजित पवार यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि.२२ जुलै-**

कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण येथे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त पद्मशाली शिक्षण संस्थेचे विश्वस्त व शालेय समितीचे अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली यांच्या हस्ते अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु प्रणिता सामल मल्लिकार्जुन जोकारे उपस्थित होते.

### बार्शीत सोनम वांगचूकांच्या समर्थनार्थ आंदोलन व दडपशाहीचा निषेध

**बार्शी, दि. २२ जुलै-**

दिल्ली येथे सुरु असलेल्या सोनम वांगचूक व कॉक्रोच जनता पार्टीच्या अभिजीत दिपके यांच्या आंदोलनाला वंचित बहुजन आघाडीच्यावतीने पाठिंबा देऊन सरकारच्या दडपशाहीचा निषेध करण्यात आला. यावेळी वंचित आघाडीचे ॲड. विवेक गजशिव यांनी दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा देऊन, सोनम वांगचूक यांचे शांततापूर्ण आंदोलन दिल्ली पोलिसांनी भाजप सरकारच्या सांगण्यावरुन चिरडले असल्याचे सांगून अभिजीत दिपकेला केलेल्या मारहाणीचा निषेध केला. तसेच २० जुलैच्या जंतरमंतरवरील आंदोलनाला पाठिंबा देऊन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. यावेळी धनंजय जगदाळे, वसीम पठाण, महेश चव्हाण, तानाजी बोकेफोडे, सचिन पालके, ॲड. हर्षवर्धन बोधले, बाळासाहेब कदम, मोहन कसबे, प्रवीण आखाडे, शरद बनसोडे यांनी मनोगत व्यक्त करुन नायब तहसीलदार बदे यांच्याकडे दिल्लीतील आंदोलनास पाठिंबा देऊन सरकारचा निषेध करीत असलेबाबतचे निवेदन दिले. यावेळी रेखा सरवदे, अंजली धांडोरे, तुषार बोकेफोडे, स्वप्नील लंकेश्वर, शहर उपाध्यक्ष किरण भालशंकर, युन्नूस शेख, ॲड. मिलिंद बनसोडे, पांडा समींदर, भैय्या उबाळे, उत्तम चौधरी, बाबासाहेब खडसरे, अक्षय गायकवाड, राजेंद्र कदम, किशोर ढोले, सचिन ननवरे, अतिश बनसोडे, दिनेश दंदाडे, प्रशांत जाधव, दत्ता काकडे, ईश्वर पाचकूडवे उपस्थित होते.



### हनुमान वाचनालयात अजित पवार यांची जयंती

**सांगोला, दि. २२ जुलै-**

उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांची जयंती श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय, वासुद (ता.सांगोला) येथे साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण उपाध्यक्ष मोहन साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संचालक नारायण भोरे, नानासाहेब केदार उपस्थित होते. शिक्षक किरण पोरे यांनी मनोगतातून अजितदादा पवार यांचा जीवन पट कथन करून त्यांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. आभार संतोष मोरे यांनी मानले.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर एकजुटीने लढा उभारण्याचा निर्धार

**राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाच्या बैठकीत विविध ठराव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाच्या वतीने आयोजित बैठक व चर्चासत्राचा कार्यक्रम जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालय, वाई (जि. सातारा) येथे पार पडला. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, संघटनेची आगामी भूमिका, शासनस्तरीय पाठपुरावा तसेच संघटना अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा करून एकजुटीने लढण्याचा निर्धार करण्यात आला.

महासंघाचे तत्कालीन अध्यक्ष विजय निकम व सरचिटणीस डॉ. आर. सिंग यांना अभिवादन करून सभेत सुरुवात झाली. प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे, महासंघाचे अध्यक्ष गोपीचंद पाटील, कार्याध्यक्ष डी. एम. बारस्कर, सरचिटणीस माधव राऊळ यांच्या प्रमुख उपस्थितीत अमरावती, कोकण, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, मुंबई, जळगाव आदी विभागांतून आलेल्या प्रतिनिधींचा या वेळी सत्कार करण्यात आला. महिला संघटक सोनाली लब्दे, आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त प्रशांत देशमुख आणि पी.एच.डी. प्राप्त डॉ. अंकुश शेलार यांचा विशेष गौरव करण्यात आला. सातारा जिल्हाध्यक्ष डी. आर. जाधव यांनी प्रास्ताविक केले. महाविद्यालायाचे कार्यालयीन अधीक्षक बाळासाहेब टेमकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून दिला. सूत्रसंचालन राहुल तायडे यांनी केले. पी. एम. डेरे यांनी आभार मानले.



**राज्यातील महाविद्यालयात २९०० रिक्त पदाची भरती होणार : माधव राऊळ**

महासंघाचे सरचिटणीस माधव राऊळ यांनी विविध प्रलंबित प्रश्नांबाबत महासंघाने केलेल्या पाठपुराव्याची माहिती दिली. यामध्ये राज्यातील अनुदानित महाविद्यालयात सुमारे २,९०० रिक्त पदांची भरती लवकरच होणार असल्याचे सांगितले. १२-२४ आश्वासित प्रगति योजना, सातवा वेतन आयोगानुसार अर्जित रजा रोखीकरण, वेतनवाढ व जुनी पेन्शन योजना पात्रतेनुसार न्याय नियुक्ती हे सर्व प्रश्न न्यायालयीन व शासनस्तरावर टप्प्याटप्प्याने मार्गी लागतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणव्यवस्थेसमोरील आव्हानांवरही त्यांनी भाष्य केले.

**कार्याध्यक्षपदी चंद्रकांत धनवडे**

या बैठकीत संघटनेच्या बळकटीकरणासाठी नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी बिनविरोध झाल्या. त्या अश्या : पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष: चंद्रकांत धनवडे, उपाध्यक्ष: दिलीप जाधव, मुंबई सचिव: सुदर्शन आंग्रे, कोल्हापूर सचिव रवींद्र भोसले. सदस्य : सिद्धेश्वर स्वामी (सांगोला), बरकत मुलानी (विटा), प्रशांत गायकवाड (कुंडल).

**प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे महत्त्व**

प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे यांनी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हे शैक्षणिक व्यवस्थेचे समान महत्त्वाचे घटक असल्याने कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्यांना न्याय मिळावा, अशा शुभेच्छा दिल्या.

**सामूहिक प्रयत्नांची गरज**

महासंघाचे अध्यक्ष गोपीचंद पाटील यांनी मार्गदर्शन करताना २०१९ नंतर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती न झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली. महासंघ सातत्याने संघर्ष करत असून कर्मचाऱ्यांनी संघटित व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. महासंघाचे कार्याध्यक्ष डी. एम. बारस्कर यांनी संघटना अधिक सक्षम करण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले.

## रूई येथे मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २२ जुलै-**

माढा तालुक्यातील रूई येथे जुन्या वादाच्या कारणावरून एका मजुराला मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी टेंभुर्णी पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी हणुमंत नागनाथ माने (वय ३१, व्यवसाय-मजुरी, रा. रूई, ता. माढा, जि. सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना सोमवार, २१ जुलै रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या घराजवळ घडली. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, 'तुझी भावजय आमच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी का गेली?' असा जाब विचारत आरोपींनी वाद घातला. त्यानंतर आरोपी मुन्या बाळू मुलाणी, बाळू मुलाणी आणि निखील विठ्ठल जाधव यांनी शिवीगाळ व दमदाटी करत हाताने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी जमिनीवर पडले. यावेळी फिर्यादीने 'मला मारू नका' अशी विनंती केली असता, आरोपी सोयल बाळू मुलाणी याने हातातील लाकडी काठीने फिर्यादीच्या तोंडावर, डोळ्याजवळ आणि पाठीवर वार करून जखमी केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५१४/२०२६ नोंद करण्यात आला असून आरोपी सोयल बाळू मुलाणी, मुन्या बाळू मुलाणी, बाळू मुलाणी आणि निखील विठ्ठल जाधव (सर्व रा. रूई, ता. माढा, जि. सोलापूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याची नोंद २१ जुलै रोजी सायंकाळी ७.४२ वाजता करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास श्रेणी पोलीस उपनिरीक्षक भीमराव गोळे करीत आहेत.

# अवैध जुगार, दारु विक्री प्रकरणी ८ जणांवर गुन्हे दाखल

**सुमारे ४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ जुलै-**

पोलिस ठाणे हद्दीतील अवैध धंद्यांचे समूळ नष्टीकरण व्हावे याकरिता बार्शी तालुका पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी अक्षय सोनवणे यांनी अवैध धंदे करणाऱ्यांवर मोहीम हाती घेतली असून एकाच दिवसात अवैध क्लब पत्ते जुगार खेळणाऱ्या इसमांवर आणि अवैध दारु विक्री करणाऱ्यांवर धडक कारवाई करुन तब्बल ३ लाख ६८ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.

बार्शी तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २२९/२६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२अ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपींची नावे याप्रमाणे-जावेद दिलावर शेख, सिद्धेश्वर पांडुरंग आगलावे, संभाजी हनुमंत आगलावे, शंकर विलास ननवरे, धनाजी साहेबराव आगलावे, गणेश चंद्रकांत आगलावे, भाऊ जगन्नाथ आगलावे, सर्व रा. बावी, ता. बार्शी अवैध दारु विक्री अनुषंगाने बार्शी तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २३०/ २६ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ ई प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपीचे नाव याप्रमाणे- चंद्रकांत बलभीम पिंगळे, रा. बार्शी. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण श्री. अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली खालील पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी केलेली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे, सदाशिव गवळी, अमित घाडगे, सोमनाथ खांडेकर, अमृत खेडकर, संदीप निचळ, सिद्धेश्वर लोंढे, युवराज गायकवाड, शिवशंकर खराडे, सागर वाकळे, अश्विनी साबळे, प्रीती आगलावे.




# मल्लिकार्जुन मंदिराच्या बांधकामाला वेग

**महाद्वाराचे पूजन; जानेवारीअखेर काम पूर्ण होण्याची शक्यता**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ जुलै-**

येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिराच्या बांधकामाला आता वेग आला असून महाद्वार पूजन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते विधिवत पार पडले. बसस्थानकाजवळ उभारण्यात येत असलेले हे भव्य मंदिर ७० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम जानेवारीअखेर पूर्ण होईल, अशी माहिती संबंधितांनी दिली.

धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या या प्रकल्पामुळे अक्कलकोटच्या वैभवात आणखी भर पडणार आहे. अक्कलकोट विधानसभा क्षेत्रात धार्मिक पर्यटन दिवसेंदिवस वाढत असताना येणाऱ्या भाविकांसाठी अधिकाधिक सुविधा निर्माण करण्याची गरज निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन आमदार कल्याणशेट्टी यांनी २०२३-२४ च्या पर्यटन विकास विभागाच्या निधीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन मल्लिकार्जुन मंदिरासाठी चार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून सध्या बांधकाम प्रगतिपथावर आहे.

याशिवाय इलेक्ट्रिक कामासाठी स्वतंत्रपणे ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यावर एकूण ७ ते ८ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यावेळी ट्रस्टीचे अध्यक्ष शिवलिंग स्वामी, स्वामीनाथ हिप्परगी, प्रशांत लोकापुरे, विजयकुमार कापसे, राजशेखर नागुरे, आप्पासाहेब पाटील, अपर्णा सिद्धे, सिद्धाराम शिवमूर्ती, सुनील सिद्धे,विजयकुमार लिंबीतोटे, बसवराज माशाळे, कांतू धनशेट्टी, रमेश कापसे, सुनील गोरे, देवीदास कवटगी, दयानंद रोडगे, निखिल पाटील, दिनेश पटेल, गजानन पाटील, ओंकार कोरे अविनाश मडिखांबे, नागराज कुंभार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## घटस्फोटाचा खटला पत्नीच्या इच्छेनुसार तिचे गावाच्या न्यायालयात वर्ग करता येणार नाही

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

अहिल्यानगर येथे राहणाऱ्या पत्नीने पुणे येथील न्यायालयात तिच्या पतीने दाखल केलेले घटस्फोटाचे प्रकरण अहिल्यानगर न्यायालयात वर्ग करण्याकरिता दाखल केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळली आहे.

अहिल्यानगर येथून पुणे न्यायालयात जाणे-येणे दुबळ्या आर्थिक परिस्थितीमुळे व इतर कारणास्तव शक्य नसल्यामुळे पतीने पुणे न्यायालयात दाखल केलेले घटस्फोटाचे प्रकरण अहिल्यानगर येथील न्यायालयात वर्ग करण्याकरिता पत्नीने उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्यावेळी युक्तिवादात पत्नीच्या वकिलांनी पत्नीच्या दुबळ्या आर्थिक परिस्थिती बरोबरच त्यांच्यातील अन्य प्रकरणे देखील अहिल्यानगर न्यायालयातच प्रलंबित असल्यामुळे पुणे न्यायालयातील घटस्फोटाचे प्रकरणही अहिल्यानगर न्यायालयात वर्ग करण्याची न्यायालयास विनंती केली. त्यावेळी त्यास पतीचे वकील सोलापूर येथील ॲड. अथर्व अंदोरे यांनी सक्त विरोध करीत पतीने त्याच्या सोयीनुसार पुणे न्यायालयात घटस्फोटाचे प्रकरण कायदेशीरपणे दाखल केले असून केवळ पत्नीच्या इच्छेनुसार घटस्फोटाचा खटला तिचे माहेरच्या गावचे न्यायालयात वर्ग करणे न्याय्य नसून पतीची सोय देखील तितकीच महत्वाची आहे. त्याचप्रमाणे पतीला त्रास देऊन त्याचे आर्थिक नुकसान होण्यासाठी पत्नीने ही याचिका दाखल केलेली आहे, असा युक्तिवाद केला. ॲड.अथर्व अंदोरे याचा युक्तिवाद मान्य करीत न्यायमूर्तिंनी पत्नीची याचिका फेटाळली. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिकेतील पतितर्फे ॲड.अथर्व अंदोरे, ॲड. मनिषा दळवे यांनी तर पत्नीतर्फे ॲड.सुवर्णा झावरे यांनी काम पाहिले.



# शंकरलिंग प्रशालेत अजित पवार यांची जयंती

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २२ जुलै-**

वळसंग ( ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री दिवंगत अजित पवार यांची जयंती कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन प्राध्यापक संतोष शिंदे यांच्या हस्ते करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास पर्यवेक्षक शिवानंद घोडके, सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार, सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, बसवराज दुधगी, वीरेश थळंगे, सिध्दारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, मल्लिनाथ गौडगाव, प्रा.शरणय्या मसुती, अजय माणकोजी, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, प्रा. प्रतिभा ताडुरे वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी, कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, प्रयोगशाळा सहायक विनोद दुधगी, सेवक कट्टेप्पा कोळी, सुनिता कुर्ले उपस्थित होते. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग उपप्रमुख श्रीमंत भोसले यांनी स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्याविषयी माहिती उपस्थितींना दिले.

# ब्रह्मर्षी सुभाष पत्री यांच्या जीवनावरील चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

ध्यानगुरू ब्रह्मर्षी सुभाष पत्रीजी यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित माहितीपट (डॉक्युमेंटरी) आज येथील लक्ष्मीनारायण टॉकीज येथे सुमारे ४०० ध्यानसाधकांच्या हाऊसफुल्ल उपस्थितीत प्रदर्शित झाला. जगभरातील सुमारे २७५ चित्रपटगृहांमध्ये इस्रायल, अंदमान, अमेरिका, नेपाळ तसेच भारतातील विविध राज्यांमध्ये सकाळी ८ ते १०.३० या वेळेत एकाच वेळी या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले.

या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे जगभरातील सर्व चित्रपटगृहांमध्ये चित्रपट सुरू होण्यापूर्वी ११ मिनिटांचे सामूहिक ध्यान करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण वातावरण शांत, सकारात्मक आणि ऊर्जामय झाले. त्यानंतर ब्रह्मर्षी सुभाष पत्रीजी यांच्या ध्यानप्रवासाची सुरुवात, त्यांचे जीवनकार्य, ध्यानाचा जागतिक प्रसार आणि मानवकल्याणासाठीचे त्यांचे योगदान यांचे प्रभावी चित्रण असलेला चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटाने उपस्थितांच्या मनावर खोल प्रभाव पाडला.

या प्रदर्शनासाठी कोल्हापूर, शेगाव, चिखली, अक्कलकोट, मैंदर्गी आदी ठिकाणांहून मोठ्या संख्येने ध्यानसाधक उपस्थित होते. विशेषतः अक्कलकोट ध्यान टीम आणि श्री वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या नेतृत्वाखाली ४५ ध्यानसाधकांनी सामूहिक उपस्थिती दर्शवत या प्रेरणादायी चित्रपटाचा लाभ घेतला. यावेळी अक्कलकोटमध्ये मोठ्या प्रमाणावर ध्यान शिबिर आयोजित करण्याचा संकल्पही महेश इंगळे यांनी याप्रसंगी व्यक्त केला. हा चित्रपट दि सोलापूर पिरॅमिड स्पिरिच्युअल ट्रस्ट यांच्या वतीने सर्वांसाठी मोफत प्रदर्शित करण्यात आला होता.



संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष चंद्रशेखर रेड्डी यांनी सांगितले की, 'या चित्रपटामागील एकमेव उद्देश म्हणजे समाजात ध्यानाविषयी जागृती निर्माण करणे, अधिकाधिक लोकांना ध्यानाची सवय लागावी आणि प्रत्येकाने स्वतः ध्यानाचा अनुभव घ्यावा. यावेळी चित्रपटगृहाचे मालक देविदास गुंडेटी यांनी हे चित्रपटगृह विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल महेश इंगळे यांच्या हस्ते त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन श्रीनिवास पुला आणि रोहित वंगारी यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडले.

याप्रसंगी पुरणचंद्र राव, परमानंद अलगोंडा पाटील, महेशजी इंगळे, दामोदर देवसानी, नगरसेवक विनोद भोसले, नेहा मिराजगावकर, कविता मिराजगावकर, ज्योत्स्ना दुस्सल, देवयानी नवगजे, स्मिता दुधानाकार, आनंद गंगाजी, सिद्राम पुराणिक, मास्टर गणेश, चंद्रकांता, डॉ. अर्जुन कुंभार, राजश्री इराबत्ती उपस्थित होते.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



# सौदी-अमेरिका अणुकरार

## । डोनाल्ड ट्रम्प यांची मंजुरी । युरेनियम संवर्धनाला परवानगी



**वॉशिंग्टन, २२ जुलै**

अमेरिका आणि इराण यांच्यात ज्या मुद्द्यावरून दीर्घ काळापासून तणाव निर्माण झाला होता, त्या युरेनियम संवर्धनाबाबत डोनाल्ड ट्रम्प यांनी एक मोठा आणि धाडसी निर्णय घेतला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सौदी अरबसोबत अण्विक कराराला मंजुरी दिली आहे. त्यानुसार आता सौदी अरब नागरी वापरासाठीच्या अण्विक प्रकल्पासाठी युरेनियम संवर्धन करू शकणार आहे.

या कराराची औपचारिक घोषणा ही लवकरच होऊ शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली. हा करार ३० वर्षासाठी असणार आहे. यात अमेरिकेच्या कंपन्या सौदी अरबमधील अण्विक कार्यक्रम विकासात सामील होतील. अमेरिका आणि सौदी अरब संयुक्त अभ्यासानंतर देशात युरेनियम संवर्धन प्रकल्प तयार करण्याचा मार्ग देखील मोकळा होऊ शकतो. हा निर्णय मध्य पूर्व आशियातील भूराजकारणासाठी महत्त्वाचा मानला जात आहे.



सौदी अरबचे दीर्घ काळापासून इराणसोबत वैर आहे. अशा परिस्थितीत सौदीला युरेनियम संवर्धनाची परवानगी देऊन पश्चिम आशियातील शक्ती संतुलन साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

अणू अप्रसार जाणकारांनी या निर्णयावर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. युरेनियम संवर्धन केल्यानंतर थेट अण्वस्त्र तयार करता येत नाही. मात्र, भविष्यात शस्त्र तयार करण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. सौदी अरबचे राजकुमार प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांनी यापूर्वीच इराणने अण्वस्त्र निर्मिती केली, तर सौदीही त्या दिशेने पुढे जाऊ शकतो असे स्पष्ट केले आहे.

यापूर्वी ज्यो बायडेन आणि डोनाल्ड ट्रम्प हे दोघांनीही सौदी अरबसोबत करार करण्याचा प्रयत्न केले. संयुक्त अरब अमिरातने अमेरिकेसोबत १२३ करार करीत अण्विक उर्जा उपक्रम सुरू केला होता. मात्र, त्यांनी युरेनियम संवर्धनाचा अधिकार मागितला नव्हता. त्यामुळे युएई मॉडेलला सर्वांत सुरक्षित अण्विक सहकार्य कराराचे एक उत्तम उदाहरण मानले जाते. ◂ (वृत्तसंस्था)

### सौदी-पाकिस्तान सुरक्षा करार

सौदी अरबने अण्वस्त्रसज्ज असलेल्या पाकिस्तानसोबत सुरक्षा करार केला आहे. काही महिन्यापूर्वी पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांनी गरज पडल्यास पाकिस्तान सौदीला अणुकार्यक्रम पुरवणार असल्याचे वक्तव्य केले होते. आता डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या या नव्या निर्णयामुळं हा फक्त एक अणुकरार नसून, इराणविरुद्धची अमेरिकेची मोठी रणनीती असल्याची चर्चा आहे. ■



चीनमधील शांघाई येथील बंदरातून बुधवारी एका जहाजावरून 'ए ग्रॅव्हिटी-१' या उपग्रहाने अवकाशाकडे झेप घेतली. यावेळी एका शक्तिशाली रॉकेटच्या माध्यमातून एकूण नऊ उपग्रहांना अवकाशात पाठविण्यात आले

# व्यापार वाटाघाटी अधिक तीव्र करू : मार्क कार्नी

**व्हँकुव्हर, २२ जुलै**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बहुतांश कॅनेडियन वस्तूंवर ५० टक्के शुल्क जाहीर केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, कॅनडा, अमेरिका आणि मेक्सिको यांच्यातील व्यापार करारावरील वाटाघाटी अधिक तीव्र करण्यास ते आणि ट्रम्प सहमत झाले आहेत, असे कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी मंगळवारी सांगितले.

कॅनडाने अमेरिकन ऑटोमोबाईल्स, मद्य आणि दुग्धजन्य पदार्थांसोबत अन्यायकारक भेदभाव केला आहे, असे ट्रम्प यांनी जाहीर केल्यानंतर कार्नी यांनी ही टिप्पणी केली. हे नवीन शुल्क सोमवारपासून ३० दिवसांनी लागू होणार होते. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांशी बोललो आणि आम्ही पुढील काही आठवड्यांत आमच्या वाटाघाटी अधिक सखोल आणि वेगवान करण्यास सहमत झालो आहोत, असे कार्नी ओटावा येथे म्हणाले. आमच्या नोकऱ्या, आमचे कामगार, आमचे शेतकरी यांना पाठिंबा देण्यासाठी आणि कॅनडाला अधिक मजबूत, अधिक स्वतंत्र आणि अधिक लवचिक बनवण्यासाठी जे काही आवश्यक आहे ते सर्व कॅनडा करेल. व्यापारी करारासंदर्भाद अमेरिकेशी वाटाघाटी करण्यात येतील. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता



### 'बिग बी'च्या पोस्टचा काढला चुकीचा अर्थ

**मुंबई :** मंगळवारी अमिताभ बच्चन यांनी एक पोस्ट शेअर करत रुग्णालयात, एका शस्त्रक्रियेनंतर आणि आयसीयूमध्ये, अनुभवी डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली, त्यानंतर रुग्णालयातून सुट्टी आणि घरी परतणे, असे लिहिले. ही पोस्ट समोर आल्यानंतर बिग बी शस्त्रक्रियेनंतर रुग्णालयातून डिस्चार्ज झाले, असा अंदाज व्यक्त केला जाऊ लागला. पण आता त्यांनी स्वतः एका नवीन ब्लॉगमध्ये ते आयसीयूमध्ये नव्हते हे स्पष्ट केले. मी पूर्णपणे ठीक आहे. माझ्या पोस्टचा चुकीचा अर्थ लावला गेला. मी फक्त एक उदाहरण देत होतो. एखाद्या मोठ्या शस्त्रक्रियेनंतर किंवा आयसीयूमध्ये राहिल्यानंतर सर्वात कठीण वेळ तेव्हा सुरू होते, जेव्हा तुम्ही घरी परतता आणि तुमच्या कमकुवत किंवा खराब झालेल्या स्थितीचा सामना करता. अगदी त्याचप्रमाणे, जेव्हा एखादा चॅम्पियन हरतो, तेव्हा त्याच्यासाठी सर्वात कठीण लढाई त्याच्या आत सुरू असलेल्या भावनांशी असते. माझा उद्देश अर्जेंटिनाच्या पराभवाकडे आणि त्यावेळी लिओनेल मेस्सीच्या मानसिक स्थितीकडे होता, एका अशा चॅम्पियनकडे ज्याला पराभवाला सामोरे जावे लागले, असा होता. ■

### 'द प्राईड ऑफ भारत'साठी टीम सज्ज




**मुंबई :** चित्रपट निर्माता संदीप सिंग आपल्या आगामी मोठ्या ऐतिहासिक चित्रपटाची 'द प्राईड ऑफ भारतः छत्रपती शिवाजी महाराज' मोठ्या स्तरावर निर्मिती करण्याची तयारी करत आहेत. या चित्रपटात ऋषभ शेट्टी छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत दिसणार आहे. आता हा चित्रपट आणखी खास बनवण्यासाठी निर्मात्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील ॲक्शन टीमला समाविष्ट केले आहे, जी चित्रपटातील युद्ध आणि ॲक्शन सीन्स उत्कृष्ट बनवण्यासाठी काम करेल. ॲक्शन डिझाइनसाठी ओळखले जाणारे मार्क हेन्सन याचे ॲक्शन दिग्दर्शन सांभाळणार आहेत. सुमारे ५०० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनलेला हा चित्रपट दोन भागांमध्ये प्रदर्शित होईल. ऋषभ व्यतिरिक्त, यात अर्जुन रामपाल, विवेक ओबेरॉय आणि शेफाली शाह देखील महत्त्वाच्या भूमिका साकारताना दिसतील. चित्रपटाचे बहुतांश चित्रीकरण छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठा साम्राज्याची स्थापना केली होती, अशा महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक किल्ले आणि ठिकाणांवर केले जाणार आहे. ■

### जॉन अब्राहमने खरेदी केला बंगला



**मुंबई :** बॉलिवुडचा ॲक्शन मॅन जॉन अब्राहम याने मुंबईमधील प्राइम लोकेशनवर एक लक्झरी बंगला खरेदी केला. अभिनेत्याने कोटींच्या घरात पैसे मोजून घर विकत घेतले आहे. जॉन अब्राहमने बॉलिवूडमध्ये दोन दशकांहून अधिक काळ इंडस्ट्रीत काम केले आहे. जॉनने वांद्रे पश्चिम येथे बंगला खरेदी केला आहे. हे घर अभिनेत्याने ८४ कोटींना विकत घेतले आहे. ही प्रॉपर्टी वांद्रे पश्चिम येथील सेंट मार्टिन्स रोडवर आहे. या परिसरात इतर कलाकारांच्याही प्रॉपर्टीज असल्याची माहिती आहे.




## अग्रलेख

# झुरळांची चमकोगिरी

वैचारिक भूमिकेचा आणि विरोधासाठी आवश्यक असलेल्या ठोस मुद्यांचा पूर्णपणे अभाव असलेल्या विरोधकांना 'नीट'ची पेपरफूट आणि त्या मुद्यावर कॉक्रोच जनता पार्टीच्या पुढाकाराने झालेल्या आंदोलनाच्या निमित्ताने आयते कोलीत मिळाले. सरकारी यंत्रणेच्या सुस्तीमुळे ते त्यांना आयतेच दिले गेले असेही म्हणता येईल. नीटची पेपरफूट हा गंभीर विषय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह साऱ्यांनीच त्याचे गांभीर्य मान्य केले आहे. परंतु, या मुद्यावर संपूर्ण व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा आततायीपणा विरोधकांनी केला आणि त्यातून चिंताजनक वातावरण निर्माण झाले. विरोधक म्हणून सरकारवर टीका करण्याचा त्यांचा अधिकार मान्य केला तरी अशा प्रकारचे वातावरण निर्माण करणे चूकच म्हटले पाहिजे. आपण कुणाच्या सोबत आंदोलन करतो आहोत, यालाही महत्त्व असते. काल परवा आभासी जगतात जन्माला आलेल्या कॉक्रोच पार्टीसारख्या घटकाच्या मागे काँग्रेस आणि अन्य विरोधकांना फरफटत जावे लागले, याचे वैषम्य ज्याचे त्याला वाटायला हवे. पण, ते त्यांना वाटणार नाही. कारण सरकारशी संघर्ष करण्यासाठी विरोधकांकडे मुद्देच नाहीत आणि असतील तर त्या मुद्यांवर सरकारला जाब विचारण्याची त्यांची ताकद नाही. त्यामुळे आयत्या कोलितावर आपली पोळी भाजून घेण्याचा उद्योग विरोधकांनी केला.

गेल्या बारा वर्षांच्या काळात केंद्रातील मोदी सरकारने देशात फार मोठे मन्वंतर घडवून आणले आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थिती प्रतिकूल असताना आणि अंतर्गत आव्हाने असताना आपला देश प्रगतिपथावर अग्रेसर आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय भू-राजकीय स्थिती सतत बदलते आहे. तरीही आपले केंद्र सरकार वेळोवेळी योग्य भूमिका घेऊन राज्यशकट व्यवस्थित हाकत असल्याचे दिसत आहे. दुसऱ्या बाजूला विरोधकांचे राजकारण पाहिले, तर त्यांच्याकडे ठोस धोरणात्मक मुद्यांचा आणि वैचारिकतेचा पूर्ण दुष्काळ दिसतो. काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख नेते राहुल गांधी यांच्यासह शरद पवार, प्रियांका वढेरा, उद्धव ठाकरे, अखिलेश यादव, अरविंद केजरीवाल यांना कॉक्रोच पार्टीसारख्या क्षुल्लक घटकाच्या मागे धावावे लागले. विरोधकांची राजकीय आणि बौद्धिक दिवाळखोरी त्यामुळे दिसून आली. ज्या पक्षांना किंवा संघटनांना स्वतःची राजकीय ओळख नाही आणि ज्यांची राष्ट्रनिष्ठा संशयास्पद आहे, अशा उपटसुंभ घटकांनी गोंधळ घालावा आणि राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांनी राजकीय पोळी भाजण्यासाठी त्यांच्या खांद्यावर हात ठेवावा, हे चित्र लोकशाहीसाठी घातक आहे. या निमित्ताने जणू काही आभाळच कोसळल्याचे चित्र विरोधकांनी उभे केले. या सगळ्या राजकीय गदारोळाच्या आणि आंदोलनांच्या पाठीशी काही राष्ट्रविघातक, समाजकंटक किंवा देशात अस्थिरता निर्माण करू पाहणाऱ्या शक्ती असण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. अशांचा शोध घेऊन त्यांना कठोरपणे वठणीवर आणलेच पाहिजे. ते काम सरकार करीत आहेच. लोकशाहीत शांततापूर्ण आंदोलने ही मोठी ताकद आहे. आतापर्यंत विविध जनआंदोलनांनी व्यवस्थेला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले हेही खरे. मात्र, राष्ट्रविघातक घटक, राजकीय हस्तक्षेप यामुळे आंदोलने आपल्या मूळ ध्येयापासून भरकटल्याचीही उदाहरणे आहेत. नीट परीक्षेतील गैरप्रकाराविरुद्धचे आंदोलन न्याय्यच होते. पण, ते आंदोलन विकसित होत असताना सरकारचा विरोध हा एकमेव अजेंडा असलेले काही लोक त्यात घुसले. त्यामुळेच त्यात अप्रिय घटना घडल्या. देशविरोधी नारेबाजी झाली. आंदोलनाचा खरा उद्देश अशा घटनांनी बाधित होतो. पण, ते लक्षात येते तेव्हा उशीर झालेला असतो. या विषयाला आणखी एक बाजू आहे. ती अशी की, अशा अत्यंत संवेदनशील मुद्यावर देशातील सामान्य नागरिक, पालक आणि विद्यार्थी रस्त्यावर उतरतात, तेव्हा त्या सर्वांनाच सरसकट 'अजेंडावाले' ठरवणे ही अत्यंत धोकादायक मानसिकता आहे. सत्तेला प्रश्न विचारणे किंवा सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आंदोलन करणे हे लोकशाहीत 'नॉर्मल' मानले पाहिजे. त्यामागे असलेल्या खऱ्या अजेंड्याचा शोध घेणे आणि खऱ्या विघातकांना वठणीवर आणणे आवश्यकच आहे. पण, सरसकट सर्वांवर शिक्का मारण्याची आवश्यकता नसते. लोकशाही ही अशीच अस्वस्थ असते आणि तिच्या तशा असण्यातच तिची मातब्बरी असते. जगातील सर्वांत मोठ्या लोकतांत्रिक देशात आपण राहतो. हा देश जगाला आदरणीय असलेल्या वैविध्यांनी नटलेला आहे. त्यामुळे स्वाभाविकच त्यात सहमती-असहमती असणार. असहमत किंवा विरोधात असलेल्या प्रत्येकाच्या कपाळावर शिक्का मारण्याची घाई करणे लोकतांत्रिक परंपरेला साजेसे नाही. अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होते तेव्हा संयम हाच उपाय असतो. संयमी संवादातून सुटू शकणार नाही, असा प्रश्नच आतापर्यंत जन्माला आलेला नाही. मात्र, काही उठवळ आणि बाष्कळ मंडळी इतिहासातील भलतेच दाखले देऊन विरोधकांना भांडवल करण्याची संधी देणारी उथळ विधाने करीत असतात. त्यांच्या त्या विधानांमुळे संवादातून समस्या सुटण्याचे मार्ग बंद होत असतात. यापूर्वीही देशात अनेकदा स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटले. अनेक मोठे घोटाळे झाले. पण म्हणून काही संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडली नाही. अशा वेळी अत्यंत संयमाने, वेगाने आणि कठोर पावले उचलून पुढील नुकसान टाळणे हे संवेदनशील सरकारचे कर्तव्य असते. ते नीटच्या पेपरफुटीबाबत योग्यरीत्या केले गेले. संवादाच्या आघाडीवरही सरकारला अधिक वेगाने काम करता आले असते. आंदोलनाची घोषणा होताच संवादाची प्रक्रिया सुरू व्हायला हवी होती. ते झाले असते तर एवढा गदारोळ झाला नसता आणि झुरळांच्या बगलबच्च्यांना चमकोगिरीची संधी मिळाली नसती. आपण आधीच्या सरकारपेक्षा वेगळे आहोत, असे काही लोक एकीकडे सांगत असतात आणि दुसरीकडे पूर्वीच्या सरकारांच्या काळातील घटनांशी वर्तमानाची तुलना करीत असतात ही विसंगती आहे. आपण वेगळे आहोत, असा आपला दावा असेल तर ते वेगळेपण दिसायलाही हवे. भारताचे दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी एक अतिशय मार्मिक विधान केले होते. ते म्हणाले होते- ''सरकारे सब समान होती हैं, फर्क चरित्र एवं संस्कार का होता हैं...'' अटलजींचे हे शब्द प्रत्येक सरकारने लक्षात ठेवायला हवेत. या अनुषंगाने संवादासाठी पुढाकार घेऊन आपण पूर्वीच्या सरकारपेक्षा वेगळे आहोत, हे दाखवून देण्याची संधी सरकारने गमावली आणि त्यामुळे भलत्यांनाच हिरोगिरीची संधी मिळाली, याची येथे वैषम्यासह नोंद केली पाहिजे. सरकारवर विरोधकांच्या तुलनेत अधिक जबाबदारी असते. त्यांना विचार, विवेक, लोकभावना आणि व्यवहार यांची सांगड घालावी लागते. विरोधकांवर तशी फार काही जबाबदारी नसते. सरकारने सदैव सावध असायला हवे. लोकशाही केवळ बहुमताच्या किंवा प्रशासकीय अधिकारांच्या जोरावर चालत नसते. ती विश्वासाच्या धाग्यावर आणि संवादाच्या चाकांवर चालते. सत्ता आणि विरोध ही लोकशाहीच्या एका रथाची दोन चाके आहेत. पंतप्रधान मोदी यांनी नीटच्या पेपरफुटीच्या अनुषंगाने जाहीर वक्तव्य करून विद्यार्थ्यांना आश्वस्त केले. पण, संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी प्रतिबंधक उपाय म्हणून काय केले, हा प्रश्न उरतोच. पोलिस किंवा अन्य यंत्रणा सरकारच्या अधिकारात असतात. त्यांना आंदोलन हाताळण्याची नव्हे तर कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी द्यायची असते. आंदोलन हाताळण्यासाठी सरकारच्या वतीने पुढाकार घेतला जायला हवा. ते न घडल्यामुळे कॉक्रोच उपाख्य झुरळांचे फावले. भलत्यांनाच चमकोगिरीची संधी मिळाली. आंदोलन झाले, पण फलित काय, हा प्रश्न शिल्लकच आहे. तो लवकर सुटावा आणि भविष्यात झुरळांना अशा विषयांपासून दूर ठेवण्याची काळजी घेतली जावी, एवढीच अपेक्षा आहे. ■

## तंत्रवेध

# डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

**डॉ. दीपक शिकारपूर**

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एकेकाळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी रांगेत उभे राहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लॅस्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.

या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता राहत नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पृष्ठभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. ग्रामीण भारतासाठीही ही सुविधा अत्यंत महत्त्वाची आहे. आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्डे सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात. या तंत्रज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पर्यावरण संवर्धन. दरवर्षी कोट्यवधी प्लॅस्टिक डेबिट आणि क्रेडिट कार्डे तयार केली जातात. कार्ड्सचा वापर कमी झाल्यास प्लॅस्टिक कचऱ्यात घट होईल. पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.



विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करीत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील. एखाद्या दिवशी ग्राहकाला एटीएमसमोर उभे राहून आपल्या मातृभाषेत सूचना ऐकून किंवा बोलून व्यवहार पूर्ण करता येईल. अशा प्रकारे तंत्रज्ञान अधिक मानवी आणि सर्वसमावेशक बनत जाईल. तथापि, या सुविधेचा वापर करताना काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. मोबाईल सुरक्षित ठेवणे, यूपीआय पासवर्ड कोणालाही न सांगणे, अनोळखी व्यक्तींच्या मदतीवर अवलंबून न राहणे आणि व्यवहार पूर्ण झाल्यानंतर सूचना तपासणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तंत्रज्ञान जितके प्रगत होते तितकी जागरूकताही आवश्यक असते. एकंदरीत पाहता, कार्डलेस एटीएम ही केवळ पैसे काढण्याची नवी पद्धत नाही, तर भारताच्या डिजिटल परिवर्तनाचे प्रभावी प्रतीक आहे. यामुळे बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित, सुलभ, पर्यावरणपूरक आणि सर्वसमावेशक होत आहेत. जगाला डिजिटल पेमेंटची दिशा दाखवणाऱ्या भारताने आता रोख रक्कम वितरणाच्या क्षेत्रातही नवा मानदंड निर्माण केला आहे. डिजिटल भारताच्या प्रवासात कार्डलेस एटीएम हे सामान्य नागरिकाला तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी आणणारे पाऊल असून आर्थिक सक्षमीकरणाला नवी गती देते. आगामी काळात ही सुविधा भारतातील प्रत्येक गाव, प्रत्येक शहर आणि प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनेल, यात कोणतीही शंका नाही. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# सहज मिळतेय, पण सांभाळून!

सहज मिळत असेल आणि वारंवार एखाद्या गोष्टीसाठी पिच्छा पुरविला जात असेल तर मानवी स्वभावच असा आहे की, तो बळी पडतोच! मात्र, नंतर यातून वाट्याला येणारा मनःस्ताप वैताग आणणाराच नव्हे, तर का ही दुर्बुद्धी सुचली, अशा मानसिकतेत माणसाला नेणारा असतो. खाजगी फायनान्स कंपन्या, डिजिटल कर्ज देणारे ॲप्स यांच्याकडून सहज उपलब्ध होणारे कर्ज तेव्हा समाधान देणारे असते; मात्र नंतर होणारी 'पठाणी' वसुली अवघड जागेचे दुखणे म्हणूनच सहन करावे लागते. तेव्हा कळतं सहज मिळणाऱ्या गोष्टीत समाधान नसतं म्हणून!

'कर्ज' हा प्रत्येक सामान्य माणसाच्या जगण्याचा आधार आहे. कर्ज काढून समाधानाने जगणारी अनेक कुटुंबे आपण पाहतो. मात्र अशा कुटुंबांना आधी कर्ज घेताना कमालीच्या क्लिष्ट प्रक्रियेला सामोरे जावे लागते. एक व्यवस्था या विरुद्धही आहे. जेथे अगदी सहज, कोणत्याही कागदपत्रांची फारशी खातरजमा न करता कर्ज उपलब्ध करून देण्याची सोय केली जाते आणि ते म्हणजे खाजगी फायनान्स कंपन्या व आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात तयार झालेले कर्ज देणारे डिजिटल ॲप्स! खरं तर नियम, कायद्याची बंधने सगळ्यांसाठीच आहेत. मोठमोठाल्या बँकांनाही आणि खाजगी फायनान्स कंपन्यांनासुद्धा. पण ते पाळायचे की नाही, हा ज्याचा त्याचा विषय असल्याचेच चित्र सध्या आहे.

एरवी राष्ट्रीयकृत बँकेतून कर्ज घेताना जीव मेटाकुटीस येईल एवढी चौकशी आणि कागदपत्रांची जुळवाजुळव करावी लागते; पण हा त्रास तेवढ्यापुरताच! नंतर मात्र सर्वकाही निवांत चालते. खाजगी फायनान्स कंपनीचे आणि डिजिटल ॲप्सचे जरा वेगळेच आहे. ते कर्ज घ्या म्हणून तुमचा एवढा पिच्छा पुरवितात की, जेवढं बोलणं कुटुंबातील सदस्यांसोबत होत नसेल, तेवढा संवाद कंपनीवाले आपल्याशी करतात. वेळ-काळाचे भान नाही. रात्री १० वाजो की ११ त्यांचे फोन येणार! मॅसेज तर सांगूच नका... अतिरेक म्हणजे आपण कोणत्याही प्रकारचा कर्जासाठी 'अर्ज' केला नसेल तर तो 'अप्रुव्ह' म्हणजेच मान्य झाल्याचे मॅसेज करून कंपन्या मोकळ्या होतात. अनेक नावाजलेल्या फायनान्स कंपन्यांही याच पद्धतीने वागतात. बरेचदा पाठपुराव्यासाठी दाखविल्या जाणाऱ्या सततच्या जाहिरातींना प्रभावित होऊन अनेक जण बळी पडतात आणि 'कर्जबाजारी' होतात.

आणि एकदा का आपण कर्ज घेतलं की, खाजगी कंपन्यांची भाषा आणि व्यवहार बदलतात. ही कोणत्याही एका नव्हे, तर सर्व कंपन्यांची रीत आहे. कुणाचे सुख-दुःख यांना कळत नाही की दिवस-रात्रीचे भान राहत नाही. सुटीचे आणि कामाच्या दिवसांचाही यांना विसर पडतो. त्यांना केवळ अगदी सहजतेने कर्ज म्हणून दिलेले पैसे 'वसुली' करण्याची धुंद चढलेली असते. त्यावेळी कळते अगदी सहज मिळालेल्या गोष्टी चिरकाल समाधान देऊ शकत नाही, हे नक्की!

आज अशा खाजगी फायनान्स कंपन्यांचे जाळे प्रचंड वाढले आहे. सहज मिळणाऱ्या कर्जाच्या भानगडीत आम्ही स्वतःच स्वतःची फसवणूक करून घेत आहोत. डिजिटल कर्ज ॲपच्या माध्यमातून युवा पिढी आपले लहान-मोठे खर्च भागविण्याच्या विचाराने याला बळी पडून नंतर प्रचंड मनःस्तापाचा बळी ठरताना दिसत आहेत. यातून डिजिटल गुन्हेगारीही वाढत चालली आहे. पठाणी वसुलीसाठी अगदी सर्व मर्यादा ओलांडण्याचे प्रकार डोळ्यादेखत घडत असूनही यावर अंकुश कुणाचा हा प्रश्न कायम असेल तर मात्र क्षणिक समाधानात तथ्य काय, असाच प्रश्न पडतो.

नियम मोठ्या पतपेढ्यांना आहेत, तसेच याही संस्थांना आहेत. सकाळी ८ ते संध्याकाळी ७ पर्यंतच फोन किंवा भेटून वसुलीसाठी संपर्क करावा, असे आहे. पूर्वसूचना देऊनच कर्जदाराकडे जाण्याचे निर्देश आहेत. धमक्या किंवा शिवीगाळ करून वसुली करू नये, अशा रिझर्व्ह बँकेच्या सूचना असतानाही त्या पाळल्या जात नाहीत, हे वास्तव आहे. कर्ज वसुलीसाठी घरावर आलेला फायनान्स कंपनीचा माणूस अनेकदा अपमानजक वागणूक देऊन जातो. अशावेळी ते सुरुवातीचे क्षणिक समाधान नकोसे वाटते. आज सहज कर्ज उपलब्ध होण्याच्या नादात आम्ही अशा कंपन्यांच्या 'मार्केटिंग' कौशल्याचे बळी ठरतो आणि समाधान गमावून बसतो. एकाला अनुभव येऊनही जर शेजारचा त्याच मार्गाने जाणार असेल तर सहज उपलब्ध होत असल्याने ते स्वीकारण्याची मानसिकता बदलावी लागणार आहे. नाहीतर हे रडगाणे न संपणारे असेच असेल! ■

९७६३७१३४१७

## दिल्ली वार्तापत्र

# काँग्रेसचे आत्मघातकी पाऊल

**श्यामकांत जहागीरदार**

नीट परीक्षेतील गैरव्यवहार आणि आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ राजधानी दिल्लीत एकाच वेळी दोन आघाड्यांवर आंदोलन सुरू आहे. आंदोलनाची पहिली आघाडी ही जंतरमंतरची आहे. याठिकाणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी अभिजित दीपके यांच्या नेतृत्वातील कॉक्रोच जनता पाटीतर्फे आंदोलन सुरू आहे. आंदोलनाची दुसरी आघाडी मंगळवारी काँग्रेसने उघडली.

लडाखमधील पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक जंतरमंतरवरील आंदोलनात उतरल्यानंतर आणि त्यांनी बेमुदत उपोषण सुरू केल्यानंतर आंदोलनाचे गांभीर्य काही प्रमाणात वाढले. सुरुवातीला काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनीही या आंदोलनाची पाहिजे तशी दखल घेतली नाही. बेमुदत उपोषणाचे तीन आठवडे उलटून गेल्यानंतर वांगचुक यांची प्रकृती खालावू लागली, त्यामुळे दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाने आणि वैद्यकीय सल्ल्याने पोलिसांनी वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयात हलवले.

मानवीय भूमिकेतून पोलिसांची ही कारवाई योग्य अशीच म्हणावी लागेल. पण स्वतःला वांगचुक यांचे हितचिंतक म्हणवणाऱ्या पण प्रत्यक्षात त्यांचे हितचिंतक नसणाऱ्या राजकीय पक्षांच्या लोकांनी आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या या कारवाईवर आक्षेप घेतला. बळाचा वापर करत पोलिसांनी वांगचुक यांना रुग्णालयात दाखल केले, असा या लोकांचा आरोप होता. उपोषण करताना वांगचुक यांनी आपले प्राण गमवावे, असे तर त्यांच्या कथित समर्थकांना अपेक्षित नव्हते, असा प्रश्न यातून पडतो.

सोनम वांगचुक यांना रुग्णालयात हलवल्यानंतर त्यांच्या जागेवर कॉक्रोच जनता पार्टीचे नेते दीपके उपोषणाला बसले. पण बेमुदत उपोषण करणे हे रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याइतके सोप नसल्याचे त्यांच्या लक्षात आले, त्यामुळे अडीच दिवसातच त्यांनी आपले उपोषण गुंडाळले. राहुल गांधी यांना दुसऱ्या कोणत्याही शत्रूची गरज नाही, तेच स्वतःचे सर्वांत मोठे शत्रू असल्याचे विधान दीपके यांनी केले होते. यामुळे राहुल गांधी आणि काँग्रेस कार्यकर्ते नाराज झाले आणि त्यांनी या आंदोलनापासून स्वतःला दूर ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळेच वांगचुक बेमुदत उपोषणाला बसले असतानाही राहुल गांधी त्यांना भेटायला गेले नाहीत. एका जुन्या घटनेचा व्हिडीओ समोर आल्यानंतर सोनिया गांधींच्या पुढाकारानंतर काँग्रेसने पवन खेरा यांना जंतरमंतरवर सोनम वांगचुक यांच्या भेटीसाठी पाठवले.

मुळात काँग्रेस दीपकेंकडे राहुल गांधींचा मुख्य राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून पाहू लागली होती, असे वाटते.दीपके जेवढे मोठे होतील, तेवढे राजकारणातील राहुल गांधींच्या स्थानाला धक्का बसेल, असे काँग्रेसला वाटू लागले. त्यामुळे या मुद्यावर नेमकी कोणती भूमिका घ्यावी, हे काँग्रेस नेत्यांना समजत नव्हते. सोमवारी आंदोलक विद्यार्थ्यांच्या संसद मार्चला जो प्रतिसाद मिळाला, तो पाहून काँग्रेस नेत्यांच्या तोंडचे पाणी पळाले. सोमवारी दिवसभर देशातील सर्व माध्यमात या आंदोलनाची चर्चा होती. अशा परिस्थितीत राहुल गांधींचे काय, असा प्रश्न काँग्रेसला पडू लागला. यातूनच तरुणांचे हे आंदोलन हायजॅक करण्याचा विचार काँग्रेस नेत्यांच्या मनात आला. त्यातूनच ७ लोककल्याण मार्ग या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानासमोर धरणे देण्याची कल्पना पुढे आली. या योजनेचा सुगावा दिल्ली पोलिस आणि गुप्तचर संस्थांना लागला नाही, ही वस्तुस्थिती होती. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियांका वढेरा, वेणुगोपाल, काँग्रेसचे खासदार आणि अन्य नेते मोर्चाने ७ लोककल्याण मार्ग या पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर पोहाचले आणि त्यांनी धरणे आंदोलन सुरू केले.

पंतप्रधानांच्या निवासस्थानाचा परिसर हा अतिसंवेदनशील भाग असतो. त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे आंदोलन करू नये, हा संकेत आहे. तुम्हाला आंदोलनच करायचे असेल तर दिल्लीत अनेक ठिकाणी करता येते. जंतरमंतर तर आंदोलनासाठी राखीव क्षेत्र आहे. संसद भवन परिसरातही तुम्ही धरण्यावर बसू शकता. काँग्रेस नेते आणि कार्यकर्त्यांपासून पंतप्रधानांच्या जिवाला धोका पोहोचण्याची शक्यता नव्हती, पण या आंदोलनात काही असामाजिक तत्त्व घुसले असते, तर कोणता अनुचित प्रसंग घडला असता, याची कल्पना करता येत नाही. अगदी आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीहल्ला करावा लागला असता, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या असता, तर काय बिकट प्रसंग ओढवला असता, याची कल्पनाही करवत नाही.

भाजपा विरोधी पक्षात असताना त्याने सरकारविरुद्ध अनेक आंदोलने केलीत, पण पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर कधीही आंदोलन केले नाही. जे पथ्य आणि संकेत विरोधी पक्षात असताना भाजपा पाळत होती, तेच पथ्य आणि संकेत काँग्रेसनेही पाळले पाहिजे. राहुल गांधी नादान असतील, पण सोनिया गांधी आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी हे भान ठेवायला पाहिजे होते. खडगे राजकारणातील सर्वांत ज्येष्ठ, संयमी आणि अनुभवी नेते आहेत, त्यांनाही याचे भान राहिले नाही आणि ते राहुल गांधींमागे फरफटत गेले, याचे आश्चर्य वाटते. राहुल गांधी ५६ वर्षाचे झाले तरी अजूनपर्यंत स्वतःला युवा समजतात, त्यामुळे त्यांच्या वागण्यातही अनेकदा बालिशपणा दिसून येतो. पण खडगे तुम्हीसुद्धा.. असे म्हणावे वाटते. मोदी सरकार आणि दिल्ली पोलिसांनी संयमाने परिस्थिती हाताळली म्हणून बरे झाले.

सरकारने राहुल गांधींशी चर्चा करण्यासाठी, त्यांना समजवण्यासाठी केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांना पाठवले, पण राहुल गांधी ऐकायला तयार नव्हते. राजकीय नेत्यांनी आपल्या शब्दावर कायम राहायला पाहिजे, संसदेत विद्यार्थ्यांच्या मुद्यावर चर्चा घडवावी, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली. गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा करून सरकार संसदेत चर्चा करायला तयार असल्याचे आश्वासन डॉ. जितेंद्रसिंह यांनी त्यांना दिले. सरकारच्या या आश्वासनानंतर राहुल गांधी यांनी आपले धरणे आंदोलन मागे घ्यायला पाहिजे होते, पण त्यांनी तसे केले नाही. देशातील जनतेचा राहुल गांधींवर विश्वास नाही, याचे कारण हेच आहे. तुम्ही सरकारसमोर एक मागणी ठेवली आणि सरकारने तुमची मागणी मान्य केली तर तुम्ही आपले आंदोलन मागे घ्यायला पाहिजे होते, राजकीय शहाणपणा यातच असतो. पण राजकीय शहाणपणा आणि राहुल गांधी यांचा दूरदूरपर्यंत काही संबंध आहे, असे मंगळवारच्या घटनेवरून तरी वाटले नाही. पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर धरणे आंदोलन करून राहुल गांधी यांनी देशातील कॅमेऱ्यांचा झोत काही तासासाठी स्वतःकडे वळवत प्रसिद्धी मिळवली असली, तरी यातून त्यांनी आपले कायमस्वरूपी नुकसान करून घेतले आहे. अराजकतावादी नेता असे त्यांना म्हटले जात होते, पण मंगळवारच्या घटनाक्रमाने त्यांनी स्वतःच यावर शिक्कामोर्तब करून घेतले. 'विनाशकाले विपरीत बुद्धी' यापेक्षा यावर आपण जास्त तरी काय म्हणणार? ■

९८८१७१७८१७

### मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यात तथ्य

'फेसलेस आंदोलनातून अराजकता माजवण्याचा प्रयत्न : मुख्यमंत्री' ही बातमी तरुण भारतात वाचली. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्यात तथ्य आहे. या 'विद्यार्थी' आंदोलनामुळे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. पेपरफूट भारतात प्रथमच झाली आहे का? काँग्रेस काळात किती वेळा पेपरफूट झाली होती आणि प्रत्येक वेळी तत्कालीन काँग्रेस/आघाडी सरकारने कधी जबाबदारी स्वीकारली? हे आंदोलन आणि नंतरचा हिंसाचार पूर्वनियोजित होता का? भारताच्या विकासाच्या आड येणाऱ्या देशाबाहेरील काही हितशत्रूंनी, भारतातील विरोधी पक्षांशी संगनमत करून भारतविरोधी कारस्थान केले आहे का? या आंदोलनाचा फायदा घेऊन कोणीतरी, भारतात अराजकता, हिंसाचार पसरवून, भारताचा नेपाळ आणि बांगलादेश करण्याचा डाव आखला होता का? २००७ मध्ये केंद्रात आघाडी सरकार असताना सोनम वांगचुकना लेह पोलिसांनी विदेशी फंड घेण्याबद्दल नोटीस बजावली होती का?

सोनम वांगचुक, अभिजित दीपके आणि त्याचे आम आदमी पार्टी तसेच अमेरिका कनेक्शन काय आहे? दीपके कोण आहे आणि आताच त्याला भारतात येऊन आंदोलन करण्याची तातडी का भासली? त्याला अमेरिकेतून भारतात कोणी बोलावले? त्याचा खर्च कोण करत आहे? या आंदोलनासाठी अर्थपुरवठा कोण करत होते?

महत्त्वाचे म्हणजे दिल्लीतील यूएस दूतावासाने दिल्लीत २० जुलै रोजी होऊ घातलेल्या हिंसक आंदोलनावर १७ जुलैलाच 'एडव्हायजरी' प्रसिद्ध कशी केली? शांततापूर्ण असलेल्या आंदोलनाला, संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होणाऱ्या दिवशीच, २० जुलैला हिंसक वळण का लागले? तेथे ट्रक भरून दगड कोणी आणि कसे आणले? जंतरमंतरवर आंदोलनस्थळी जायचे सोडून राहुल गांधींनी पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर अचानक धरणे आंदोलन का केले? हे आंदोलन 'चालवण्यात' आम आदमी पक्षाचा नक्की उद्देश काय आहे? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्याचा अधिकार जनतेला आहे. तेव्हा केंद्र सरकारने या आंदोलनाशी परोक्ष किंवा अपरोक्ष संबंध असलेल्या सगळ्यांची कसून चौकशी करून दोषींना न्यायालयात उभे केले पाहिजे.


**शिवराम वैद्य**/पुणे. ९८५०५१८०१८

## वाचक पत्रे

### अंधारातून प्रकाशाकडे नेणारे गुरुतत्त्व!

यावर्षी गुरुपौर्णिमा महोत्सव २९ जुलैला आहे. गुरुपौर्णिमा हा शिष्यासाठी सर्वांत मोठा सण आहे. ज्या गुरूंनी आपल्याला अंधारातून प्रकाशाकडे नेले, मोक्षाचा मार्ग दाखवला आणि आपला हात धरून आपल्याला सन्मार्ग दाखवला, त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असतो. यादिवशी आपण गुरू-शिष्य परंपरेचे जनक असलेल्या आदि गुरू महर्षी व्यास यांचे पूजन करतो. त्यामुळेच गुरुपौर्णिमेला 'व्यास पौर्णिमा', असेही म्हणतात.

जीवनात प्रत्येक क्षेत्रात गुरू हवा असतो. आध्यात्मिक प्रगतीसाठी अनेक जण अध्यात्मातील थोर व्यक्तीला गुरू मानतात आणि त्यांच्याकडून गुरुमंत्र घेऊन साधनेला प्रारंभ करतात. शालेय शिक्षक, तसेच सृष्टीतील सजीव-निर्जीव वस्तूंकडूनही आपण बरेच काही शिकू शकतो. झाडे त्यांचे काम निःस्वार्थीपणे करत असतात. त्यांच्याकडून निःस्वार्थपणा शिकू शकतो. मुंग्या एकजूट होऊन काम करीत असतात. त्यांच्याकडून संघटितपणा शिकू शकतो. गुरू ही एक आध्यात्मिक शक्ती आहे. त्यामुळे गुरू हा केवळ गुरुमंत्र देऊन साधना करून घेणाराच नसावा, तर तो निःस्वार्थी, योग्य मार्ग दाखवणारा, त्याच्या शिष्यांना भावसागरातून तारणारा, संकटमुक्त करणारा आणि शेवटी शिष्याला जीवनमुक्त करणारा असावा. गुरू असेल, तरच शिष्य घडतो आणि शिष्य घडला की, समाज घडतो. त्यामुळेच गुरुपौर्णिमा या पवित्र दिवशी आपण आपल्या सर्व गुरूंना मनापासून वंदन करूया.



**राधा प्रमोद पिंपळापुरे**/उमरेड

### लोकसभा की क्रोध सभागृह?

लोकशाहीमध्ये राज्यसभा आणि लोकसभा ही दोन महत्त्वाची सभागृहे आहेत. परंतु लोकसभा, विरोधी पक्षांनी क्रोध सभागृह करून टाकले आहे. लोकांच्या, देशाच्या हितासाठी विचारविनिमय शांतता राखून करण्यासाठी ते निर्माण झाले परंतु विरोधी पक्षांनी या सभागृहाचे युद्धभूमीत रूपांतर करून टाकले. विरोधी पक्षाने या सभागृहाचे पावित्र्य भंग करून लोकशाहीचा अपमान केला आहे. ज्यानी भारतात संविधानाची निर्मिती केली त्याचाही अपमान विरोधी पक्ष करीत आहे, असे चित्र समोर दिसत आहे. जेथे लोकांच्या हिताचे निर्णय होतात, तेथे तरी नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे. पण विरोधी पक्ष आज स्वतःची जबाबदारी विसरल्यासारखा वागत आहे. राज्यसभा आणि लोकसभेचे पावित्र्य कायम राहावे, हीच अपेक्षा. ■

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भूमी व मालमत्ता विभागाची गाळे सील मोहीम सुरूच

## थकबाकीपोटी पथकाने केले ४ गाळे सील

### महापालिकेच्या ६ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी हजाराचा दंड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जुलै-**

सोलापूर : महापालिकेच्या मालकीच्या गाळ्यांच्या थकबाकीदारांविरोधात सोलापूर महापालिकेने कारवाईचा बडगा उगारला असून थकीत भाडे न भरल्यामुळे ४ गाळे सील करण्यात आले. तसेच लॅन्ड फीच्या पथकाने एकही गाळा सिल न केल्याने संपूर्ण पथकातील ६ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी एक हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

महापालिकेने गाळेधारकांसाठी ६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत अभय योजना-२०२६ लागू केली आहे. या योजनेत मेजर व मिनी गाळेधारक, खुली जागाधारक, अधिकृत खोकेधारक, बीओटी गाळेधारक, १५६ गाळेधारक तसेच टी.पी. ३/२३ अंतर्गत येणारे भाडेकरू यांना मार्च २०२६ अखेरची संपूर्ण थकबाकी आणि २०२६-२७ च्या सहामाहीचे भाडे एकरकमी भरल्यास १०० टक्के दंड व व्याज माफी मिळणार आहे.

महापालिका गाळे धारकांसाठी अभय योजना लागू करण्यात आली मात्र अद्यापही अनेक गाळेधारक थकबाकी भरत नसल्याचे दिसून येते. यामुळे भूमी मालमत्ता विभागाकडून गाळा सील करण्याची कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार सहाय्यक आयुक्त विनोद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली गाळे सील करण्याची मोहीम सुरू आहे. या मोहिमेंतर्गतच विविध ठिकाणचे चार गाळे सील केले आहेत. मंगळवारी थकबाकी पोटी २ मिनी गाळे व २ मेजर गाळे सिल केले असून लॅन्ड फी चे पथकाने एकही गाळा सिल न केल्याने संपूर्ण पथकातील ६ कर्मचारी यांना प्रत्येकी १ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे

दरम्यान, सोलापूर महापालिकेचे एकूण ७२६ मेजर गाळे असून त्यापैकी १६४ गाळेधारकांकडे थकबाकी आहे. महापालिकेच्या एकूण ६५६ मिनी गाळ्यांपैकी १५२ गाळेधारक हे थकबाकीदार आहेत. मिनी आणि मेजर असे दोन्ही मिळून एकूण १,३८३ गाळ्यांपैकी ३१६ गाळे धारकांकडे मोठी थकबाकी आहे. तसेच महापालिकेच्या एकूण ३८० खुल्या जागा आहेत. त्यापैकी २६७ जणांकडे लँड फीची मोठ्या प्रमाणात थकबाकी आढळून येत आहे.

महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते व संबंधित समिती अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबविण्यात येत आहे. भाड्यासह एसजीएसटी व सीजीएसटीची रक्कम ३१ जुलैपूर्वी भरल्यासच या सवलतीचा लाभ मिळणार आहे. मुदत संपल्यानंतर कोणतीही सवलत दिली जाणार नसल्याने सर्व संबंधितांनी वेळेत थकबाकी भरून योजनेचा लाभ घेऊन कटू कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी केले आहे.

# कोयत्याचा धाक दाखवून मित्रांना लुबाडले; २ लाखांचा ऐवज लुटला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जुलै-**

लघुशंकेसाठी थांबलेल्या तिघा मित्रांना १० अज्ञात दरोडेखोरांनी कोयत्याचा धाक दाखवून बेदम मारहाण केली आणि तब्बल २ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज बळकावून पोबारा केला. दरोड्याची घटना विजापूर रोडवरील हॉटेल निशालगगत असलेल्या मोकळ्या मैदानात रविवार १९ जुलै पहाटे २ ते २.१५ वाजेच्या सुमारास घडली. मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या या दरोड्यामुळे विजापूर रोड परिसरातील नागरिक व वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान या प्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत संजय केरबा भडंगे (वय ४८, रा. आंबेडकर नगर, अय्यंगार बेकरीच्या मागे, विजापूर रोड, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. रविवारी पहाटे यातील फिर्यादी संजय भडंगे व त्यांचे मित्र रात्रीच्या सुमारास विजापूर रोडवरील हॉटेल निशालगगत असलेल्या मोकळ्या मैदानात स्ट्रीट लाईटच्या उजेडात थांबले होते. याच दरम्यान ५ वेगवेगळ्या मोटारसायकल्सवरून आलेल्या तब्बल १० अनोळखी इसमांनी अचानक त्यांच्यावर हल्ला केला. आरोपींपैकी काहींच्या हातात कोयते होते. कोयत्याचा धाक दाखवून त्यांना जीवे मारण्याची भीती घालण्यात आली. फिर्यादी आणि त्यांच्या मित्रांनी या लुटीला विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आणि त्यांच्याकडील रोख रकमेसह सोन्याचे दागिने मिळून २ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज लुटून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहे.

# डंपरची घराला धडक; तीन जण थोडक्यात बचावले

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.२२ जुलै-**

उमरड (ता.करमाळा) येथे कुंभेजफाटा ते करपडीफाटा रस्त्यावर रात्री अकराच्या सुमारास एक भीषण दुर्घटना घडली. सिमेंट काँक्रीट मटेरियल घेऊन जाणारा एक भरधाव डंपर रस्त्याशेजारी असलेल्या विजय सोनवणे यांच्या घरात थेट घुसला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, घराचे नुकसान झाले. देशमुख कंपनीचा डंपर कामानिमित्त या मार्गावरून जात होता. उमरड गावानजीक रोडवर तीव्र उतार असल्याने रात्री अकराच्या सुमारास चालकाचा डंपरवरील ताबा सुटला. हा डंपर थेट विजय सोनवणे यांच्या घरावर जाऊन धडकला व पलटी झाला. अपघात झाला तेव्हा सोनवणे कुटुंबातील तीन सदस्य घरात होते. डंपरचा वेग प्रचंड असल्याने मोठा आवाज झाला, मात्र घरातील तिन्ही जण थोडक्यात बचावले. या भीषण धडकेमुळे सोनवणे यांच्या घराचे शटर तुटले असून भिंतींना तडे गेले आहेत. डंपरमध्ये असलेले सिमेंट, वाळू आणि खडीचे मिश्रण संपूर्ण घरात पसरले आहे.



# ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने 'भाऊ चषक' क्रिकेट स्पर्धा सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

ईच्छा भगवंताची बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच प्रभाग क्र.२२चे भाजप नगरसेवक किसनभाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'भाऊ चषक' भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेस सुरवात झाली. नेहरूनगर येथील शासकीय क्रीडांगणावर २२ ते २५ जुलैदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत १६ संघातील २५० खेळाडू सहभागी होत आहेत. स्पर्धेतील प्रथम तीन संघास ४६,२३ व ११ हजार व ट्रॉफी देण्यात येणार असून, मॅन ऑफ द मॅच, मॅन ऑफ द सिरीज व मालिकावीर असे वैयक्तिक पुरस्कारही प्रदान करण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन बुधवारी महापौर विनायक कोंडयाल व सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्या हस्ते झाले. यावेळी नगरसेवक किसन जाधव, नगरसेविका चैत्राली शिवराज गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, चेतन नागेशअण्णा गायकवाड, प्रेम गायकवाड व कार्तिक जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचे स्वागत नगरसेवक किसन जाधव यांनी केले. याप्रसंगी महापौर विनायक कोंडयाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नगरसेवक किसनभाऊ जाधव यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत, अशा स्पर्धांमुळे युवकांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध होत असल्याचे सांगितले. सभागृह नेते नरेंद्र काळे यांनीही स्पर्धेचे कौतुक करत युवकांनी क्रीडाक्षेत्रात मोठी भरारी घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. नगरसेवक किसन जाधव म्हणाले, 'भाऊ चषक' टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा उद्देश केवळ सामने आयोजित करणे नसून, टेनिस क्रिकेटला जागतिक दर्जाची ओळख मिळावी आणि येथील खेळाडूंना मोठ्या व्यासपीठापर्यंत पोहोचण्याची संधी मिळावी, यासाठीचा हा छोटासा प्रयत्न आहे.

# रोटरी क्लब ऑफ अक्कलकोटच्या नूतन कार्यकारिणीचे २६ जुलैला पदग्रहण

**अक्कलकोट, दि. २२ जुलै-**

रोटरी क्लब ऑफ अक्कलकोट यांच्या २०२६-२७ या वर्षासाठी नवनिर्वाचित नुतन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभाचे रविवार २६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता होईल. या वर्षासाठी संजीवकुमार किरनळ्ळी अध्यक्षपदी, डॉ. प्रमोद सुतार सचिवपदी आणि सागर हळगोदे यांची कोषाध्यक्षपदी निवड झाली. हा पदग्रहण सोहळा येथील श्रीमंत कांतामती भोसले मंगल कार्यालय, मैंदर्गी रोड येथे संपन्न होणार आहे.

**भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर**
**ICAR - National Research Centre On Pomegrante**
(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
(ISO 9001:2015 Certified Institute)

**Auction Notice**

Public auction of **Green Cavendish Bananas (Appx. Qty. 45000 Kg)** will be held at ICAR-NRCP, Solapur on **27/07/2026** at 11:30 AM on as is where is basis. For more details please visit our website nrcpomegranate.in.

Sd/-
SENIOR ADMINISTRATIVE OFFICER

# पावसाच्या लहरीपणामुळे बळीराजाने आपत्कालीन पीक नियोजनावर भर द्यावा

## डॉ. नितीनकुमार रणशूर यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**



पावसाचे बदलते स्वरूप लक्षात घेता प्रतिकूल हवामानावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी 'आपत्कालीन पीक नियोजना'वर भर द्यावा, असा सल्ला अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प तथा सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषी संशोधन केंद्र सोलापूरचे डॉ. नितीनकुमार रणशूर यांनी दिला आहे. महाराष्ट्रात जुलैच्या दुसऱ्या पंधरवड्यात (पाऊस ६ आठवडे उशिरा) पाऊस झाल्यामुळे पारंपरिक पिके न घेता जमिनीच्या प्रकारानुसार पर्यायी व कमी कालावधीच्या पिकांची निवड करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



डॉ. नितीनकुमार रणशूर, प्रमुख शास्त्रज्ञ, महाराष्ट्रात साधारणपणे या पावसाची परिस्थिती उद्भवू शकतात.

यामध्ये मान्सूनचे लवकर आगमन होणे, मोसमी पावसाची सामान्य सुरुवात तद्नंतर लगेच दीर्घकाळ कोरडा कालावधी, मान्सूनचे उशीरा आगमन, मोसमी पावसाची लवकर समाप्ती, विस्तारित पावसाळा, अतिवृष्टी यामुळे आता आपत्कालीन पीक नियोजनावर भर देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील बऱ्याच भागात जुलैच्या दुसऱ्या पंधरवड्यात पाऊस झाल्याने आप्तकालीन पीक नियोजन करणे गरजेचे आहे. पीक नियोजन करताना पारंपारिक पिके न घेता पर्यायी पीक घेणे गरजेचे आहे आहे. त्याच बरोबर जमिनीच्या खोलीनुसार पीक घेणे हे देखील आवश्यक आहे

जुलै चा दुसरा पंधरवड्यात खरीप पिकांची पेरणी करताना जमिनीत पुरेसा ओलावा (किमान ८० ते १०० मि.मी. पाऊस पडल्यानंतर) असणे आवश्यक आहे. कमी कालावधीत येणारी पिके निवडावीत आणि दुबार पेरणीचे संकट टाळण्यासाठी कोरडवाहू शेतीचे योग्य नियोजन करावे. जुलै चा दुसऱ्या पंधरवड्यात खरीप पिकांची लागवड करताना महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीच्या तज्ञांनी तयार केलेल्या खालील महत्वपूर्ण शिफारशीत उपाययोजना केल्यास शेतकऱ्यांचे होणारे संभाव्य नुकसान टळू शकते, असेही त्यांनी शेवटी सांगितले आहे.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022
IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तांचे रोखीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी कायदा (सरफेसी कायदा), २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यात अपयशी ठरल्यामुळे आणि खात्यांमध्ये अनियमितता आल्यामुळे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. त्यांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देणे असलेली रक्कम, जारी केलेल्या संबंधित नोटिसींनुसार खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केली आहे. सदर रक्कमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 127594407 | गृहकर्ज | १. विवेकानंद शांताराम वजाळे<br>२. विश्वजित विवेकानंद वजाळे | 09/07/2026 | INR 6,01,555.42/- |

**मालमत्तेचा पत्ता :** मौजे बोरगाव, तालुका : माळशिरस, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३११२ येथील निवासी मालमत्तेचा संपूर्ण भूखंड, एन. ए. गट क्र. ३६९, क्षेत्र ७२.००.०० आर, चौरस मीटर (७२००.०० चौरस मीटर) यापैकी विवेकानंद शांताराम वजाळे यांचे क्षेत्र १.००.०० आर, चौरस मीटर (१००.०० चौरस मीटर), ज्याची बोरगाव ग्रामपंचायत मिळकत क्र. ८६० आहे, आणि एकत्रित चतु:सीमा खालीलप्रमाणे आहे: पूर्व : सामायिक रस्ता, पश्चिम : प्लॉट क्र. १९, उत्तर : गट क्र. ३५९, दक्षिण : प्लॉट क्र. २१

याद्वारे आपणास उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ही रक्कम सदर प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत भरणे आवश्यक आहे, अन्यथा **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** देणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, अधोस्वाक्षरीकारांना वरील गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुध्द सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये आपणास सदर सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंधित करण्यात येत आहे.

दिनांक : 23/07/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)

Truhome FINANCE
**मागणी सूचना**
**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
**(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )**
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार यांनी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )** कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** चे असे म्हणणे आहे की , हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत . म्हणून ह्या खात्याचे वर्गीकरण एनपीएममध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम -२००२ (सरफेसी कायदा)अन्वये आणि कलम-१३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्यावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सुचने व्यतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.
कलम १३(२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार , सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रकमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु. |
|---|---|---|
| **कर्ज खाते क्रमांक (LAN) : SHLHSOLR0000539**<br>**१. श्री. शिवकुमार काशीनाथ सुतार (कर्जदार)**<br>**२. सौ. अंजली शिवकुमार सुतार (सह-कर्जदार)**<br>**सध्याचा पत्ता :अक्षय सोसायटी, घर क्र. १७६, ज्युले सोलापूर, पाण्याच्या टाकीजवळ, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र – ४१३००४.**<br>**तसेच : मालमत्तेचा पत्ता : मौजे कोंडी, प्लॉट क्र. ६, गट क्र. २०/२-ब/१-ब, दर्ग्याजवळ, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर – ४१३२५५.**<br>**कर्ज रक्कम : रु. २१,९३,०९२/-**<br>**एन.पी.ए. दिनांक : ०५/०७/२०२६** | मौजे कोंडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील गट क्र. २०/२/ब/१/ब मधील प्लॉट क्र. ६, विक्रीखताप्रमाणे १९३.५० चौ. मीटर क्षेत्रफळाचा तसेच ७/१२ उताऱ्यानुसार १९०.५० चौ. मीटर क्षेत्रफळाचा भूखंड व त्यावरील संपूर्ण बांधकामासह, जो सोलापूर जिल्हा परिषदेच्या हद्दीत येतो.<br>चतु:सीमा :पूर्वेस : प्लॉट क्र. ७<br>पश्चिमेस : प्लॉट क्र. ५<br>दक्षिणेस : अंतर्गत रस्ता<br>उत्तरेस : गट क्र. १८-ब | मागणी सूचना दिनांक : १५/०७/२०२६<br>मागणी सूचना रक्कम : कर्ज खाते क्रमांक SHLHSOLR0000539 अंतर्गत दिनांक ०९/०६/२०२६ रोजी देय असलेली रु. २३,२२,४९७.००/- (अक्षरी रुपये तेवीस लाख बावीस हजार चारशे सत्त्याण्णव फक्त), तसेच त्यावर यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज व अनुषंगिक खर्च, शुल्क इत्यादीसह. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते कि, हि नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम -१३ (१३) नुसार सादर वर्णित मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री , भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २३/०७/२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

"SHRI SHIVAJI SHIKSHAN PRASARAK MANDAL, BARSHI'S"
**SHRI SHIVAJI MAHAVIDYALAYA, BARSHI, DIST. SOLAPUR**

**Walk In Interview (Non Grant Jr. Section) 2026-2027**

The Candidates are invited for walk in interview on 01/08/2026 at 11.00 am in the office of Principal, Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi, Dist. Solapur **Along with Original Testimonials and Attested Xerox Copies** for the following posts of Junior College Teachers on Contract Basis.

| Sr.No | Section/ Subject (particulars of posts) | Educational Qualification |
|---|---|---|
| A. | **Bi-Focal Jr. Level (Non Grant Section)** | |
| 1. | Computer Science subject | |
| | 1) Teacher | M.Sc.Computer Science/MCM/BE Computer with 1st Class /M.Tech Computer Science. |
| 2. | Electronics | |
| | 1) Teacher | M.Sc.Electronics/B.E. Electronics 1st Class./ M.Sc.Electronics science. |
| | 2) Instructor | DIE 1st class |
| 3. | Information Technology | |
| | 1) Teacher | MCA/MCS/M.Sc. Computer Science / M.C.M. with B.Ed. M.Sc. / M.A. / M.Com., ADCSSAA with B.Ed. |
| 4. | Fresh Water Fish Culture | |
| | 1) Teacher | M.Sc. IInd class Zoology/Fishery |
| | 2) Instructor | B.Sc. Zoology/ Fishery. |
| 5. | Crop Science | |
| | 1) Teacher | M.Sc.Agri IInd class |
| | 2) Instructor | B.Sc.Agri IInd class |
| 6. | Horticulture | |
| | 1) Teacher | M.Sc. Agri IInd class |
| | 2) Instructor | B.Sc.Agri IInd class |
| B. | **Junior College Teacher: Non-Grant** | |
| 1. | Biology | M.Sc. (Biology) - IInd Class, B.Ed. |
| 2. | Physics | M.Sc. (Physics) - IInd Class, B.Ed. |
| 3. | Chemistry | M.Sc. (Chemistry) - IInd Class, B.Ed. |

1) Experienced Candidates having higher qualification will be preferred
2) Appointments are on purely temporary basis.

**Dr. A.B. Shaikh**, Pricipal
**Shri.N.N.Jagdale**, Chairman, School Committee.
**Shri. P.T. Patil**, General Secretary, Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi
Shri Shivaji Mahavidyalaya, arshi, Dist Solapur-413411

**सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि., सोलापूर**
मुख्यकार्यालय - २०५, पुर्व मंगळवार पेठ, सोलापूर - ४१३००२
फोन ०२१७-२६२६८११, २७४२९१० Email ID: ho@sssbl.bank.in

**ताबा नोटीस**
**(U/s.13 (4) of SARFAESI Act read with rule 8 of the Security Interest (Enforcement) Rules, 2002)**

ज्याअर्थी सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि., सोलापूर (यानंतर ''बँक'' म्हणून संबोधले जाईल) चे प्राधिकृत अधिकारी यांनी सेक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल असेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समन्ट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत कलम १३(१२) अन्वये तसेच सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट, २००२ नियम ३ अंतर्गत मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन खालील कर्जदारास व त्यांच्या जामिनदारास दिनांक ३०/०५/२०२६ रोजी सरफेसी कायदा अंतर्गत कलम १३(२) अन्वये कर्जाच्या परतफेडीसाठी मागणी नोटीस बजावली होती. संबंधित कर्जदार व जामिनदार यांना मागणी नोटीसामध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्जबाकी रक्कम ६० दिवसाच्या आत परतफेड करण्याबाबत नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते.

कर्जदार व जामिनदार यांना कलम १३ (२) मागणी नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ''माझी/आमची सध्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत प्रतिकूल आणि अडचणीची असून नजीकच्या काळात, भविष्यात कर्जाची नियमित परतफेड करणे अथवा संपूर्ण थकबाकी अदा करणे शक्य होईल अशी अपेक्षा नाही. त्यामुळे बँकेने ६० दिवसांची मुदत पूर्ण होण्याची प्रतिक्षा न करता कर्जासाठीच्या तारण/गहाण स्टॉक तसेच मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा घेण्यास माझी/आमची कोणतीही हरकत नाही. मी/आम्ही कर्जासाठीच्या तारण/गहाण स्टॉक तसेच मालमत्तांचा ताबा स्वखुशीने, कोणत्याही दबाव, धमकी, प्रलोभन अथवा गैरसमजाशिवाय बँकेकडे सुपूर्द करण्यात तयार आहोत ''असे पत्र / लेखी म्हणणे दिले आहे.

कर्जदार/जामिनदार यांनी स्वेच्छेने तारण माल/तारण मिळकतींचा ताबा देवू केल्याने तसेच थकबाकीदारांनी रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, खाली सही करणार प्राधिकृत अधिकारी यांनी खालील नमूद मिळकतीचा ''प्रत्यक्ष ताबा'' घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव व पत्ता | कर्ज प्रकार, खाते क्र. व कर्ज रक्कम | १३(२) मागणी नोटीस नुसार दि. ३०/०४/२०२६ अखेर व्याजासह येणेबाकी | ताबा दि. व प्रकार |
|---|---|---|---|---|
| १. | **१. संजय चंद्रकांत पुजारी (सिध्दार्थ कलेक्शन या फर्म चे प्रोप्रायटर)** (कर्जदार/तारण मिळकतदार) पत्ता - बसवनगर तेरा मैल पोस्ट मंद्रुप ता.दक्षिण सोलापूर जि. सोलापूर ४१३२१३<br>**२. सुरज अजय देशमुख** (जामीनदार) पत्ता - लॅण्डमार्क अपार्टमेंट, प्रधान रुग्णालय जवळ, ४८, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१<br>**३. चंद्रकांत आमसिध्द बाराचारे** (जामीनदार) पत्ता - मु.पो.कुंभारी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर ४१३००६<br>**४. विद्यानंद साहेबराव देशमुख** (जामीनदार) पत्ता - कुरघोट रोड, देशमुख वस्ती, मु.पो.मंद्रुप ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर ४१३२२१<br>**५. दयानंद चंद्रकांत बाराचारे** (जामीनदार) पत्ता - मु.पो.कुंभारी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर ४१३००६ | १) हायपोथिकेशन कर्ज क्र. 1012032000065 कर्ज रक्कम रु. १,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख मात्र)<br>२) टर्म कर्ज ऑदर सिक्युरिटी क्र. 1012031000030 कर्ज रक्कम रु. १,२५,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पंचवीस लाख मात्र)<br>३) लोन अगेन्स्ट प्रॉपर्टी क्र. 1012114000001 कर्ज रक्कम रु. ७५,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर लाख मात्र) | १) १,५४,३२,१०९.०० (अक्षरी रुपये एक कोटी चोपन्न लाख बत्तीस हजार एकशे नऊ मात्र)<br>२) १,१८,८५,३४७.०० (अक्षरी रुपये एक कोटी अठरा लाख पंच्याऐंशी हजार तीनशे सत्तेचाळी मात्र)<br>३) ६१,२३,२१६.०० (अक्षरी रुपये एकसष्ट लाख तेवीस हजार दोनशे सोळा मात्र)<br>अधिक पुढील झाले व होणारे व्याज, अचानक होणारे खर्च, शुल्क इ. वगैरे. | २०/०७/२०२६ प्रत्यक्ष ताबा |

ज्याअर्थी, वरील कर्जदार व जामिनदार यांनी कर्ज परतफेड करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांना मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन सरफेसी कायदा कलम १३(४) आणि नियम ८ अन्वये खालील वर्णन केलेल्या तारण माल / तारण मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा (Physical Possession) घेतला आहे.

कर्जदार, जामिनदार व विशेषत: मिळकतधारक आणि सर्व लोकांना सावध करण्यात येते कि, खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे कोणत्याही प्रकारे व्यवहार करुन नये जर केल्यास सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि., सोलापूर शाखा मंद्रुप यांना आधीन राहाल, याची नोंद घ्यावी.

**तारण माल / मिळकतीचे वर्णन -**

अ. दुकानातील सर्वप्रकारचा हायपोथिकेटेड सर्व माल स्टॉक, बुक डेब्ट आणि सर्व करंट असेटस (फर्म-सिध्दार्थ कलेक्शन प्रोप्रायटर संजय चंद्रकांत पुजारी पत्ता - प्लॉट नं. १३४ व १३५ बसवनगर ता. दक्षिण सोलापूर)
ब. तारण मिळकती
- रहिवासी / दुकान जागा व त्यावरील बांधकाम-डि व सब डि सोलापूर ता. दक्षिण सोलापूर मौजे बसवनगर, ग्रामपंचायत हद्दीतील जुना गट नं. (९९९) १/१, नविन गट नं. १/१, प्लॉट नं. १३४ क्षेत्र १३९.५० चौ.मी. त्यावरील बांधकामासह त्याची चतु:सिमा **पुर्वेस-रोड, पश्चिमेस-रोड, दक्षिणेस-प्लॉट नं. १३५, उत्तरेस-प्लॉट नं. १३३.**
- रहिवासी / दुकान जागा व त्यावरील बांधकाम-डि व सब डि सोलापूर ता. दक्षिण सोलापूर मौजे बसवनगर, ग्रामपंचायत हद्दीतील जुना गट नं. (९९९) १/१, नविन गट नं. १/१, प्लॉट नं. १३५ क्षेत्र १२६ चौ.मी. त्यावरील बांधकामासह त्याची चतु:सिमा **पुर्वेस-रोड, पश्चिमेस-रोड, दक्षिणेस-रोड, उत्तरेस-प्लॉट नं. १३४.**
- बिगरशेती खुले प्लॉट - डि व सब डि सोलापूर ता.दक्षिण सोलापर मौजे बसवनगर, ग्रामपंचायत हद्दीतील, गट नं. १/२अ, बिगरशेती खुले प्लॉट नं. १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१ (प्लॉट नं. १ ते २१)

(वरील सर्व मिळकती संजय चंद्रकांत पुजारी यांच्या मालकीच्या आहेत.)

ही ताबा नोटीस दिली तारीख : २३/०७/२०२६
स्थळ - सोलापूर

आर.बी.शर्मा
प्राधिकृत अधिकारी
सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि., सोलापूर

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### गोलरक्षक गिलेर्मो ओचोआ निवृत्त

**मेक्सिको :** मेक्सिकोचा अनुभवी गोलरक्षक गिलेर्मो ओचोआ याने निवृत्ती जाहीर केली.



सहा फिफा विश्वचषक स्पर्धेत मेक्सिकोचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ओचोआने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक भावनिक व्हिडिओ शेअर करून निवृत्तीची घोषणा केली. यादरम्यान, त्याने त्याचे कुटुंब, सहकारी आणि करोडो चाहत्यांचे मनापासून आभार व्यक्त केले. आपल्या निवृत्तीची घोषणा करताना ओचोआ म्हणाला, मला कधीच वाटले नव्हते की एखादे स्वप्न मला इतक्या दूर घेऊन जाईल. आज मी अभिमानाने मागे वळून बघू शकतो आणि मला एवढेच म्हणायचे आहे - धन्यवाद. माझे कुटुंब, माझे सहकारी आणि या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर माझ्यासोबत असलेल्या प्रत्येक चाहत्याचे आभार. लाखो लोकांचे प्रेम आणि मी मेक्सिकोसाठी सर्व काही दिल्याचे समाधान घेऊन मी निघालो. आम्ही एकत्र घालवलेले क्षण कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. तुम्हा सर्वांचे मनःपूर्वक आभार. फिफा विश्वचषक स्पर्धेतील सहा संघांचा भाग होण्याचा मान मिळालेल्या निवडक खेळाडूंमध्ये गिलेर्मो ओचोआचे नाव समाविष्ट आहे.

### पदकांचा दुष्काळ संपवू : हरमनप्रीत सिंग

**नवी दिल्ली :** टोकियो ऑलिम्पिकपूर्वी जशा भावना होत्या, तशाच आताही आहेत आणि माझी तयारीही तितकीच जोरदार आहे, कारण विश्वचषकातील पाच दशकांचा पदकांचा दुष्काळ संपवणे हेच आमचे एकमेव ध्येय आहे, असे भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग म्हणाला. ४१ वर्षांनंतर २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या आणि २०२४ मध्ये पॅरिसमध्ये आपल्या कर्णधारपदाखाली त्याची पुनरावृत्ती करण्याची आशा बाळगणाऱ्या हरमनप्रीतला याची पूर्ण जाणीव आहे की, अनेक खेळाडूंसाठी विश्वचषक जिंकण्याची ही शेवटची संधी असू शकते. तो म्हणाला, ज्याप्रमाणे आम्ही ४१ वर्षांनंतर टोकियोमध्ये ऑलिम्पिक पदक जिंकले, त्याचप्रमाणे आम्हालाही ५० वर्षांचा विश्वचषकाचा दुष्काळ संपवायचा आहे. आम्ही त्याच मानसिकतेने आणि त्याच तयारीने मैदानात उतरू. पण कोणताही दबाव नाही, ही आमची जबाबदारी आहे.

### अलीरेझा फिरौजा चेन्नई ग्रॅण्डमास्टर्स विजेता

**चेन्नई :** फ्रान्सचा ग्रॅण्डमास्टर अलीरेझा फिरौजाने बुधवारी भारतीय ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगसीविरुद्ध सातवी आणि अंतिम फेरी बरोबरीत सोडवून चेन्नई ग्रॅण्डमास्टर्स २०२६ चे विजेतेपद पटकावले. स्पर्धेच्या अंतिम फेरीपूर्वी, फिरौजा ४ गुणांसह आघाडीवर होता आणि अर्जुन एरिगसी व उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव यांच्यापेक्षा अर्ध्या गुणाने पुढे होता. विजेतेपद जिंकण्यासाठी त्याला फक्त बरोबरीची गरज होती. त्याने अर्जुनविरुद्धचा सामना ४१ चालींनंतर बरोबरीत सोडवला आणि ४.५ गुणांसह विजेतेपद निश्चित केले. दुसरीकडे, काळ्या सोंगट्यांनी जिंकून विजेतेपदाच्या शर्यतीत टिकून राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोवचा रशियाच्या दिमित्री आंद्रेकिनने ३७ चालींमध्ये पराभव केला. या पराभवानंतर, फिरुझाला विजेतेपद मिळवण्यासाठी एक सामना अनिर्णीत ठेवणे पुरेसे होते.

### अव्वल फलंदाजासाठी गिलला हवा एक गुण

**नवी दिल्ली :** इंग्लंडविरुद्धच्या मालिकेनंतर बुधवारी जाहीर झालेल्या ताज्या एकदिवसीय फलंदाजी क्रमवारीत भारताचा कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार शुभमन गिल, अनुभवी फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्यासह अव्वल पाचमध्ये आहे. गिल न्यूझीलंडचा जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा फलंदाज डॅरिल मिचेलच्या अगदी जवळ पोहोचला आहे. ■

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आजपासून

## ३२ वर्षांतील सर्वात लहान राष्ट्रकुल स्पर्धा, भारताचे लक्ष अॅथ्लेटिक्स, वेटलिफ्टिंग आणि बॉक्सिंगवर



स्कॉटलंडमधील ग्लासगो येथील एसईसी सेंटरमध्ये ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ चा अधिकृत शुभंकर 'फिनी'

### भारताचे प्रमुख पदक दावेदार

**अॅथ्लेटिक्स :** भालाफेकीतील स्टार नीरज चोप्रा सुवर्णपदकाचा मुख्य दावेदार आहे. त्याची सर्वात मोठी स्पर्धा पाकिस्तानचा विद्यमान ऑलिम्पिक विजेता अर्शद नदीमसोबत असेल. मुरली श्रीशंकर (लांब उडी), प्रवीण चित्रवेल (तिहेरी उडी) आणि गुलवीर सिंग (लांब पल्ल्याची धाव) हे देखील पदकाचे दावेदार आहेत.

**भारोत्तोलन :** ऑलिम्पिक पदक विजेती मीराबाई चानू महिलांच्या ४८ किलो वजन गटात सुवर्णपदकासाठी एक प्रबळ दावेदार आहे. बिंदियारानी देवी आणि ज्ञानेश्वरी यादव यादेखील पदकासाठी स्पर्धेत आहेत.

**बॉक्सिंग :** ऑलिम्पिक पदक विजेती लव्हलिना बोरगोहेन आणि विश्वविजेती जस्मिन लँबोरिया संघाचे नेतृत्व करत आहेत. साक्षी चौधरी आणि प्रीती पवार यादेखील सुवर्णपदकाच्या शर्यतीत आहेत.

**इतर खेळ :** ज्युडोमधील तुलिका मान, लॉन बॉल संघ आणि पॅरा-अॅथ्लेटिक्समधील विश्वपदक विजेता सोमन राणा हे भारताच्या प्रमुख पदक दावेदारांपैकी आहेत. ■

**ग्लासगो, २२ जुलै**

फुटबॉल विश्वचषकाचा उत्साह संपल्यानंतर, भारतीय क्रीडाप्रेमींचे लक्ष आता स्कॉटलंडमध्ये २३ जुलैपासून सुरू होणाऱ्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेकडे लागले आहे. ग्लासगो येथे होणाऱ्या २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारताच्या मोहिमेची सुरुवात गुरुवारी लॉन बॉल स्पर्धेने होत आहे. भारताने २०२२ च्या बर्मिंगहॅम गेम्समध्ये या खेळात एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक जिंकले होते. यावेळी खेळाडूंची संख्या कमी असल्याने, भारताच्या पदकाच्या मुख्य आशा अॅथ्लेटिक्स, वेटलिफ्टिंग आणि बॉक्सिंगवर अवलंबून आहेत.

इंग्लंडमधील बर्मिंगहॅम येथे होणाऱ्या २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील २० खेळांच्या तुलनेत, ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत केवळ १० खेळांचा समावेश आहे. गेल्या ३२ वर्षांतील कोणत्याही राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत समाविष्ट असलेल्या खेळांची ही सर्वात कमी संख्या आहे. यापूर्वी १९९४ मध्ये कॅनडातील व्हिक्टोरिया येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत १० खेळांचा समावेश होता. ग्लासगो २०२६ मधील खेळांची संख्या कमी होणे हा भारतासाठी एक मोठा धक्का आहे. कारण कुस्ती, नेमबाजी, बॅडमिंटन आणि टेबल टेनिस यांसारखे अनेक प्रमुख खेळ यावेळी यादीतून वगळण्यात आले. ◂ (वृत्तसंस्था)

### येथे पाहता येईल स्पर्धा

२०२६ चे राष्ट्रकुल खेळ सोनी स्पोर्ट्स नेटवर्क आणि दूरदर्शन स्पोर्ट्सवर थेट प्रक्षेपित केले जातील. प्रेक्षक ते डीडी फ्री डिशवर देखील पाहू शकतात. खेळांचे थेट प्रक्षेपण सोनी लिव्ह अॅपवर उपलब्ध असेल. ■

# मीराबाई चानूची नजर सलग तिसऱ्या सुवर्ण पदकावर

## शेवटची स्पर्धा ४८ किलो गटात होणार

**ग्लासगो, २२ जुलै**

टोकियो ऑलिम्पिकची रौप्यपदक विजेती आणि स्टार वेटलिफ्टर मीराबाई चानू २६ जुलै रोजी ग्लासगो येथे इतिहास रचणार आहे. सलग तिसऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्ण जिंकण्याचे चानूचे लक्ष्य असेल, जे तिचे सलग चौथे पदक असेल. तरीही तिची नजर राष्ट्रकुल स्पर्धेपेक्षा आशियाई खेळांवर जास्त आहे. बर्मिंगहॅममध्ये तयारी करत असलेल्या मीराने सांगितले की, कोणत्याही मोठ्या खेळापूर्वी खेळाडू उच्च-स्तरीय फॉर्म मिळविण्याचा प्रयत्न करतात, परंतु ती ग्लासगोमध्ये जास्त प्रयत्न करणार नाही. तिला २०० किलो वजनही उचलता येणार नाही.

मीराबाई चानू ग्लासगोमध्ये ४८ किलोमध्ये खेळणार आहे, तर एशियाडमध्ये तिला ४९ किलोमध्ये खेळायचे आहे. चानूला माहीत आहे की, ४८ किलोमध्ये ही तिची शेवटची स्पर्धा आहे. हे वजन आता ऑलिम्पिकमधून बाद झाले आहे. मीराने २०१४ मध्ये या वजनात रौप्य, २०१८ मध्ये गोल्ड कोस्टमध्ये सुवर्ण



आणि बर्मिंगहॅम कॉमनवेल्थ गेम्समध्ये ४९ किलोमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. ◂ (वृत्तसंस्था)

### भारताचे ध्वजवाहक

भारतीय ऑलिम्पिक संघटनेने संयुक्तपणे मीराबाई चानू आणि लोव्हलिना बोरगोहेन यांची भारतीय दलाच्या ध्वजवाहक म्हणून नियुक्ती केली आहे. दोन महिला खेळाडूंना ही जबाबदारी मिळणे हे भारतीय क्रीडा क्षेत्रातील महिलांच्या वाढत्या भूमिकेचे प्रतीक मानले जात आहे. ■

### राष्ट्रकुल स्पर्धेच्या समारोपात शंकर महादेवनचा सहभाग

**ग्लासगो :** गायक-संगीतकार शंकर महादेवन आणि बॉलीवूड अभिनेत्री रश्मिका मंदान्ना २ ऑगस्ट रोजी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या समारोप समारंभात भारताच्या सांस्कृतिक सादरीकरणात आकर्षणाचे केंद्र असतील. याच दिवशी अहमदाबाद येथे होणाऱ्या २०३० शताब्दी आवृत्तीचे यजमान म्हणून राष्ट्रध्वज अधिकृतपणे स्वीकारला जाईल. राष्ट्रकुल खेळांचा ध्वज औपचारिकपणे समारोप समारंभात भारताकडे सुपूर्द केला जाईल, जो पुढील यजमानाकडे जबाबदारी सोपवण्याचे प्रतीक आहे.

भारताचे सादरीकरण अंदाजे २० मिनिटे चालेल आणि २०३० च्या खेळांची झलक देणाऱ्या संगीत, नृत्य आणि पारंपरिक कामगिरीद्वारे देशाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा दर्शवेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी या समारंभाला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. ■

# भारताचा विजयाच्या मार्गावर परतण्याचा प्रयत्न

## झिम्बाब्वेविरुद्ध पहिला टी-२० सामना आज

**हरारे, २२ जुलै**

तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात गुरुवारी जेव्हा तरुण भारतीय संघ आत्मविश्वासपूर्ण झिम्बाब्वेचा सामना करेल, तेव्हा कर्णधार म्हणून आपला पहिला विजय नोंदवण्यासाठी श्रेयस अय्यर उत्सुक राहणार आहे.

कर्णधार म्हणून आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्ध खेळलेल्या आपल्या पहिल्या सात टी-२० सामन्यांपैकी सहा सामने गमावलेल्या अय्यरकडे संघाला पुन्हा विजयाच्या मार्गावर आणण्याची सुवर्णसंधी आहे. झिम्बाब्वेविरुद्ध विजय अपेक्षित आहे, पण जर ते हरले, तर ड्रेसिंग रूमची अवस्था काय असेल याची केवळ कल्पनाच करता येते. यात १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीचाही समावेश आहे.

भारताने या दौऱ्यासाठी व्हीव्हीएस लक्ष्मणची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. संजू सॅमसनला संघातून वगळण्यात आल्याने, अभिषेक शर्मासोबत डावाची सुरुवात करणाऱ्या 'वंडर बॉय' सूर्यवंशीवर पुन्हा एकदा सर्वांच्या नजरा असतील. अभिषेक



श्रेयस अय्यर



सिकंदर रजा

### आजचा सामना

**भारत विरुद्ध झिम्बाब्वे**
**स्थळ :** हरारे स्पोर्ट्स क्लब, हरारे
**वेळ :** दुपारी ४.३० वाजतापासून
**थेट प्रक्षेपण :** युनाईट ८ स्पोर्ट्सवर

आणि सूर्यवंशी यांच्या हरारे स्पोर्ट्स क्लबशी गोड आठवणी जोडलेल्या आहेत. अभिषेकने याच मैदानावर पदार्पण केले आणि दुसऱ्या सामन्यात आपले पहिले टी-२० शतक झळकावले.

सूर्यवंशीने ६ फेब्रुवारी रोजी इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघाविरुद्ध ज्युनियर विश्वचषक अंतिम सामन्यात याच मैदानावर शतक झळकावले होते. या मालिकेत एका नवीन गोलंदाजी आक्रमणाची चाचणी घेणे हे उद्दिष्ट होते, परंतु सध्याच्या खराब कामगिरीमुळे, विजय मिळवणे अनिवार्य झाले आहे.

हरारे स्पोर्ट्स क्लबची खेळपट्टी ओलसर आणि उसळणारी आहे, ज्यामुळे भारतीय फलंदाजांसमोर आव्हाने उभी राहू शकतात. ब्लेसिंग मुझारबानी आणि रिचर्ड नगारवा यांच्या वेगवान गोलंदाजी आक्रमणाचा सामना करणे भारतीय फलंदाजांसाठी कठीण असेल. उपकर्णधार तिलक वर्मा, जो टी-२० मध्ये तिसऱ्या क्रमांकावर एक चांगला फलंदाज आहे, तो पाचव्या क्रमांकावर खेळताना फारसा आरामदायक वाटत नाही, पण त्या जागेवर इशान किशनला खेळवले जात आहे. पाचव्या क्रमांकासाठी रिंकू सिंग हा एक चांगला पर्याय आहे, पण उपकर्णधाराला हटवणे सोपे नसेल. मयंक यादवसोबत प्रिन्स खेळणार हे निश्चित दिसत आहे. तिसऱ्या वेगवान गोलंदाजाची निवड अशोक आणि यश यांच्यापैकी एकाची केली जाईल. ◂ (वृत्तसंस्था)



स्कॉटलंडमधील ग्लासगो येथील एसईसी सेंटरमध्ये, २०२६ च्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या पृष्ठभूमीवर सराव सत्रासाठी लव्हलिना बोरगोहेन, साक्षी चौधरी, परवीन हुडा आणि इतर सदस्यांसह भारतीय बॉक्सिंग संघाचे खेळाडू दाखल झाले.

# रायचंदानीचे नाबाद शतक, १९ वर्षांखालील संघाचे वर्चस्व

**कोलंबो, २२ जुलै**

सलामीवीर लक्ष्य राजेश रायचंदानीने बुधवारी मालिकेतील आपले दुसरे शतक झळकावून, श्रीलंका १९ वर्षांखालील संघाविरुद्धच्या दुसऱ्या युवा कसोटीच्या तिसऱ्या दिवशी भारतीय १९ वर्षांखालील संघाची स्थिती आणखी बळकट केली.

रायचंदानीने मालिकेतील अनिर्णीत राहिलेल्या पहिल्या सामन्यात द्विशतक झळकावले होते. त्याने ११६ चेंडूंमध्ये नाबाद १०० धावा केल्या, ज्यामुळे दिवसाच्या



सुरुवातीला यजमान संघाला १४८ धावांवर सर्वबाद केल्यानंतर भारताला आपला दुसरा डाव २०८ धावांवर तीन गडी बाद घोषित करण्यास मदत झाली.

पहिल्या डावात शतक झळकावणाऱ्या मनल चौहानने ४६ चेंडूंमध्ये नाबाद ५१ धावा केल्या. दुसऱ्या दिवशी भारतीय गोलंदाजांच्या शानदार कामगिरीनंतर, श्रीलंका १९ वर्षांखालील संघाने तिसऱ्या दिवसाची सुरुवात १२२ धावांवर आठ गडी बाद अशी केली. ४७२ धावांच्या आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना, श्रीलंकेने तिसऱ्या दिवसाचा खेळ संपताना आपल्या दुसऱ्या डावात चार गडी गमावून १५५ धावा केल्या. भारतीय १९ वर्षांखालील संघाने पहिल्या डावात ४११ धावा केल्या. ◂ (वृत्तसंस्था)

### ललित मोदी भारतात येण्याच्या तयारीत

**नवी दिल्ली :** परकीय चलन व्यवस्थापन कायद्याशी (फेमा) संबंधित २००९ च्या आयपीएल दक्षिण आफ्रिका प्रकरणात अपीलीय न्यायाधिकरणाकडून मोठा कायदेशीर दिलासा मिळाल्यानंतर मी या वर्षाच्या अखेरीस किंवा पुढील वर्षाच्या सुरुवातीला भारत दौऱ्यावर येणार आहे, असे इंडियन प्रीमियर लीगचे माजी अध्यक्ष ललित मोदी यांनी बुधवारी सांगितले. मोदींनी या निर्णयाला आपल्या १६ वर्षांच्या कायदेशीर लढाईतील विजय म्हटले आहे. सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका व्हिडीओ संदेशात मोदी म्हणाले की, न्यायाधिकरणाच्या निर्णयामुळे या प्रकरणावरील त्यांच्या भूमिकेमागील सत्य अखेर समोर आले आहे. मी या निर्णयामुळे खूप आनंदी आहे. माझ्यासाठी हा खरोखरच एक अद्‌भुत दिवस आहे. मी १६ वर्षे लढलो आहे आणि मी प्रसारमाध्यमे व सर्वांना जे सांगत होतो ते अखेर खरे ठरले आहे, असे ते म्हणाले. ■

# भारताचा पाकिस्तानवर ७-४ ने शानदार विजय

## आशियाई चॅम्पियनशिपमध्ये ओमानही पराभूत

**मस्कत, २२ जुलै**

भारतीय सब-ज्युनियर मुलांच्या संघाने एफआयएच युवा हॉकी ५ एस आशियाई चॅम्पियनशिपच्या एलिट पूलमध्ये पाकिस्तान आणि ओमानला पराभूत करून आपली विजयी मालिका सुरू ठेवली. केतन कुशवाहाच्या नेतृत्वाखाली, भारताने प्रथम ओमानवर १४-० असा जबरदस्त विजय नोंदवला, ज्यामध्ये कर्णधार केतन कुशवाहने चार गोल केले. आशिष तानी पूर्तीने सलग तीन गोल केले. राहुल यादव आणि शाहरुख अली यांनी प्रत्येकी दोन गोल केले. प्रल्हाद राजभर, करण गौतम आणि रोमित पाल यांनीही गोल केले.

अन्य एका सामन्यात करण गौतमने सलग तीन गोल केल्यामुळे भारताने पाकिस्तानविरुद्ध ७-४ असा विजय मिळवला. भारताकडून राहुल



यादव, प्रल्हाद राजभर, कर्णधार कुशवाह आणि रोमित पाल यांनी गोल केले. पाकिस्तानकडून अस्लम मुहम्मद फरहान, अदील आणि उस्मान मुहम्मद यांनी गोल केले.

त्याच वेळी, भारतीय सब-ज्युनियर मुलींच्या संघाने चीनविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधली होती, तर दुसऱ्या एलिट पूल सामन्यात त्यांनी उझबेकिस्तानचा १६-० असा पराभव केला. ही स्पर्धा प्रथमच एफआयएच युवा हॉकी ५ एस विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता म्हणून गणली जाणार आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# सिंधू दुसऱ्या फेरीत, आयुष शेट्टी उपांत्यपूर्व फेरीत

### चायना ओपन बॅडमिंटन स्पर्धा

**चांगझू, २२ जुलै**

दोन वेळच्या ऑलिम्पिक पदक विजेत्या पीव्ही सिंधूने जपान ओपनचे विजेतेपद पटकावल्यानंतर आपली प्रभावी कामगिरी कायम ठेवत चायना ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. युवा भारतीय बॅडमिंटनपटू आयुष शेट्टीने इंडोनेशियाच्या जागतिक क्रमवारीत ११ व्या क्रमांकावर असलेल्या अल्वी फरहानला पराभूत करून मोठा धक्का दिला आणि उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

पहिल्या फेरीत, सिंधूने भारताच्या १८ वर्षीय उन्नती हुडाला तीन गेमच्या सामन्यात २१-१४, ९-२१, २१-१० असे पराभूत केले. ५६ मिनिटांच्या या सामन्यात सिंधूने पहिला गेम सहज जिंकला, पण



उन्नतीने दुसऱ्या गेममध्ये शानदार पुनरागमन करत सामना बरोबरीत आणला. निर्णायक गेममध्ये सिंधूने आपल्या अनुभवाचा फायदा उचलत एकतर्फी विजय मिळवला. या विजयामुळे सिंधूने गेल्या वर्षी याच स्पर्धेत उन्नतीकडून झालेल्या पराभवाचा बदला घेतला. दुसऱ्या फेरीत सिंधूचा सामना चीनच्या चौथ्या मानांकित आणि माजी ऑलिम्पिक विजेती चेन युफेईशी होईल. विशेष म्हणजे, सिंधूने गेल्या आठवड्यात जपान ओपनमध्ये चेन युफेईला पराभूत केले होते, ज्यामुळे तिचा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या वाढला आहे.

#### आयुष शेट्टीने दिला धक्का

पुरुष एकेरीमध्ये, युवा भारतीय खेळाडू आयुष शेट्टीने इंडोनेशियाच्या जागतिक क्रमवारीत ११ व्या क्रमांकावर असलेल्या आणि माजी विश्व ज्युनियर चॅम्पियन अल्वी फरहानला २१-१७, ५-२१, २१-१७ असे पराभूत करून १६ च्या फेरीत प्रवेश केला. आयुषने उत्कृष्ट खेळ करत पहिला गेम जिंकला, पण फरहानने दुसऱ्या गेममध्ये वर्चस्व गाजवत सामना बरोबरीत आणला. भारतीय खेळाडूने संयमी कामगिरी दाखवत निर्णायक गेम जिंकला. हा विजय आयुषसाठी विशेष होता, कारण २०२३ च्या विश्व ज्युनियर चॅम्पियनशिपच्या उपांत्य फेरीत तो फरहानकडून पराभूत झाला होता. मात्र, दुहेरी स्पर्धेत भारतीय खेळाडूंची कामगिरी निराशाजनक होती.

#### लक्ष्य सेन चर्चेत

स्पर्धेत पुढे, भारतीय स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन पहिल्या फेरीत जपानच्या युशी तनाका विरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल.

◂ (वृत्तसंस्था)

# आशियाई खेळांपूर्वी भारतीय नेमबाजांची निराशाजनक कामगिरी

## पहिल्याच दिवशी चीनला दोन्ही सुवर्णपदके

**हांगझू (चीन), २२ जुलै**

यजमान चीनने बुधवारी येथे झालेल्या आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेच्या उद्‌घाटनाच्या दिवशी वर्चस्व गाजवत दोन्ही सुवर्णपदके जिंकली, तर एकाही भारतीय नेमबाजाला पदक जिंकता आले नाही. यामुळे सप्टेंबरमध्ये जपानमध्ये होणाऱ्या आशियाई खेळांपूर्वीच्या अंतिम आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतीय नेमबाजांना सामोरे जाव्या लागणाऱ्या खडतर आव्हानाची झलक पाहायला मिळाली.

भारताची सुरुवात निराशाजनक झाली, कारण १० मीटर एअर पिस्तूल मिश्र संघातील एकही खेळाडू पात्रता फेरी पार करू शकला नाही. अनेक विश्वचषक सुवर्णपदके जिंकलेल्या सुरुची इंदर सिंग आणि केदारलिंग उचगाव यांनी एकूण ५७७ गुणांसह नववे स्थान पटकावले. भारताची दुसरी जोडी, सैन्यम आणि कमलजीत, यांनीही एकूण ५७७ गुण मिळवले, परंतु त्यांना ११ व्या स्थानावर समाधान मानावे लागले.

चीनसाठी, याओ जियानजुन आणि हू काई यांनी ४८८.४ गुणांच्या विश्वविक्रमी गुणांसह सुवर्णपदक जिंकले. चीनच्या दुसऱ्या जोडीने, शेन यियाओ आणि बू शुआईहांग (४८५.७), रौप्यपदक पटकावले, तर दक्षिण कोरिया आणि एका वैयक्तिक तटस्थ खेळाडूने चौथे स्थान मिळवले.

पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात, ज्युनियर विश्वविजेता राकेश पार्थ माने पात्रता फेरीत ६३३.४ गुणांसह दुसऱ्या स्थानी राहिला. त्याला केवळ चीनच्या दोन वेळच्या ऑलिम्पिक चॅम्पियन शेंग लिहाओने मागे टाकले, ज्याने ६३७.५ गुण मिळवले. मात्र, माने अंतिम फेरीत आपली लय कायम ठेवू शकला नाही आणि १४५.५ गुणांसह सातव्या स्थानी राहिला. शेंग लिहाओने २५३.९ गुणांसह सुवर्णपदक जिंकले, तर त्याच्याच देशाचा देशबांधव झांग चांगहोंग (२५२.४) दुसऱ्या स्थानी राहिला.

इतर भारतीय नेमबाजांनाही प्रभाव पाडण्यात अपयश आले. तुषार माने ६३०.५ गुणांसह १२व्या स्थानी, तर हिमांशू ढिल्लन ६२९.३ गुणांसह २२व्या स्थानी राहिला.

◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### 'नॅशनल आयडियल टीचर अवॉर्ड २०२६' प्रा. डॉ. निकत यांना जाहीर



तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि २२ जुलै-

करमाळ्यातील ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूटचे संस्थापक व संचालक प्रा. डॉ. महेश निकत यांची शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत 'नॅशनल आयडियल टीचर अवॉर्ड २०२६' साठी निवड झाली आहे. पुरस्काराचे वितरण दि. २ ऑगस्ट रोजी पुणे येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. प्रा. डॉ. महेश निकत यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, गणित विषयाचे प्रभावी अध्यापन, तसेच एमएचटी, सीईटी, जेईई, नीट यांसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन उपलब्ध करून दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूट, करमाळा या संस्थेने अल्पावधीतच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारामुळे करमाळा शहर तसेच सोलापूर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव झाला आहे.

### महाराष्ट्र बंदला करमाळ्यातही पाठिंबा; आज बंद

तभा वृत्तसेवा,
जेऊर दि.२२ जुलै-

दिल्ली येथील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला करमाळा तालुक्यातील सामाजिक राजकीय व सर्वपक्षीय संघटनांच्या वतीने पाठिंबा दिला आहे. समर्थनार्थ दि. २३ जुलै रोजी राज्यात महाराष्ट्र बंद पुकारला आहे. करमाळ्यातही बंद पाळण्याबाबत तहसीलदार शिल्पा ठोकडे व पोलीस निरीक्षक रणजीत माने यांना करमाळा निवेदन देण्यात आले. दिल्ली पोलिसांनी कोणाच्या आदेशावरून लाठीचार्ज आंदोलकांवर केला याचीही सखोल चौकशी झाली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्या पूर्ण होण्यासाठी २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंद पाळण्याचा निर्णय घेतला आहे. बंदमध्ये करमाळा शहर व तालुक्यातील मुख्य बाजारपेठ बंद ठेवण्यात आहे. गुरुवार २३ जुलै रोजी सकाळी ९:३० डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे उपस्थितीचे आवाहन केले आहे. यावेळी तहसीलदार शिल्पा ठोकडे व पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी कायदा सुव्यवस्थेचे पालन करून शांततेत आंदोलन करण्याचे आवाहन केले.

### अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन लग्न; तरुणावर 'पोक्सो'

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २२ जुलै-

बार्शी तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन लग्न करत वारंवार शारीरिक अत्याचार करण्यात आला. याप्रकरणी आरोपीवर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तालुक्यातील एका गावातील रहिवासी असलेल्या १६ वर्षे ९ महिने वयाच्या मुलीला आरोपी अबक ( नांव बदललेले) याने २ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घरातून पळवून नेले होते. त्यानंतर गावातीलच एका मंदिरात तिच्याशी विवाह केला. पीडिता अल्पवयीन असल्याचे माहित असूनही २ डिसेंबर २०२५ ते २० जुलै २०२६ या कालावधीत तिच्याशी संमतीशिवाय वारंवार शारीरिक संबंध ठेवले. परिणामी ती गरोदर राहिली आहे. छळाला कंटाळून अखेर पीडितेने बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. तक्रारीवरून आरोपीविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरोपीवर भारतीय न्याय संहिता कलम ६४ (२) (F$), ६४ (२) (I), ६४ (२) (M) तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम (पोक्सो कायदा) चे कलम ४, ६ आणि ८ अन्वये गंभीर गुन्ह्यांची नोंद केली आहे. गुन्ह्याचा प्राथमिक वर्दी रिपोर्ट जे.एम.एफ.सी. न्यायालय बार्शी यांना सादर करण्यात आला आहे. बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे हे तपास करीत आहेत.

## निधन वृत्त...

### प्रकाश पाटील



मंगळवेढा, दि. २२ जुलै-

उचेठाण येथील रहिवासी श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना कामगार पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन प्रकाश पाटील यांचे बुधवार दि. २२ जुलै रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यू समयी ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे जावई असा परिवार आहे.

### सुशीला पवार

बार्शी, दि. २२ जुलै-

बार्शी नगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक बाळासाहेब पवार व ज्ञानेश्वर पवार यांच्या मातोश्री सुशीला महादेव पवार (वय ८३) यांचे मंगळवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवार पेठ येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### कृष्णाबाई कांबळे




सोलापूर, दि. २२ जुलै-

संजय नगर, कुमठा नाका येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल कांबळे यांच्या मातोश्री कृष्णाबाई नामदेव कांबळे ( वय ७५) यांचे बुधवार, दि. २२ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# वारीत जखमी वारकऱ्याला 'पीएम राहत'चा आधार

### शिवम हॉस्पिटल, वेळापूर येथे तात्काळ उपचार

### महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मदत



वारीकाळात पालखी मार्ग व पंढरपूर परिसरातील महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालये वारकरी भाविकांना तातडीने उपचार उपलब्ध करून देत आहेत. आवश्यकतेनुसार 'पीएम राहत' योजनेचाही लाभ देत आहे.
- डॉ. वर्षा डोईफोडे,
जिल्हा शल्य चिकित्सक, सोलापूर.

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि.२२ जुलै -

आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे पायी येत असताना अपघातात गंभीर जखमी झालेल्या ८३ वर्षीय वारकरी भाविकास 'पीएम राहत' योजनेअंतर्गत तात्काळ उपचाराचा लाभ मिळाला. शिवम हॉस्पिटल, वेळापूर येथे त्यांच्यावर तात्काळ उपचार करण्यात आले. दगडुबा दिगंबर भोसले (वय ८३), रा. भूमराळा, ता. लोणार, जि. बुलढाणा हे पंढरपूरकडे येत असताना माळशिरस बायपास येथे अपघात झाला. अपघातामध्ये त्यांना गंभीर दुखापत होऊन दोन्ही पायांच्या हाडांचे फ्रॅक्चर झाले. अपघातानंतर त्यांना तात्काळ महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत शिवम हॉस्पिटल, वेळापूर, ता. माळशिरस येथे दाखल करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांनी त्यांची त्वरित तपासणी करून आवश्यक उपचार सुरू केले. रुग्णाचे वय, गंभीर दुखापत व उपचाराचा खर्च लक्षात घेऊन रुग्णालयाने तत्परतेने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून पीएम राहत योजनेअंतर्गत रुग्णास उपचाराचा लाभ उपलब्ध करून दिला. त्यामुळे रुग्णास आर्थिक अडचण न येता आवश्यक, दर्जेदार व वेळेवर उपचार सुरू करता आले.

# बार्शीत हिट अँड रन; पिता-पुत्राचा मृत्यू; पोलिसांकडून २४ तासात आरोपी गजाआड

### नंबर प्लेटवरून शोध घेत कारवाई



तसा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २२ जुलै-

बार्शी शहरातील बीआयटी कॉलेजसमोरील रस्त्यावर मंगळवारी (दि.२१ जुले) सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात शिक्षक राजेश सोनवणे (वय ५०) यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा ११ वर्षीय मुलगा तेजस ऊर्फ स्वराज सोनवणे याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता बार्शी शहर पोलिसांनी तात्काळ तपासचक्रे फिरवत २४ तासात आरोपीला गजाआड केले. त्याचे वाहनही जप्त केले.

मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास बीआयटी कॉलेजसमोरील रस्त्यावर चारचाकी वाहनाने दोघांना धडक दिल्याची माहिती निर्भया पथकाचे कर्मचारी बाबासाहेब घाडगे व डायल-११२ पथकाला मिळाली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी राजेश सोनवणे यांना मृत घोषित केले, तर गंभीर जखमी तेजस ऊर्फ स्वराज याला जगदाळे मामा रुग्णालयात हलवले. मात्र, बुधवारी सकाळी उपचारादरम्यान त्याचाही मृत्यू झाला.

मयत राजेश सोनवणे यांचा मोठा मुलगा सक्षम सोनवणे (वय १९) याने फिर्याद दिली आहे. वडील व लहान भावाला जखमी करून चालका घटनास्थळावरून पलायन केल्याचा आरोप फिर्यादित केला आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात आरोपी महेश नानासाहेब काजळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला

### प्रत्यक्षदर्शीकडून मिळाली उपयुक्त माहिती

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपास सुरु केला. अपघातस्थळापासून काही अंतरावर वाहनाची नंबर प्लेट आढळून आली. तसेच प्रत्यक्षदर्शीकडून मिळालेल्या माहितीनुसार अपघात करणारे वाहन मारुती सुझुकी डिझायर (क्र. एमएच -१३ इक्स २२८२) असल्याचे निष्पन्न झाले. तपासांअंती हे वाहन महेश नानासाहेब काजळे (रा. अरणगाव, ता. बार्शी) याच्या ताब्यात असल्याचे समोर आले. पोलिसांनी आरोपीसह अपघातग्रस्त वाहन येरमाळा परिसरातून ताब्यात घेतले आहे.

# पंढरपूर पोलिसांची देशी दारूवर कारवाई; साडेदहा लाखांचा मुद्देमाल जप्त

### पंढरपूर शहर पोलिसांचा धडाका



तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि. २२ जुलै-

पंढरपूर शहर पोलिसांनी आषाढी वारीच्या अनुषंगाने देशी दारू विरुद्ध मोठी कारवाई केली. देशी दारूच्या १५५ बॉक्ससह एकूण दहा लाख ५५ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी ही माहिती दिली. अशोक लेलँड टेम्पो चालक प्रवीण अशोक मोरे (रा.पंढरपूर) हा मंगळवारी (दि.२१) अशोक लेलँड टेम्पोम ध्ये १५५ देशी दारूचे वेगवेगळ्या कंपनीचे बॉक्स, लायसन्स शिवाय पालखी मार्गावरून देशी दारूची वाहतूक करताना सापडला. टेम्पोमध्ये सुमारे ५ लाख ५५ हजार २८० रुपये किंमतीचे १५५ बॉक्स तसेच अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो असा एकूण दहा लाख ५५ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गाडीचा चालक प्रवीण अशोक मोरे (रा. पंढरपूर ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रमसिंग मोटे, नितीन जगताप, युवराज पाटील, पंकज गाडेकर, पीएसआय दत्तात्रय लेंडवेपाटील, पोलीस हवालदार सुजित उबाळे, पोलीस कॉन्स्टेबल देवेंद्र सूर्यवंशी, नवले, ठाकर, पवार, गोडसे, प्रसाद ओटी, सुनील बनसोडे, शहाजी मंडले, चालक पोलीस कॉन्स्टेबल बाळासाहेब बडे यांच्या पथकाने केली.

# ४१ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई

### 'आपली तक्रार' आणि लोकसेवा हक्कातील प्रलंबित प्रकरणी दंडाचा बडगा

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २२ जुलै-

आपली तक्रार/ माय सोलापूर ॲप व लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अर्ज मुदतीत निकाली न काढल्याप्रकरणी सोलापूर महापालिकेने ४१ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली आहे. 'संबंधितांकडून नियमानुसार दंड वसूल करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त सोनाली यादव यांनी काढले आहेत.

'आपली तक्रार' पोर्टल, 'माय सोलापूर' ॲप तसेच लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रलंबित अर्जांची दखल घेत प्रशासनाने मुदतीत तक्रारी व अर्ज निकाली न काढणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून नियमानुसार दंड वसूल करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत. या सेवांशी संबंधित अर्ज वेळेत निकाली काढणे व पोर्टलवरील माहिती अद्ययावत ठेवण्याच्या सूचना यापूर्वीही देण्यात आल्या होत्या. मात्र अद्याप अनेक तक्रारी व अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून आल्याने कारवाई केली आहे. आपली तक्रार माय सोलापूर ॲप वर प्रकरणे प्रलंबित ठेवल्याप्रकरणी १७ कर्मचाऱ्यांना एकूण ५ हजार ३०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. लोकसेवा अधिनियम हक्क अंतर्गत अर्ज प्रलंबित ठेवल्याने २४ कर्मचारी व अधिकाऱ्यांना एकूण २३ हजार ६०० रुपये दंड करण्यात आला आहे. एकूण ४१ कर्मचारी व अधिकाऱ्यांना एकूण २८ हजार ९०० रुपये दंड आकारण्यात आला आहे.

### विशेष पुनरीक्षण कामावरील कर्मचाऱ्यांना ३१ जुलैपर्यंत दिलासा

दरम्यान, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम ासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील 'आपली तक्रार' पोर्टल व लोकसेवा हक्क अधिनियमातील प्रलंबित प्रकरणांसंदर्भातील दंडात्मक कारवाई ३१ जुलै २०२६ पर्यंत स्थगित ठेवण्यात आली आहे. संबंधित विभागप्रमुखांनी या आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत.



# टेंभुर्णीत महाविकास आघाडीचे केंद्र सरकारविरोधात आंदोलन

तभा वृत्तसेवा,
टेंभूर्णी, दि. २२ जुलै-

नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, तसेच दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलकांवर कथित लाठीहल्ल्याचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने टेंभुर्णी येथे निवेदन देऊन निषेध करण्यात आला

यावेळी काँग्रेस, शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श.प.), संभाजी ब्रिगेड आणि वडार परिवर्तन सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढत केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. एपीआय संदेश बावकर यांना निवेदन दिले. यावेळी राष्ट्रवादी (श.प.) माढा तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील वरवडेकर, शिवसेना (उबाठा) माढा तालुकाप्रमुख मधुकर देशमुख, माढा तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष संजय पाटील, संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सचिन जगताप, वडार परिवर्तन सेनेचे अध्यक्ष राजू धोत्रे, काँग्रेस प्रदेश सचिव भीमराव बंडगर, शिवसेना विभागप्रमुख बाबा चंदनकर, शिवसेना शहरप्रमुख संतोष खैरमोडे, काँग्रेस अध्यक्ष हेमंत देशमुख, युवा सेना समन्वयक किशोर देशमुख, काँग्रेसचे मुकुंद ननवरे, काँग्रेस अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष जमीर काझी, टेंभुर्णी शहर शिवसेना उपप्रमुख प्रशांत सोनवणे, काँग्रेस तालुका सदस्य डावरे, शिवसेना शहर संघटक कोळपे आदी उपस्थित होते.

# अन्नछत्र मंडळाचा वर्धापनदिन, गुरुपौर्णिमा महोत्सवाचे उद्घाटन



तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. २२ जुलै-

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापनदिन व गुरुपौर्णिमा महोत्सवाचा शानदार शुभारंभ नुकताच पार पडला.

न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली दि. १९ जुलै रोजी रविवार सायंकाळी ६.३० वा. विरक्त मठाचे म.नि.प्र. बसवलिंग महास्वामी, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे मुख्य पुजारी मोहन पुजारी, श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे पुजारी अण्णू महाराज, साई ग्रुप, साईसुश्रुत कन्स्ट्रक्शन, पुणे संस्थापक अध्यक्ष-अरुण आडकर, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, शुभम नांगरे, पालखी संयोजक, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अविनाश पवार, चेंजेर स्पोर्टचे अतिश शहा, आरती शहा, चंद्रशेखर गायकवाड, मनिषा गायकवाड, रामदास तांबे, उत्तर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पन्हाळकर, उपनिरीक्षक सतीश रणवरे, आय.एस.ओ. प्रमाणपत्र अधिकारी ओंकार पत्की, यशवंत पत्की आदी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून पहिल्या पुष्पाचे मोठ्या उत्साहात गंगा आरतीने शानदार उद्घाटन झाले.

दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व लता मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आणि सहकाऱ्यांचा 'रंग उषेचे, कार्यक्रम झाला. त्यांच्या समवेत नेहा चिपळूणकर, हेमंत वाळूंजकर, रसिका गानू, धवल चांदवडकर, विवेक परांजपे, नंदेंद्र चिपळूणकर, राजेंद्र साळुंके, नितीन शिंदे, रोहित जाधव, आनंद घोरपे, प्राजक्ता मोडक व अँकर प्रवीण जोशी यांनी साथ दिली. या सर्व कलाकारांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळास आय.एस.ओ. प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्यास उपस्थित मान्यवरांचा सत्कार अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला. मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन केले. उषा मंगेशकर यांचा सत्कार न्यासाचे जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते झाला.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, स्मिता कदम, पल्लवी कदम, उज्वला भोसले, संगीता भोसले, रूपा पवार, स्वप्ना माने, कविता वाकडे, सुवर्णा घाडगे, राजश्री माने, क्रांती वाकडे, धनश्री पाटील, सरोजनी मोरे, दिव्या मोरे, कल्पना मोरे, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, खजिनदार लाला राठोड, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, शुभम नांगरे, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, प्रथमेश इंगळे, मनोज निकम, प्रा. शरणप्पा आचलेर, प्रवीण देशमुख, शितल फुटाणे, सुमित घाटगे, रोहित खोबरे आदी उपस्थित होते. सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले.

### मंत्री मंडळाकडून शुभेच्छा

मंत्री मंडळासह, मुंबई महापालिकेतील पदाधिकाऱ्यांकडून अन्नछत्र मंडळाच्या वर्धापनदिन व गुरुपौर्णिमा महोत्सवास शुभेच्छा दिल्या आहेत. ॲड. विक्रम येडूर, सोलापूर, इस्त्रा इंडे (एस.टी. चालक), बँक अधिकारी इरेश बागेवाडी, शिक्षक शिवशंकर बिराजदार यांना गुणीजन गौरव पुरस्कार दिले.

### भक्ती रन टी-शर्टचे अनावरण

रविवार २६ जुलै रोजी पहाटे ५.३० ते ९.३० वा पर्यंत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट) व चॅलेंजर स्पोर्ट्स फाऊंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' भक्ती रन्ड्' स्पर्धा होणार आहे. स्पर्धेच्या भक्ती रन टी-शर्टचे अनावरण करण्यात आले.

# गायिका आर्या आंबेकरच्या मधुर स्वरांनी अक्कलकोटकर मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ जुलै-**

श्री गणेश स्तवन..!, तारकमंत्र, निशंक हो.. निर्भय हो..!, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा..! श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ..! विठ्ठल..! विठ्ठल...!!, अशा एक ना अनेक मराठी, हिंदी व कन्नड भावगीते व भक्तीगीतांनी ख्यातनाम गायिका आर्या आंबेकर यांच्या 'स्वर आर्या' या सदाबहार गाण्याने श्रोते भारावून गेले होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, बुधवार सायंकाळी ७.१५ वा. 'स्वर आर्या' सादरकर्ते आर्या आंबेकर व सहकलाकार मुंबई ह्या कार्यक्रमाने चौथे पुष्प संपन्न झाले. या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन गायिक आर्या आंबेकर, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, दिव्य मराठीचे संपादक महेश राम दासी, माजी नगरसेवक विजुभाऊ तांडेल मुंबई, सुनील घाटे, मुंबई, संपतराव शिंदे, वटवृक्ष स्वामी मंदिराचे अध्यक्ष महेश इंगळे, नगरसेवक महेश हिंडोळे, सद्धाम शेरीकर, पंचायत समिती सदस्य विनोद मोरे, अपाशा किवडे, प्रथमेश इंगळे, आराध्य तांडेल, रिजनल हेड, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया-अंचित कुमार, बीड युवा सेना प्रमुख ऋषिकेश लोमटे, यश कल्याणी सेवाभावी संस्था अध्यक्ष गणेश केरे पाटील, पुणे, इंग्लिश असोशियन चे अध्यक्ष- बाळकृष्ण लावंड, गुरुनाथ बुचांडे, पक्षी मित्र कल्याणराव साळुंके करमाळा यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान न्यासाचे पुरोहित सोमकांत कुलकर्णी यांचे चिरंजीव कु. स्वराज याने छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास यावर मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते आर्या आंबेकर यांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, सोमकांत कुलकर्णी, विश्वंभर पुजारी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल क्षीरसागर, सुवर्णा घाडगे, छाया पवार, रुपा पवार व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, दिव्य मराठीचे युनिट हेड हाजीमलंग शेख, वृत्तसंपादक श्रीकांत कांबळे, राजेंद्र लिंबीतोटे, संतोष भोसले,



लक्ष्मण पाटील, मनोज निकम, प्रा.शरणप्पा आचलेर, प्रा. प्रकाश सुरवसे, प्रा. भीमराव साठे, प्रवीण देशमुख, अरविंद शिंदे, अतिश पवार, प्रवीण घाटगे, गोटू माने, संजय गोंडाळ, सौरभ मोरे, वैभव मोरे, रोहित खोबरे, कांत झिपरे, मारुतीराव बोरकर, सर्फराज शेख, किरण पाटील, रोहित पाटील, निखील पाटील, नारायण गडदे, मैनुद्दीन कोरबू, बलभीम पवार, शुभम सावंत, मल्लिकार्जुन गवळी, मुन्ना महाडिक, रमेश शिंदे, विजय इंगळे, अप्पा गवळी, सागर गोंडाळ, सादिक बागवान, मुन्ना माळवदकर, आकाश गडकरी, अमर मासरे, वासू कडबगांवकर, गोविंदराव शिंदे, बाळासाहेब घाटगे, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, राजू पवार, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, असद फुलारी, रमेश हळसंगी, समर्थ घाडगे, राहुल इंडे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केले.

अन्नछत्र मंडळाकडून गेली २७ वर्षे राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत असून श्री. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, अमोलराजे जनमेजयराजे यांच्या विधायक कार्याने अक्कलकोटचे नाव महाराष्टासह देशात पोहचत आहे.

**गुणीजन गौरव :** यामध्ये प्रा.वैदेही नरहर वैद्य, उपप्राचार्य, समीर मिनियार, सहशिक्षक, काशिराया काका पाटील विद्यालय, दत्तात्रय कटारे श्री समर्थ कॉम्प्यूटर, समीर बागवान, एस.टी.वाहक यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**गुणवंत विद्यार्थी गौरव :** तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.

**आज फोक आख्यान**

शनिवार दि. २३ जुलै रोजी सायंकाळी ७.१५ ते रात्रौ ९.३० पर्यंत '' फोक आख्यान'' घरंदाज लावणी, जात्यावरच्या ओव्या आणि भक्तीचा रसाळ आविष्कार असा हा कार्यक्रम सादर होणार आहे.

## महत्वाचे...



### एसव्हीसीएसच्या माने हिला राष्ट्रीय स्पर्धेत रौप्य

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

चेन्नई येथे झालेल्या ७९व्या वरिष्ठ राष्ट्रीय ऑक्वाटिक चॅम्पियनशिपमध्ये एस.व्ही.सी.एस. हायस्कूल एमआयडीसीची मनस्वी माने हिने ३ मी. स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग या प्रकारात रौप्य प्राप्त केले. मनस्वीला आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीकांत शेटे, क्रीडा शिक्षक हनुमंत येळमेली, बसवराज कोरे व आकाश बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले या यशाबद्दल मनस्वीचे व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, संस्थेचे प्रशासकीय प्रमुख संगप्पा म्हमाणे, मुख्याध्यापक धनंजय नकाते,उपमुख्याध्यापक सुहास काटगांव व पर्यवेक्षक केदार पटणे यांनी अभिनंदन केले.




### भारती विद्यापीठाच्या गौरी रेऊरेस सुवर्ण

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

भारती विद्यापीठ माध्यमिक विद्यालयातील इयत्ता सातवीतील गौरी रेऊरे हिने उत्तुंगतेज बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत (मार्च २०२६, जवळा जि. हिंगोली) सुवर्णपदक प्राप्त केले. या यशाबद्दल विद्यालयामध्ये तिचा छोटेखानी सत्कार प्राचार्य आर. एस. देवकर यांनी केला. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. प्राचार्य देवकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी विविध स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होऊन आपल्या बुद्धिमत्तेची चमक दाखवावी व आपल्या शाळेचे व संस्थेचे नाव उज्ज्वल करावे. भारती विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, शालेय समितीच्या अध्यक्षा विजयमाला व शालेय शिक्षण विभागाचे संचालक एम. डी. कदम यांनी गौरी हिचे अभिनंदन केले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | गुरुवार, २३ जुलै २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# नेत्रदीपक रिंगण, बंधुभेटीचा उदंड उत्साह

## माळशिरस तालुक्याच्या सीमेवर भक्ती-स्नेहाचा महापूर



### संतांच्या पालख्यांचा पंढरपूर तालुक्यात प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ जुलै-**

तोंडले येथून सोहळा निघाल्यावर वाटेत सोपानकाकांच्या पालखीची व ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीची बंधु भेट माळशिरस तालुक्याच्या हद्दीत झाली. यावेळी माउलींचा नेत्रदीपक रिंगण सोहळा व बंधू भेटीने परिसरात भक्ती-स्नेहाचा अलोट महापूर आला होता.

दुपारच्या भोजनानंतर टप्पा येथे माउलींचा पालखी सोहळा विसावतो. याच वेळेस सोपानकाकांचा पालखी सोहळा शेजारून पुढे जातो. सोपानकाकांचा रथ माउलींच्या रथा शेजारी आल्यावर थोडा वेळ थांबतो. यावेळी दोन्ही संस्थानकडून परस्परांना नारळ प्रसाद दिला जातो. तत्पुर्वी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे ठाकूर बुवा समाधी येथे नेत्रदीपक गोल रिंगण झाले.

माउलीची पालखी वेळापूर येथून प्रस्थान झाल्यानंतर ठाकूर बुवा समाधी या ठिकाणी पालखी पोहचली. या ठिकाणी संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचा माउली माउली, टाळ मृदुंगच्या जयघोष करीत रिंगण सोहळा पार पडला. रिंगण सोहळा पार पडल्यानंतर पालखी पुढे मार्गस्थ झाली. काही वेळातच माळशिरस तालुक्याच्या हद्दीत कनिष्ठ बंधू सोपानदेव महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज पालखीची भेट झाली. या दोन पालख्या एकमेकांना भेटल्या. या वेळी उपस्थित भाविकांनी विठ्ठल विठ्ठलचा जयघोष केला. माउलींच्या पालखी विश्वस्तांनी सोपानदेव यांच्या मानकऱ्यांना मानाचा नारळ प्रसाद दिला. बंधू भेटीचा भावपूर्ण सोहळा पाहून भाविक सुखावले. पुढे माउलीची पालखी भंडीशेगाव येथे मुक्कामी पोहचली.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची पालखी बोरगाववरुन पालखी मार्गस्थ होत तोंडले बोंडले या ठिकाणी पोहचली. या ठिकाणी पालखीतील सर्व भाविक धावले. तुका म्हणे धावा ..आहे पंढरीस विसावा या अभंगाप्रमाणे भाविकांनी धावा केला. धावा संपल्यानंतर पालखी पिराची कुरोली येथे मुक्कामी पोहोचली. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यांचे पंढरपूर तालुक्यात आगमन झाले. पालख्यांचे पंढरपूर तालुका प्रशासनाच्या वतीने प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव यांनी स्वागत केले.

## महत्वाचे...

### आनंदश्री प्रतिष्ठानच्या वतीने शनिवारी अभंगवाणी

**सोलापूर, दि. २२ जुलै-**
येथील आनंदश्री प्रतिष्ठानच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त शनिवार, २५ जुलै रोजी सकाळी १० वाजता अभंगवाणी या विशेष भक्तीमय कार्यक्रमाचे आयोजन जुळे सोलापूर येथील गोविंदश्री मंगल कार्यालयात केले आहे. या कार्यक्रमामध्ये कनिष्का शिबपुजे, प्राजक्ता देशपांडे, ज्ञानेश्वरी मुळे, अलका ओक, शारदा कवडे, शुभांगी माने, सुरेखा गंभीर आणि अनिरुद्ध वाघचवरे हे गायक अभंग सादर करणार आहेत. त्यांना ओंकार पाठक (हार्मिनियम), यश जगताप (परवाज), दिलीप पोतदार (टाळ) आणि नितीन दिवाकर (तबला) यांची वाद्यसाथ लाभणार असून विभावरी रणदिवे यांचे निरुपण होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात वेळेवर होणार असून, श्री विठ्ठलाच्या भक्तीमध्ये चिंब होण्यासाठी रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आनंदश्री प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि अध्यक्षा डॉ. माधवी रायते यांनी केले आहे.

### कीटकनाशक पिलेल्या निम्बर्गी गावच्या तरुणाचा अखेर मृत्यू


**सोलापूर, दि. २२ जुलै-**
शेतामध्ये कीटकनाशक औषध पिलेल्या निम्बर्गी गावच्या तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज बुधवारी सकाळी साडेनऊ वाजता मृत्यू झाला. आकाश प्रभाकर वडणे (वय २२ वर्ष , रा. निम्बर्गी , दक्षिण सोलापूर ) असे त्या मयत तरुणाचे नाव आहे . त्यांने १९ जुलै रोजी दुपारी निम्बर्गी गावातील शेतामध्ये दारूच्या नशेमध्ये कीटकनाशक औषध पिले होते . त्रास होऊ लागल्याने त्याला मंद्रूप येथील आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मामा संजय याने बेशुद्ध अवस्थेत सायंकाळी दाखल केले असता त्याचा उपचारादरम्यान आज बुधवारी सकाळी मृत्यू झाला .

### उजनी प्रकल्प जमीन खरेदी फसवणूक प्रकरणी 'त्या' एजंटचा जामीन अर्ज फेटाळला

**मंगळवेढा, दि. २१ जुलै-**
उजनी प्रकल्पात गेलेली जमीन मिळवून देतो असे म्हणून १० लाख २० हजाराची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी एजंट पांडुरंग प्रल्हाद गायकवाड (रा.डोणगाव उ.सोलापूर) याचा जामीन अर्ज मंगळवेढा न्यायालयाने फेटाळला आहे. फिर्यादी अतुल शेंडगे यांचे आजोबा जगन्नाथ कायगुडे यांच्या नावावर शेतजमीन होती. ती शासनाने प्रकल्पांतर्गत ताब्यात घेतल्याने तुम्हाला शासनाकडून पुनर्वसनाची जमीन मंगळवेढ्यातील सिध्दापूर येथे मिळवून देतो असे सांगून त्यांची आरोपीने फसवणुक केली होती. याप्रकरणी त्याला न्यायालयाने प्रथमत: सहा दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. आरोपीने जामीनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला असता मंगळवेढा न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला. प्रकरणात शन्मुख महादेव चौगुले (सिध्दापूर),पप्पू जालींदर दातीर (कर्जत), नामदेव सोपान काळे (शिपोरा कर्जत), सुदाम साधू कायगुडे (रा.गणेशवाडी जि.अहिल्यानगर) आदी आरोपी फरार आहेत. असून गुन्हा दाखल होताच हे आरोपी मोबाईल बंद करुन फरार झाले आहेत.

### वाहतूकीस अडथळा आणला; वाहन चालकावर गुन्हा

**मंगळवेढा, दि. २२ जुलै-**



शहरात रस्त्याच्यामध्ये वाहन उभे करुन वाहतूकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी चालक विपुल मायाप्पा बॅकोड (वय २३ रा.शिरनांदगी) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. वाहन जप्त करुन पोलीस स्टेशनच्या आवारात लावले आहे. १८ जुलै रोजी पोलीस हवालदार संभाजी यादव,पोलीस अंमलदार दिपक साळुंखे हे शहरात पेट्रोलींग करीत असताना नागेश वाईनशॉपसमोर त्यांना टेलर वाहन क्रमांक सी.जे.०५ सी यू.४८१६ रस्त्यात लावून वाहन चालक गेल्याचे दिसले. पोलीसांनी आजूबाजूला शोध घेतला असता तो मिळून आला. गाडी रस्त्यात का लावली? आज्ञादर्शक वाहतूक चिन्ह फलकाचे अनुपालन का केले नाही? असे विचारले असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. हवालदार प्रविण जाधव यांच्या फिर्यादीवरुन सदर वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# एसबी प्लाझा आयकॉन या इमारतीतील अतिसाराचा एक रुग्ण अत्यवस्थ

- ड्रेनेज चेंबरचे काम युद्ध पातळीवर सुरू
- दूषित ड्रेनेज तातडीने बदलण्याची रहिवाशांची मागणी

### ४० रहिवाशांवर सुरु आहेत उपचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

आसरा चौक परिसरातील एसबी प्लाझा आयकॉन या इमारतीत अतिसाराच्या घटनेनंतर परिस्थिती अधिक गंभीर बनली असून बाधितांपैकी एका रुग्णाची प्रकृती चिंताजनक झाली आहे. संबंधित रुग्णाला बुधवारी यशोधरा हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेनंतर सोलापूर महानगरपालिकेने पाणीपुरवठ्याच्या स्रोतांची तपासणी सुरू केली असून काल आणि आज पाण्याचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

या इमारतीतील सुमारे ४० रहिवाशांना अतिसाराची लागण झाली असून विविध खासगी रुग्णालयांत त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यापैकी आयेशा शेख (वय ४६) यांची प्रकृती बुधवारी अचानक बिघडल्याने त्यांना यशोधरा हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेनंतर संतप्त रहिवाशांनी दूषित मलवाहिनी तातडीने बदलण्याची मागणी महानगरपालिकेकडे केली.

दरम्यान, या संदर्भात महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाचे कार्यकारी अभियंता व्यंकटेश चौबे यांनी सांगितले की, संबंधित झोन कार्यालयामार्फत ड्रेनेज लाईनची सविस्तर तपासणी सुरू आहे. ड्रेनेजचे पाणी बोअरमध्ये मिसळत असल्याची रहिवाशांची शंका पडताळून पाहिली जात असून ड्रेनेज लाईनची स्वच्छताही करण्यात येत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले

दरम्यान, दूषित पाण्यामुळेच संसर्ग झाल्याचा संशय व्यक्त होत असताना रहिवाशांनी कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी केली आहे. परिसरातील ड्रेनेज व्यवस्था निकृष्ट असल्याने भविष्यातही अशा घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

आमच्या इमारतीमध्ये तीन बोअर आहेत. त्यातील दोन बोअरमधून हा संसर्ग झाला असावा अशी शक्यता असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून आम्हाला एक देण्याचे आउटलेट काढून देत आहेत. किल्लेदार मंगल कार्यालय ते इनामदार मार्ग येथे ड्रेनेजची मेन लाईनच नाही. आता नव्याने करण्यात येणाऱ्या चेंबरसाठीही आम्ही रहिवाशांनी पैसे द्यावेत, अशी मागणी महापालिकेकडून होत आहे, असे रहिवासी आणि रुग्णाचे नातेवाईक डॉ. असिफ शेख

#### महापालिकेने नमुने पाठविले तपासणीला : डॉ. राखी माने



संबंधित इमारतीतील पाणी हे महापालिकेचे पाणी नाही. त्या ठिकाणी खाजगी बोअर आहेत. खाजगी बोअरमध्ये ड्रेनेजचे पाणी मिसळले आहे. अशी रहिवाशांची शंका आहे. महापालिकेच्या पथकाने तेथील सर्वेक्षण केले आहे. पाण्याचे नमुनेही काल आणि आज घेऊन लॅबला पाठवले आहे, आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यात येत आहे, असे महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी सांगितले.

# आषाढी वारीत ५ वारकऱ्यांचा विविध कारणांनी मृत्यू

## शासन स्तरावरून मिळणार कुटुंबियांना मदत




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

आषाढी वारीमध्ये सध्या दाही दिशातून भाविकांची पंढरी नगरीत गर्दी होत आहे. कोण दिंडीतून तर कोण बस, खाजगी वाहनातून येताना दिसत आहेत. दरम्यान, पांडुरंगाच्या भेटीसाठी आलेल्या ५ वारकरी भाविकांचा विविध कारणांनी मृत्यु झाल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी आज (दि. २३) दिली. दरम्यान, या भाविकांच्या मृत्युबाबतचे सविस्तर प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून शासनाकडे गेल्यावर त्यांच्या कुटुंबियांना शासन स्तरावरून मदत मिळणार असल्याचेही पाटील यांनी यावेळी नमूद केले.

या भाविकांमध्ये काळ भैरवनाथ संस्थान पायी दिंडी सोहळ्यातील दिंडी क्र. १४ मधील लक्ष्मण विठ्ठल मोटे (वय ४८) मु. पो. वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर यांचा दि. १८ जुलै रोजी ह्दयविकाराच्या झटक्याने मृत्यु झाला.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या सिताराम महाराज जामकर (दिंडी क्र. २९) यांच्या दिंडीतील उत्तम रेवा चव्हाण (वय ८२) सातोना खुर्द, ता. परतूर, जि. जालना हे दि. १९ जुलै रोजी चक्कर येवून मयत झाले. दरम्यान, त्यांच्यावर ग्रामीण रूग्णालय नातेपुते येथे उपचार करण्यात आला. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील दिंडी क्र. २५१ मधील सुदाम ननवरे (वय ६५) रा. स्वामी चिंचोली, ता. दौड, जि. पुणे यांचा अज्ञात कारणाने मृत्यु झाला.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील दिंडी क्र. ११ मधील प्रकाश तुळशीराम मगर (वय ४०) रा. खामगाव, जि. लातूर हे विहिरीत पडल्याने मयत झाले. त्यांना अकलूज येथील उपजिल्हा रूग्णालयात हलविले होते.

तर बालाजी बाबा पायी दिंडी सोहळा वडगाव येथील रंजना एकनाथ डोंगरे रा. नवनागापूर, ता. जि. अहिल्यानगर यांचा अज्ञात कारणाने मृत्यु झाला असून, त्यांना करमाळा ग्रामीण रूग्णालयात हलविले होते.

#### वेळापूर येथे छोटा हत्तीच्या धडकेत डिव्हायडरवर बसलेले तीन वारकरी जखमी

**सोलापूर :** छोटा हत्ती वाहनाच्या धडकेत डिव्हायडर वर बसलेले तीन वारकरी जखमी झाल्याची घटना माळशिरस तालुक्यातील वेळापूर येथे मंगळवारी सायंकाळी घडली. बाळासाहेब न्यानोबा राऊत (वय ५५, केज, जि. बीड), महादेव सखाराम सागडे (वय ६०, रा. सेतू ,जि परभणी )आणि सोनाली शांताराम गायकवाड ( वय ४०, रा.सदर) वरील तिघे वारकरी हे ज्ञानेश्वर महाराज पालखी सोबत दिंडीमध्ये असताना मंगळवारी सायंकाळी वेळापूर येथील दत्त मंदिर जवळ रस्त्यावरील डिव्हायडरवर बसले होते. त्यावेळी छोटा हत्ती वाहनाने या तिघांना धडक मारली. यात तिघे पायांना मार लागून जखमी झाल्याने त्यांना वेळापूर येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून रुग्णवाहिकेतून येथील शासकीय रुग्णालयात रात्री पावणे अकरा वाजता दाखल करण्यात आले.

# अयोध्येतही साकारले श्री विठ्ठल मंदिर

### जगद्गुरू डॉ. राघवाचार्य यांची संकल्पना; २५ ते २८ जुलै दरम्यान मूर्ती प्राणप्रतिष्ठा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

श्रीवैष्णवांच्या १०८ दिव्य देशांपैकी 'अयोध्या दिव्य देश' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रभू श्रीरामाच्या जन्मभूमीत अनेक देवदेवतांची मंदिरे आहेत. यामध्ये श्री विठ्ठल मंदिराची कमी असल्याने जगद्गुरू डॉ.राघवाचार्य पीठाधीश्वर श्रीरामलल्ला सदन देवस्थान, श्रीधाम अयोध्या यांच्या संकल्पनेतून 'श्रीविठ्ठल रूक्मिणी' मंदिराची स्थापना होत आहे. २५ ते २८ जुलै दरम्यान मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडणार आहे.



जगद्गुरू स्वामी डॉ. राघवाचार्य हे विठ्ठलाचे निस्सिम भक्त आहेत. अनेक वर्षापासून जेव्हाही सोलापूरला येतात, तेव्हा श्री विठ्ठलाचे दर्शन घेतल्याशिवाय परत जात नाहीत. दोन वर्षांपूर्वी त्यांच्यावर श्री रामबाग देवस्थान, पंढरपूर येथील पीठाधीश पदाची जबाबदारी आली. त्याच काळात श्री रामलल्ला देवस्थान ट्रस्ट अयोध्याचे विश्वस्त विष्णुदास तथा सतीश मालू पंढरपुरात श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी गेले होते. दर्शन घेऊन बाहेर पडताच जगद्गुरू डॉ. राघवाचार्य यांनी अत्यंत भावपूर्ण शब्दांत त्यांना अयोध्येमध्ये सर्व देवी-देवतांची मंदिरे आहेत; परंतु अजूनही पंढरीनाथ भगवानांचे मंदिर नाही. मग आपण सर्वांनी मिळून अयोध्येत श्री विठ्ठल-रुक्मिणीचे भव्य मंदिर का उभारू नये?, असे विचारले. जगद्गुरूंचा हा संकल्प ऐकताच सतीश मालू यांनीही क्षणाचाही विलंब न लावता त्याला होकार दिला. त्यानंतर अयोध्येतील जागांची पाहणी केली. आणि श्रीराम जन्मभूमीपासून अवघ्या ९०० मीटर अंतरावर असलेली अत्यंत योग्य जागा निश्चित केली. तिथे मंदिर उभारणीच्या कार्याला प्रारंभ होऊन, ईश्वर कृपा, जगद्गुरूंचा आशीर्वाद आणि असंख्य भक्तांच्या भक्तीमय सहकार्यामुळे हे मंदिर पूर्णत्वास आले आहे. संपूर्ण महाराष्ट्रासह, भारतातील सद्भक्तांनी या सोहळ्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री रामलल्ला देवस्थान ट्रस्ट,अयोध्याचे

#### दोन महान तीर्थक्षेत्रे भक्तीच्या अखंड सूत्रात जुळणार

येत्या २५ ते २८ जुलै दरम्यान अयोध्येत 'श्री विठ्ठल रुक्मिणी' मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा अनेक महामंडलेश्वर, संत महंतांच्या दिव्य साान्निध्यात होणार आहे. सोलापूरचे कीर्तनकार ह.भ.प. निळोबा महाराज शिरसट यांचे कीर्तन याप्रसंगी होणार आहे. हा केवळ मंदिराचा उद्घाटन सोहळा नसून पंढरपूर आणि अयोध्या या दोन महान तीर्थक्षेत्रांना भक्तीच्या अखंड सूत्रात जोडणारा एक ऐतिहासिक आणि अविस्मरणीय क्षण ठरणार आहे.

# सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशनची रस्त्यांवर खड्डे करून वृक्ष संगोपनाची जबाबदारी

### नागरिकांनीही वृक्षसंवर्धनात सहभागी व्हावे : प्रवीण तळे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**



शहरातील वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशनने पुढाकार घेतला आहे. संस्थेने जुळे सोलापूर परिसरातील विविध रस्त्यांवर वृक्षारोपणासाठी खड्डे करून देण्यासह लागवडीनंतर झाडांचे संगोपन करण्याची तयारी दर्शवली आहे. याबाबत उद्यान व मंडई विभागाचे सभापती राजशेखर पाटील यांना संस्थेच्या वतीने संचालक प्रवीण तळे यांनी निवेदन दिले.

मागील वर्षी शहरातील तापमानात मोठी वाढ झाल्याने यंदा विविध स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबविण्याचा संस्थेचा मानस आहे. या मोहिमेत संस्थेमार्फत झाडे उपलब्ध करून दिली जाणार असून, महापालिकेने संबंधित रस्त्यांच्या दुतर्फा दर १० फुटांवर खड्डे खोदणे, काळी माती उपलब्ध करून देणे तसेच वृक्षारोपणानंतर पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

संस्थेने आयएमएस शाळा ते मॉडेल पब्लिक स्कूल, डी-मार्ट ते स्वामी विवेकानंद केंद्र, बॉम्बे पार्क ते सैफुला चौक, ओम गजानन चौक ते फजनी पिठाची गिरणी, पोद्दार स्कूल, आरटीओ कार्यालय, निर्मिती विहार, दवात चौक, आसरा ब्रिज, विजापूर नाका ते एसआरपी कॅम्प आदी मिळून १५ प्रमुख मार्गांवर वृक्षारोपणासाठी खड्डे करण्याचा प्रस्ताव दिला आहे. या उपक्रमामुळे जुळे सोलापूर परिसरात मोठ्या प्रमाणावर हरित क्षेत्र वाढण्यास मदत होणार असून, नागरिकांनीही वृक्षसंवर्धनात सहभागी व्हावे, असे आवाहन श्री. तळे यांनी केले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १५१०

**परमेष्ठिपदों तुच्छ मानिती सर्वदों**

भक्ती ही मानवी जीवनाची शक्ती असल्याचे मानले जाते. कोण कोणाची भक्ती करावी किंवा कोणी कोणावर भक्ती, श्रध्दा ठेवावी यावर बंधन नाही. अर्थात ज्याला जे किंवा जो योग्य वाटतो तो त्याची भक्ती करू शकतो. कोणी देवदेवतांचा, कोणी जन्मभूमीचा, कोणी मातापित्यांचा तर कोणी अन्य कोणाचा भक्त असू शकतो. भक्ती ही मानवाला एक प्रकारे शक्ती देत असते. कारण भक्तीमागे श्रध्दा, दृढविश्वास, निस्वार्थ प्रेम असते. ज्याच्याकडे श्रध्दा, दृढविश्वास, निस्वार्थ प्रेम आहे तो मानसिकरित्या मजबूत असतो. मानसिक मजबूती हीच मानवी जीवनाची खरी शक्ती असते. भक्तीमध्ये दोन प्रकार पडतात. एक भक्ती ही अत्यंत निस्वार्थ स्वरुपाची असते तर दुसरी स्वार्थापोटी केलेली असते. स्वार्थापोटीच्या भक्तीमध्ये कांही तरी भौतिक सुख मिळावे ही अपेक्षा असते. तर निस्वार्थ भक्तीमध्ये भौतिकतेची, धनसंपत्तीची कांहीही अपेक्षा नसते. जे भक्त दृढविश्वासू व निस्वार्थ असतात ते भक्त ब्रम्हपदालाही तुच्छ मानतात. अशा भक्तांचे श्रेष्ठत्व सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**परमेष्ठिपदों तुच्छ मानिती सर्वदों**

ब्रम्हपदाला तुच्छ मानणारा भक्त होणे अत्यंत अवघड आहे. असे असले तरीही अनेक संत या पदाला पोहचलेले आपण पहातो. असो, संसारात अडकलेल्या जीवासाठी ही एक केवळ कल्पनाच आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही. या कल्पनेचे वास्तवात रुपांतर होणे अत्यंत कठीण आहे. तीर्थक्षेत्राला जाणारा जीव रस्त्याने हजारोवेळा म्हणा की क्षणोक्षणाला म्हणा, मनातल्या मनात कांहीतरी सारखी मागणी करीत असतो. देवा, माते मला मूलबाळ होऊ दे, माझ्या मुलाचे मुलीचे लग्न होऊ दे, माझ्या मुलाला नोकरी लागू दे, फलाण्याचे वाटोळे होऊ दे, वगैरे वगैरे. देव-देवतांच्या नांवाचा जप करण्याऐवजी किंवा ज्ञानोबा-तुकाराम, भानुदास एकनाथ म्हणण्याऐवजी मनातल्या मनात मागणीची यादी वाचणाऱ्या भक्तांची संख्या खूप आहे. ज्याला देव-देवतांवर,संत महात्म्यांवर निस्वार्थ प्रेम करता येत नाही, तो सामान्य जीवमात्रावर निस्वार्थ प्रेम करीलच कसा? जो साक्षात भगवंताशी व्यवहार करतो म्हणजे तू मला.... दे, मग मी तुला.... देईन असे म्हणतो तो तुम्हा-आम्हाशी व्यवहार केल्याशिवाय राहील का? खऱ्या भक्तीमध्ये स्वार्थाला, व्यवहाराला अजिबात स्थान नसते. अशी निस्वार्थ भक्ती अत्यंत अवघड असली तरीही ज्याला खऱ्या अर्थाने ज्ञानोबा-तुकोबा, नाथ,समर्थ, चोखोबा, गोरा, सेना, दामाजी, सुदामा, रोहीदास, पुंडलिक, नामा कळले तो व्यक्ती अशी भक्ती करू शकेल. अशा भक्तीची अनुभूती घेण्याचे भाग्य आपणाला लाभावे, अशी संतश्री ज्ञानोबाराय, तुकोबाराय चरणी प्रार्थना. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार,
दि. २३ जुलै २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - आषाढ शु. नवमी
ऋतु - वर्षा ।
नक्षत्र- विशाखा (२५.४१)
योग - शुभ (१९.१९)
करण - तैतिल (२०.०५)
राहू काल : गुरुवार
दु. ०१.३० ते ०३.००

दिनविशेष :
१९२७: मुंबईत रेडिओ क्लबने देशातील पहिले रेडिओ प्रसारण सुरू केले, जे पुढे आकाशवाणी म्हणून ओळखले जाऊ लागले.
१९८६: हिपॅटायटीस-बी या आजारावरील लसीच्या वापरास अधिकृत सुरुवात झाली.
१९९९: अमेरिकेच्या केनेडी अवकाश केंद्रावरून 'चंद्रा' नावाची दुर्बिण अंतराळात प्रक्षेपित करण्यात आली.

# भारुड, कीर्तन, पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती

### वारीत साक्षरतेचा जागर; साडेतीनशे निरक्षर वारकऱ्यांची नोंदणी

> आध्यात्मिक वारीसोबत सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा हा उपक्रम निरक्षर नागरिकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे माध्यमिक शिक्षण विभागाचे सचिन जगताप यांनी सांगितले आहे.



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

आषाढी वारीत केवळ अध्यात्माचा संदेशच नव्हे, तर साक्षरतेचाही जागर घडत असून भारूड, कीर्तन, पथनाट्य, नृत्य आणि घोषणांच्या माध्यमातून साक्षरतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचविला जात आहे. 'गेले सांगून ज्ञाना-तुका, झाला उशीर तरी शिका तसेच अक्षर कळे, संकट टळे' अशा घोषणांमुळे वारकऱ्यांमध्ये साक्षरतेबाबत जागरूकता निर्माण होत आहे.

पालखी मार्गावरील साक्षरता अभियानाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. केंद्र शासनाच्या 'उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम' अंतर्गत संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यांसोबत सुरू असलेल्या 'साक्षरतेची वारी, पंढरीचे दारी' या उपक्रमातून आतापर्यंत सुमारे साडेतीनशे निरक्षर वारकऱ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. देशभरात २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या योजनेचा उद्देश १५ वर्षांवरील निरक्षर नागरिकांना साक्षर करणे हा आहे. महाराष्ट्रात शिक्षण संचालनालय (योजना), पुणे आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी), पुणे यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जात आहे.

वारीच्या पार्श्वभूमीवर देहू-पंढरपूर आणि आळंदी-पंढरपूर या दोन्ही पालखी मार्गांवर स्वतंत्र साक्षरता रथ कार्यरत आहेत. या रथाद्वारे वारकऱ्यांशी थेट संवाद साधून साक्षरतेचे महत्त्व पटवून दिले जात आहे. तसेच निरक्षर वारकऱ्यांची नोंदणी करून त्यांना नवभारत साक्षरता कार्यक्रमाशी जोडले जात आहे. शिक्षण संचालनालयाचे संचालक कृष्णकुमार पाटील व उपसंचालक डॉ. वंदना वाहूळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जात असून, राज्य समन्वयक संभाजीराव देशमुख यांच्यासह शिक्षण विभागाचे अधिकारी कार्यरत आहेत. पालखी मार्गावरील शाळांमधील शिक्षक, केंद्रप्रमुख आणि कर्मचारीही या अभियानात सहभागी झाले आहेत. अकलूज येथे शिक्षणाधिकारी जगताप यांनी साक्षरता रथाला भेट देत वारकऱ्यांशी संवाद साधला.

# महावीर हायस्कूलमध्ये सीड बॉल निर्मिती कार्यशाळा

### ७५० सीड बॉलची निर्मिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**



विकास नगर येथील श्री महावीर हायस्कूलमध्ये रोटरी ई-क्लब ऑफ सोलापूर व प्रशालेच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी सीड बॉल (बीज गोळे) निर्मिती कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर प्रशालेच्या मुख्याध्यापिका उज्वला पाटील यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

कार्यशाळेत रोटरी ई-क्लब ऑफ सोलापूरचे सन्माननीय सदस्य संदीप कुलकर्णी, विकास गोसावी आणि मनीष लोहे यांनी विद्यार्थ्यांना सीड बॉलचे महत्त्व, निर्मितीची पद्धत व पर्यावरण संवर्धनातील त्याचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रशालेतील सहशिक्षक एस.बी. बिडवई यांनी केले. सर्वांच्या सहभागातून ७५० सीड बॉलची निर्मिती करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

# झेडपीचे संतोष कुलकर्णी यांना पदोन्नती

> **रस्ते विकास महामंडळाच्या मुंबई विभागाचे अधीक्षक अभियंता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग क्रमांक दोनचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांची अखेर पदोन्नतीने बदली झाली आहे.



जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी हे गेली बरेच दिवस पदोन्नतीच्या प्रतीक्षेत होते. विशेष म्हणजे यापूर्वी त्यांची सोलापूरच्या बांधकाम विभागात बदली झाली होती. पण त्यांनी पुन्हा सोलापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे नियुक्ती मिळवली. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्यातील सात कार्यकारी अभियंत्यांना पदोन्नती दिली आहे. यामध्ये संतोष कुलकर्णी यांना पदोन्नतीने रस्ते विकास महामंडळाच्या मुंबई विभागाचे अधीक्षक अभियंता म्हणून नियुक्ती झाली आहे. याबद्दल सीईओ कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी अभिनंदन केले आहे.

# 'घबाडकुंड' बॉक्स ऑफिसवर यशस्वी : अभिनेते संदीप पाठक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

सोलापूरचा पुनर्वैभव आता पुन्हा एकदा पाहायला मिळणार आहे शिवाय सोलापुरातील दळणवळण व्यवस्था पाहून उद्योजक मोठ्या प्रमाणात येत आहेत हे ऐकून सोलापूर संदर्भात मला खूप समाधान वाटले असे प्रतिपादन प्रसिद्ध सिने नाटके अभिनेते संदीप पाठक यांनी केले.

सोलापुरातील कामाकरिता आलेले प्रसिद्ध सिने नाट्य अभिनेते संदीप पाठक यांनी बाळे येथील हॉटेल ली मोर ला भेट दिली. हॉटेलचे एमडी बाबासाहेब भवर, यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी शिवसेना नेते अतुल भवर, सावा संघटनेचे अध्यक्ष संतोष उदगिरी, चौडेश्वरी पतपेढीचे चेअरमन लक्ष्मीकांत उदगिरी आदी उपस्थित होते. पुढे बोलताना पाठक म्हणाले की त्यांचा नुकताच येऊन गेलेला घबाडकुंड हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर खूपच यशस्वी ठरला. भविष्यात आणखी चांगले सिनेमे ऑफर आहेत तर ते मी नक्कीच करणार आहे अशी त्यांनी मनीषा व्यक्त केली. प्रस्तावना करताना बाबासाहेब म्हणाले की पुढील पाच वर्षात सोलापुरात आयटी पार्क एमआयडीसी नवीन नवीन सुरू होणार आहेत तर हॉटेलची गरज भासणार आहे तर भविष्यात लिमोर फाईव्ह स्टार या दर्जामध्ये हॉटेल उभा करणार असल्याचे त्यांनी मत व्यक्त केले. आभार अमित भवर यांनी मानले.

# जि.प.मध्ये अजित पवार यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

जिल्हा परिषद, सोलापूरच्या अर्थ विभागाच्या वतीने शिवरत्न सभागृहात स्वर्गीय अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. अजित अनंतराव पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी त्यांच्या कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक आणि समाजाभिमुख कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला. त्यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून लोकहितासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास जिल्हा परिषद, सोलापूरच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, लेखाधिकारी श्रीकांत मीरगाळे, सहाय्यक प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, एस. एस. स्वामी उपस्थित होते.

सूत्रसंचालन महताब शेख यांनी केले.



# मुख्याध्यापक बागवान यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

जि.प. प्राथमिक शाळा, मुळेगाव येथे हाफीजा बागवान यांच्या सेवापूर्तीचा सन्मान सोहळा पार पडला. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती लाभली. जि.प. सदस्य नेताजी खंडागळे, उपसरपंच शिवराज जाधव, निलकंठ पाटील, अस्मिता बनसोडे, भारत कोळेकर, अंकुश काळे गुरुजी, गुरुबाळ सनके, राम बिराजदार, गायकवाड, शिरके, साहित्यिक इसफ अली, कवी खाजाभाईबागबान यांनी मनोगत व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी आयोजनासाठी जि.प. प्राथमिक शाळा, मुळेगाव येथील शिक्षकवृंद व सरपंच शिवराज जाधव यांनी सहकार्य केले.

# २४९ रोजंदारींना कायम करण्याचा प्रस्ताव सभागृहातच आला नसल्याने नाराजी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै -**

सोलापूर महानगरपालिकेतील २४९ रोजंदारी बदली कामगारांना सेवेत कायम करण्याचा प्रश्न पुन्हा एकदा अधांतरी राहिला आहे. प्रशासकीय हलगर्जीपणामुळे हा प्रस्ताव सभागृहातच न आल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे, असा आरोप करत कामगार नेते अशोक जानराव यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

लवकरच या प्रकरणी विशेष सभा बोलावून हा प्रश्न मार्गी लावण्यात येईल, असे आश्वासन सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी दिले आहे. महापौर विनायक कोंड्याल यांनी ६ जुलै रोजी झालेल्या सर्व कामगार संघटनांच्या बैठकीत २० जुलैच्या महापालिका सभेत कायम करण्याचा प्रस्ताव मंजूर केला जाईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, प्रशासकीय हलगर्जीपणामुळे हा प्रस्ताव सभागृहातच न आल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे, असा आरोप कामगार नेते अशोक जानराव यांनी केला. या पार्श्वभूमीवर जानराव यांनी महापौरांसह सभागृह नेते नरेंद्र काळे आणि स्थायी समिती अध्यक्षा रंजिता चाकोते यांची भेट घेऊन कामगारांच्या प्रलंबित प्रश्नावर सविस्तर चर्चा केली. नियमित बोर्डाची वाट न पाहता खास विशेष बोर्ड बोलावून २४९ कामगारांना सेवेत कायम करण्याचा ठराव मंजूर करून शासनाकडे तातडीने पाठवावा, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांनी विशेष सभा घेण्यासाठी निश्चित प्रयत्न करण्यात येतील, असे स्पष्ट केले. तर सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी २७ किंवा २८ जुलैदरम्यान विशेष सभा बोलावून कामगारांना कायम करण्याचा ठराव मंजूर करून शासनाकडे पाठविण्याचे आश्वासन दिल्याचे जानराव यांनी सांगितले. दरम्यान, पदाधिकाऱ्यांच्या आश्वासनावर सध्या विश्वास ठेवत असल्याचे सांगतानाच, ठरल्याप्रमाणे निर्णय न झाल्यास सोलापूर महानगरपालिकेत तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अशोक जानराव यांनी दिला आहे. यावेळी शेषराव शिरसट , लिंबराज जेठीथोर , सिद्धू सोनवणे आदी उपस्थित होते.

# ग्लोबल व्हिलेज संकुलात ३९० वृक्षांचे रोपण



**सोलापूर, दि. २२ जुलै-**

ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुल बोरामणी येथे संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व सचिवा संगीता शहा चनशेट्टी यांच्या ३९ व्या वैवाहिक वाढदिवसानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. या निमित्ताने शिक्षण संकुल परिसरात ३९० वृक्षांचे वृक्षारोपण करून हरित भविष्याचा संकल्प करण्यात आला.

वाढदिवसाचे औचित्य साधत संपूर्ण शिक्षण संकुलातील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सावलीची, फुलझाडे, औषधी आणि शोभेच्या वनस्पतींची लागवड केली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व सचिवा संगीता शहा चनशेट्टी यांचा शिक्षण संकुलातील सर्व विभागांच्या वतीने पुष्पगुच्छ, शाल, सन्मानचिन्ह प्रदान करून तसेच वाढदिवसाचा केक कापून यथोचित सत्कार करण्यात आला. उपस्थित सर्वांनी उभय दाम्पत्यांना ३९ व्या वैवाहिक वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा देत त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व पर्यावरणपूरक कार्याचा गौरव केला.



# ए. जी. पाटील कॉलेजच्या विद्यार्थिनींची डिजिटल किमया

### एआय प्रणालीद्वारे मधुमेहजन्य रेटिनोपॅथीचे निदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

मधुमेहामुळे होणाऱ्या डोळ्यांच्या गंभीर आजारांचे वेळेत निदान होऊन रुग्णांचे दृष्टीरक्षण व्हावे, यासाठी येथील ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थिनींनी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित मधुमेहजन्य रेटिनोपॅथी निदान प्रणाली विकसित केली आहे.

वैष्णवी डुकरे, अमृता लोहार, समृद्धी कांबळे आणि सानिका कुलकर्णी यांनी हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. या प्रणालीमध्ये रेटिनाच्या प्रतिमांचे विश्लेषण करून मधुमेहजन्य रेटिनोपॅथीची प्रारंभिक लक्षणे अचूकपणे ओळखण्याची क्षमता विकसित करण्यात आली आहे. त्यामुळे रोगाचे वेळेत निदान होऊन दृष्टीदोष व अंधत्वाचा धोका कमी होण्यास मदत होणार आहे. हा प्रकल्प विभागप्रमुख प्रा. एस. व्ही. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही व्ही पोतदार यांनी अभिनंदन केले.

# चन्नवीर चिट्टे मित्रपरिवारातर्फे शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मोफत वह्या व शैक्षणिक साहित्याचे वाटप महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आले. महानगरपालिकेच्या जय भवानी हायस्कूल येथे हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चौडेश्वरी सह. पतसंस्थेचे चेअरमन लक्ष्मीकांत उदगिरी आणि प्रमुख पाहुणे म्हणून भाजयुमोचे शहर अध्यक्ष विजय कुलते, भिमाशंकर जमादार, मयुर घुगे, बाळासाहेब होमकर, जगदीश यनगुंडी, सतिश पारेल्ली उपस्थित होते. जय भवानी हायस्कूलचे मुख्याध्यापक हरिदास झाडकर यांनी जय भवानी हायस्कूलच्या दुरावस्तेबाबत भाष्य करत शाळेच्या

दुरूस्तीबाबत महापौरांकडे मागणी केली असता महापौरांनी सकारात्मक प्रतिसाद देत तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पप्पू क्षीरसागर, कल्याण करजगी, भाजयुमोचे शहर सचिव श्रीनिवास दासरी, सद्दाम कोसगीकर, रवि शहापूरकर, सोमनाथ कलशेट्टी, करण हलसगी, श्रीनिवास संदुपटला, साईनाथ सज्जे, ओम जमादार, प्रथमेश ताटी, अनिल किरणगी, अभिषेक परबळकर आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सागर अतनुरे यांनी केले.

# चिखल होऊ नये यासाठी मुरुमीकरण करण्याचे निर्देश

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली वाखरी व पंढरपुरात सुविधांची पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जुलै-**

आषाढी वारीच्या अनुषंगाने देश-विदेशातील भाविक श्रीक्षेत्र पंढरपुरात येत आहेत. सध्या सर्वत्र पावसाचा जोर वाढला आहे. त्यामुळे पालखी मार्गांसह पंढरपुरात चिखल होऊ नये, पाणी साचू नये यासाठी मुरुमीकरण करण्यात यावे, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. दरम्यान, वाखरी व पंढरपूर येथे करण्यात आलेल्या विविध सुविधांची त्यांनी पाहणी केली.

दर्शन रांगेत भाविकांना त्रास होणार नाही यासाठी पाण्याची पुरेशी सोय करावी. मंदिर समितीच्या वतीने देण्यात येणारे मोफत जेवण योग्य पध्दतीने व प्रत्येक भाविकाला मिळेल अशा पध्दतीने वाटप करावे. आरोग्य पथकांमध्ये औषधांचा पुरेसा साठा ठेवण्यात यावे. रात्रीच्या वेळी वीज जाणार नाही, यासाठी वीज वितरण कंपनीशी समन्वय ठेवून काम करावे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता अमित निमकर, मुख्याधिकारी महेश रोकडे उपस्थित होते.

## महत्वाचे...



### जिल्हा परिषद शाळा जळोलीच्या विद्यार्थ्यांचा बालदिंडी सोहळा

**करकंब, दि. २२ जुलै-**

आषाढी वारीच्या निमित्ताने सोलापूर जिल्ह्यात सर्वत्र साधू,संतांच्या पालख्यांचे आगमन होत आहे. गावागावात विठूरायाच्या नामाचा गजर सगळीकडे दुमदुमत असताना जि.प. प्रा.शाळा जळोली येथे आषाढी वारीच्या निमित्ताने विद्यार्थी, विद्यार्थिनींनीच्या उपस्थितीत बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. त्या दिंडीत विठूराया, रुक्मिणी माता,तसेच अनेक संतांच्या वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांनी जळोली गावातून बालदिंडी काढली. यावेळी ज्ञानोबा तुकाराम,विठूनामाचा गजर करण्यात आला.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हनुमंत नरसाळे, उपाध्यक्षा साधना किर्ते, समाधान नरसाळे, सदस्य मनोज नरसाळे,पोपट नरसाळे,रामचंद्र माळी, तानाजी घोडके, पालक सहभागी झाले होते. हा बालदिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक जयवंत कापसे शिक्षिका देवकी कलढोणे-दुधाणे शिक्षक सिध्देश्वर लोंढे, कैलास नरसाळे,बाळासाहेब खांडेकर, नागनाथ गायकवाड,ज्ञानेश्वर दुधाणे यांनी अधिक परिश्रम घेत बालदिंडी यशस्वी केली.



### दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याचा मंगळवेढा काँग्रेसकडून निषेध

**मंगळवेढा, दि. २२ जुलै-**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या कथित लाठीहल्ल्याचा मंगळवेढा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. दामाजी चौक येथे सरकारविरोधी घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्यामार्फत शासनाला निवेदन देण्यात आले. या आंदोलनात तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, शहराध्यक्ष ॲड. राहुल घुले, राज्य सचिव ॲड. रविकिरण कोळेकर, ज्ञानेश्वर सुर्डीकर, राजकुमार मेतकुटे, इसाक शेख, रवींद्र शिवशरण, सत्तार इनामदार, बापूसाहेब अवघडे, सुनीता अवघडे, साधू कांबळे, संदीप पवार, राजू ठेंगील उपस्थित होते. संबंधित निवेदनावर या सर्व पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. काँग्रेसने केंद्र सरकारने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली आहे.



### डॉ. शुभदा पुंडे यांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**करमाळा, दि. २२ जुलै-**

साडे हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, ता. करमाळा येथे कै. डॉ. शुभदा वसंतराव पुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त डॉ. वसंतराव पुंडे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिका डॉ. अंजली श्रीवास्तव होत्या, तर प्रा. डॉ. गणेश करे-पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.माजी प्राचार्या नीलिमा पुंडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोकुळ बापू पाटील, बाजीराव माने, हेमंत पुंडे, बाळासाहेब ढवळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य सतीश ढवळे यांनी स्वागत व आयोजन केले. प्रा. सचिन गाडेकर यांनी सूत्रसंचालन केले, तर सचिन कुलकर्णी यांनी आभार मानले. नीलिमा पुंडे यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



### पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण उपक्रम राबवावे : कल्याणशेट्टी

**अक्कलकोट, दि. २२ जुलै-**

वातावरणातील वाढते तापमान, त्यातून प्रदूषण, जंगलतोड आणि हवामानातील बदल यामुळे पर्यावरणावर परिणाम होत आहेत. अशा गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी पर्यावरणाचे संतुलन अबाधित ठेवण्यासाठी वृक्षारोपण हाच सर्वात प्रभावी उपाय आहे. म्हणून लोकोपयोगी संस्थांनी वृक्षारोपणाचे उपक्रम राबवावेत असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले. बँक ऑफ बडोदा बँकेस ११९ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात बँकेमार्फत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहकार्याने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बँकेचे व्यवस्थापक नागनाथ नायर, क्रेडिट ऑफिसर विकास बिडवे उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले, आभार मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी मानले. यावेळी रा से यो कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, मल्लिनाथ स्वामी, मल्लिकार्जुन गायकवाड, गुरुशांत चराटे उपस्थित होते.

### नई जिंदगी येथे दोन दुचाकीची धडक; एक ठार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

दोन दुचाकीच्या धडकेत एक दुचाकी स्वार जागीच ठार झाल्याची घटना नई जिंदगी येथे मंगळवारी सायंकाळी पाच वाजता घडली.

सुलेमान वल्ली पटेल (वय ४५ वर्ष , रा. सिद्धेश्वर नगर भाग ५, नई जिंदगी सोलापूर ) असे त्या मयत दुचाकी स्वाराचे नाव आहे. ते मंगळवारी सायंकाळी नई जिंदगी येथील शोभादेवी नगर ते सिद्धेश्वर नगर असे दुचाकीने जात असताना वाटेत घडेवाली गल्ली येथे समोरून येणाऱ्या एका अन्य दुचाकीने त्याला कट मारली. त्यामुळे तो दुचाकी सह खाली पडून मार लागून बेशुद्ध पडला. त्याला सासरे हातीम शेख याने येथील शासकीय रुग्णालयात साडेसहा वाजता दाखल केले असता त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.



### वारकऱ्यांसाठी आरोग्य शिबीर; अन्नदान व निवासाचीही सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२२ जुलै-**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त सीसीएमपी होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशन, सोलापूर जिल्ह्याच्या वतीने वारकरी भाविकांसाठी मोफत आरोग्य तपासणी, होमिओपॅथिक उपचार व चरणसेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. अकलूज येथील डॉ. नितीन कुबेर यांच्या आयुष हॉस्पिटलमध्ये पार पडलेल्या या शिबिराला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा सेवाभावी उपक्रम सलग १५ व्या वर्षी राबविण्यात आला.

शिबिराचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते आबासाहेब वाघमारे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी विठ्ठलराव गायकवाड, वसंतराव गायकवाड, गिरीश एकतपुरे, संतोष इंगळे व ऋषिकेश गायकवाड उपस्थित होते. डॉ. बाळकृष्ण गायकवाड, डॉ. नितीन कुबेर, डॉ. अनिल बळते, डॉ. फैज सय्यद, डॉ. विजय निलटे, डॉ. गोफणे, डॉ. प्रफुल्ल गायकवाड, डॉ. हर्षवर्धन गायकवाड व डॉ. कोमल गायकवाड यांनी वारकऱ्यांना आरोग्य सेवा दिली. याचबरोबर द्वारकाधीश सेवाभावी संस्था, आनंदनगर यांच्या वतीने १९९० पासून सुरू असलेली मोफत भोजन व निवासाची सेवा यंदाही कायम ठेवण्यात आली. हजारो वारकऱ्यांना भोजन, विश्रांती व आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या. उपस्थित मान्यवरांनी दोन्ही संस्थांच्या समाजोपयोगी कार्याचे कौतुक करून ही सेवाभावी परंपरा भविष्यातही कायम ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली.

या सेवाभावी कार्यात वसंतराव गायकवाड, नामदेवराव गायकवाड, ऋतुराज गायकवाड, द्वारका गायकवाड, लता गायकवाड, सुमन गायकवाड, सारिका गायकवाड, विद्या गायकवाड,अमरसिंह गायकवाड, चारुलता यादव,दिलीप यादव यांनी योगदान दिले.

### दीपाली दातार, प्रदीप बडदे यांना मेघदूत पुरस्कार जाहीर





**तसा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ जुलै-**

बार्शी येथील कवी कालिदास मंडळाच्यावतीने दरवर्षी कालिदास दिनानिमित्त कालिदास महोत्सवाचे आयोजन केले जाते. राज्यस्तरीय मेघदूत पुरस्कार देऊन नवकवींचा सन्मान केला जातो. यावर्षीचे सन २०२५ -२६ चे मेघदूत पुरस्कार - 'तळ्यातले आकाश' दीपाली दातार, पुणे व 'माणुसकीची अंत्ययात्रा' प्रदीप बडदे नवी मुंबई या दोन कवींना जाहीर झाले आहेत. कालिदास मंडळाच्या आज झालेल्या बैठकीत अध्यक्ष आबासाहेब घावटे यांनी हे पुरस्कार जाहीर केले.

हा पुरस्कार वितरण सोहळा दि. २६ जुलै रोजी सायं. ५ वा मातृमंदिर, ढगे मळा, कुर्डूवाडी रोड, बार्शी या ठिकाणी संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी अरविंद जोशी ज्येष्ठ साहित्यिक सोलापूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते जुगलकिशोर तिवाडी हे आहेत. पुरस्कार विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मान चिन्ह, रोख रक्कम, शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, क्रीडा, इ. क्षेत्रात काम करणा-या संस्थांचा, व्यक्तींचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. यात मायबोली सांस्कृतिक मंडळ बार्शी, महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा बार्शी, भगवंत योग परिवार बार्शी, स्वप्निल पाठक व सान्वी पाठक बार्शी यांचा समावेश आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश गव्हाणे, सुमन चंद्रशेखर, अर्चना पोळ, प्रा. डॉ. रविराज फुरडे, रामचंद्र इकारे, मुकुंदराज कुलकर्णी, दत्ता गोसावी, शिवानंद चंद्रशेखर आदी परिश्रम घेत आहेत.

### आषाढी वारीत १० लाख सीडबॉल वाटपाचा माध्यमिक शिक्षण विभागाचा मानस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जुलै-**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातर्फे आषाढी वारीच्या निमित्ताने जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना एक लाख सीडबॉलचे वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा व्यापक संदेश जनमानसात पोहोचविणाऱ्या या अभिनव उपक्रमाला वारकरी, नागरिक आणि उपस्थित मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रत्येक सीडबॉलमध्ये विविध वृक्षांची बियाणे समाविष्ट करण्यात आली असून, वारकऱ्यांनी प्रवासादरम्यान मोकळ्या जागेत सीडबॉल टाकल्यास पावसाच्या पाण्यामुळे त्यातून वृक्ष उगवून हरित महाराष्ट्राच्या निर्मितीस हातभार लागणार आहे. वारीसारख्या लोकचळवळीच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश लाखो भाविकांपर्यंत पोहोचविण्याचा हा स्तुत्य उपक्रम ठरला आहे.



या उपक्रमाची संकल्पना व प्रेरणा माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या पर्यावरणप्रेमी व दूरदृष्टीपूर्ण विचारातून साकार झाली. पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंग्रजीत पवार, शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार यांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक शिक्षण विभागाने हा उपक्रम हाती घेतला. शिक्षक व संघटनांचे प्रतिनिधी २८ जुलैपर्यंत पालखी मार्ग, पंढरपुरातील चंद्रभागेच्या वाळवंट, मंदिर परिसर, रेल्वे स्थानक, बस स्थानक, ६५ एकर वारकरी निवास परिसरात फिरून वारकऱ्यांच्या हाती हे सिडबॉल देणार आहेत. सुमारे दहा लाख सीडबॉल या उपक्रमातून वाटप करण्यात येणार आहेत.

### बार्शीत 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत जनजागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ जुलै-**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मेडिकल विंगच्या माध्यमातून भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या सहकार्याने देशभर 'नशामुक्त भारत अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत दि. ६ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत देशव्यापी १० कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा महाअभियान आयोजित करण्यात आला आहे.

या अभियानाचे राष्ट्रीय स्तरावरील उद्घाटन दि. २ ऑगस्ट रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभेच्छा संदेशाने होणार आहे. त्यानंतर दि. ४ ऑगस्ट रोजी भारतातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये अभियानाचा शुभारंभ करण्यात येणार असून बार्शी सेवाकेंद्रामार्फत स्थानिक उद्घाटन दि. ७ ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. यानंतर बार्शी शहर व तालुक्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये, समाजसेवी संस्था, शासकीय कार्यालये, व्यापारी संघटना, औद्योगिक समूह तसेच विविध सामाजिक संघटनांमध्ये व्यसनमुक्ती जनजागृती व प्रतिज्ञा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी इच्छुक संस्थांनी ब्रह्माकुमारीज, राजयोग भवन, ओम शांती कॉलनी, शिवाजी नगर, बार्शी येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा किंवा मो. ८७६७५०७२८७ या क्रमांकावर संपर्क करून आपल्या सोयीची तारीख व वेळ निश्चित करावी, असेही ब्र. संगीतादिदी यांनी नमूद केले

### व्यंकटेश विद्यालयातर्फे शनिवारी अभंगवाणी कार्यक्रम

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

व्यंकटेश संगीत विद्यालयातर्फे आषाढी एकादशी निमित्त 'अभंगवाणी कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि २५ जुलै रोजी सकाळी ठीक ९ वाजता अँफी थिएटर (लोकमान्य टिळक सभागृह,हि. ने.वाचनालय, तळ मजला) पार्क चौक सोलापूर येथे व्यंकटेश संगीत विद्यालयातर्फे आषाढी एकादशी निमित्त अभंगवाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. ह्या कार्यक्रमात अभंग तसेच भक्तिगीतांचे सादरीकरण होणार आहे. कार्यक्रम वेळेवर चालू होईल.कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. असे आवाहन गुरुवर्य बाळासाहेब कुलकर्णी यांनी केले.



### कुसमोड जि.प. शाळेच्या विद्यार्थ्यांनी पालखीचे केले स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २२ जुलै-**

माळिशरस तालुक्यातील पिलीव येथून असंख्य पालख्या पंढरपूरला जातात. पंढरपूरला जात असताना वाटेवरच असणाऱ्या कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पवारवस्ती येथील मुलांनी दरवर्षी प्रमाणे पालखीमध्ये सहभागी होत अनोख्या पद्धतीने पालखीचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थी वारकऱ्यांसमवेत दंग होऊन झाले. पारंपारिक वेशभूषेत विद्यार्थी वारकरयासमवेत भजन कीर्तनात तल्लीन झाले. यामुळे याठिकाणी शाळेतील वातावरण भक्तीमय होऊन गेले. विद्यार्थ्यांसमवेत पालकही या पालखी सोहळ्यात सहभागी झाले. पालखीचे पुष्पहार घालून व पुष्पवृष्टी करुन स्वागत करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक सचिन गाटे व विजय कपने यांनी पालखीला खांदा दिला. यावेळी वर्षा लवटे, लता धायगुडे, नगीना कोकरे, बानु कोकरे, अंकिता कपने, पूनम पवार, सारीका पवार, प्रियांका शेजाळ, हर्षाराणी मदने, मयुरी लिगाडे, संगीता पवार, रेखा गाटे, सावित्री पवार उपस्थित होते.

# ३४२ अधिकारी व साडे तीन हजार पोलिस अंमलदारांची नेमणूक

## सहाय्यक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे यांची माहिती; वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलिस यंत्रणा सज्ज

### १० ठिकाणी होडी नियंत्रक पथकाची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जुलै-**

आषाढी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी दिली.

आषाढी वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतूक नियत्रंणासाठी ३४२ अधिकारी व ३ हजार ५२८ अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये एक पोलीस अधिक्षक, चार अप्पर पोलीस अधिक्षक, २२ पोलीस उपअधिक्षक, ५३ पोलीस निरिक्षिक, २६३ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ३ हजार ५२८ पोलीस अंमलदार व ३ हजार ११० होमगार्ड तसेच ०७ एसआरपीएफ कंपनी, १० बीडीएस पथके, आरसीपी एक पथक , क्युआरटी तीन पथके, आपत्कालिन परिस्थिती हातळण्यासाठी प्रशिक्षित १६ कार्ट पथके नियुक्त करण्यात आली आहेत. तसेच जलप्रवासी वाहतुकीवर नियंत्रण राहण्यासाठी जलसंपदा विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने १० ठिकाणी पथके स्थापन करण्यात आली आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, ६५ एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यांसह आदी ठिकाणी ४६ वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉडची स्थापन करण्यात आली असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच सुमारे ३५२ सीसीटीव्ही कॅमेरॅच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट तसेच अंबाबाई पटांगण आदी ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतूक शहराबाहेरुन वळिवण्यात आली आहे. तसेच वाहतूक नियमनासाठी १३ ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खासगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १७ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे.

# बोंडलेत रंगला संतांच्या पालखी भेटीचा सोहळा



तोंडले बोंडले टप्प्यावर श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज यांचे पालखी सोहळे एका मार्गावर आले.



तोंडले येथे संत सोपान काका व संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांखा गुरुभेट सोहळा रंगला. ( छायाचित्रे : केवल तिवारी)



उघडेवाडी येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात ठाकूरबुवा मंदिर येथे रिंगण सोहळ्यानंतर उडीदचा डाव रंगला



तोंडले- बोंडले येथे सकाळी वारकरी पावसात न्याहरी घेतली.



तोंडले - बोंडले येथून न्याहारीनंतर पावसातच लाडक्या विठुरायाच्या दर्शनास आतूर वारकऱ्यांनी पंढरपूरकडे प्रस्थान केले.




तोंडले येथे संत ज्ञानेश्वरांच्या पालखीचे स्वागत

# ४० लाख गोळ्या, ३ लाख सिरप बाटल्या उपलब्ध

## वारीत आरोग्यसेवा सज्ज; औषधांचा भक्कम साठा

## ताप, सर्दी, निर्जलीकरणावर तातडीची उपचार व्यवस्था

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जुलै-**

आषाढी वारीदरम्यान लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने व्यापक वैद्यकीय यंत्रणा सज्ज केली आहे. भाविकांसाठी तब्बल ४० लाख विविध प्रकारच्या गोळ्या आणि लहान मुलांसाठी ३ लाख सिरप बाटल्या उपलब्ध करून दिल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी सांगितले.

गर्दी, पायी प्रवास आणि बदलत्या हवामानामुळे उद्भवणाऱ्या आजारांवर तातडीने उपचार करता यावेत, यासाठी कोट्यवधी रुपयांच्या औषधसाठ्याची उपलब्धता केली आहे. वारीत ताप, अंगदुखी, सर्दी-खोकला, अतिसार आणि निर्जलीकरणाच्या तक्रारी सर्वाधिक आढळतात. ही बाब लक्षात घेऊन ६५ ते ७० लाख वेदनाशामक गोळ्या, १५ लाख अँटीबायोटिक्स, तसेच ५ ते ६ लाख ओ.आर.एस. पाकिटांचा साठा करण्यात आला



आहे. प्रत्येक वैद्यकीय पथकाकडे आवश्यक औषधे आणि उपचार साहित्य उपलब्ध राहील, याचेही नियोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, लहान मुलांसाठी आवश्यक औषधांचा स्वतंत्र साठा ठेवला आहे. सिरप बाटल्यांची स्वतंत्र व्यवस्था आहे. वारी मार्गावरील आरोग्य केंद्रे, वैद्यकीय पथके आणि रुग्णवाहिका यांनाही औषधांचा पुरेसा पुरवठा दिला आहे.

**वारीतील आरोग्यसज्जता एका नजरेत**

- ४० लाख विविध प्रकारच्या गोळ्या उपलब्ध
- ३ लाख लहान मुलांसाठी सिरप बाटल्या
- ६५ ते ७० लाख वेदनाशामक गोळ्यांचा साठा
- १५ लाख अँटीबायोटिक्स उपलब्ध
- ५ ते ६ लाख ओ.आर.एस. पाकिटांची व्यवस्था
- वारी मार्गावरील वैद्यकीय पथके व आरोग्य केंद्रे पूर्ण क्षमतेने सज्ज

# श्री क्षेत्र भगवानगड पालखीचे मोडनिंबकरांकडून स्वागत



**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २२ जुलै-**

मोडनिंब (ता. माढा) येथे श्री क्षेत्र भगवानगड पायी दिंडी पालखी सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. पारंपरिक अश्वपूजन करून पुष्पहार अर्पण करून पालखीचे स्वागत केले.

गावातील दत्त चौकात पालखी दाखल होताच फुलांची उधळण, टाळ-मृदंगाचा गजर, राम कृष्ण हरीच्या अखंड जयघोषासह फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. त्यानंतर पालखीची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत मोठ्या संख्येने वारकरी, भाविक आणि ग्रामस्थ सहभागी झाले होते. दिंड्या शहरात दाखल होताच संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. स्टेशन रोड, स्वामी समर्थ चौक तसेच शहरातील विविध ठिकाणी वारकरी व भाविकांसाठी अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

वारकऱ्यांच्या सेवेसाठी विविध मंडळे, संस्था आणि नागरिकांनी पुढाकार घेतल्याने सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले. यावेळी ग्रामस्थ, वारकरी, सर्वपक्षीय पदाधिकारी व नागरिकांनी पालखीचे पुष्पवृष्टी करून स्वागत केले.

# श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यात शिवसेनेकडून औषधांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २२ जुलै-**

शिवसेना शिंदे गटातर्फे आषाढी वारीनिमित्त श्री संत निवृत्तीनाथ म हाराज पालखी सोहळ्यात सहभागी हजारो वारकऱ्यांना मोफत गोळ्या-औषधांचे वाटप करण्यात आले. सुयश कर्चे, शिवसेना जिल्हाप्रमुख (ओबीसी), सोलापूर यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबवला.

वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हीच खरी विठ्ठल सेवा मानून किरकोळ आजारांवरील आवश्यक औषधांचे वाटप करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमाला वारकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी बोलताना सुयश कर्चे यांनी सांगितले की, 'वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा आहे. समाजहित आणि जनसेवा ही शिवसेनेची परंपरा असून अशा सेवाभावी उपक्रमांद्वारे समाजाप्रती आपली बांधिलकी जपण्याचा प्रयत्न आम्ही सातत्याने करत राहू.' उपक्रमात शिवसेनेचे युवासेना माजी तालुकाध्यक्ष नवनाथ गुंड, प्रवक्ते राहुल जाधव, माधव सूर्यवंशी युवासेना तालुका सचिव, ज्योतीराम काळे युवासेना, श्रीकृष्ण शिंदे युवासेना, श्रीकांत गोसावी युवासेना जिल्हाउपाध्यक्ष, मयूर मुटेकर, रमेश लागस उपस्थित होते. एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावे अशी घोषणाही यावेळी देण्यात आली.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या सूचनेनूसार शिवसेना पक्षातर्फे हा वारकऱ्यांच्या सेवेसाठी हा उपक्रम राबवला. तसेच वारकऱ्यांना सुखरुप वारीच्या शुभेच्छाही दिल्या.
- सुयश कर्चे, शिवसेना जिल्हाप्रमुख (ओबीसी), सोलापूर

# 'इंटिग्रेटेड कंट्रोल अँड कमांड ऑफिस'ची स्थापना

**उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांची कमांड ऑफिसर म्हणून नियुक्ती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जुलै-**

आषाढी यात्रा शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर यांनी 'इंटिग्रेटेड कंट्रोल अँड कमांड ऑफिस' स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांची कमांड ऑफिसर म्हणून नियुक्ती केली आहे. आदेशानुसार, 'इंटिग्रेटेड कंट्रोल अँड कमांड ऑफिस' मध्ये जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांनी आजपासून ते दि. २९ जुलैपर्यंत आपल्या विभागाच्या आवश्यक त्या सर्व माहितीसह पूर्ण वेळ उपस्थित राहण्याचे स्पष्ट केले आहे. वरील आदेशाचे उल्लंघन केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ५५ व ५६ अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात म्हटले आहे.

# कोळी बांधवांची होड्यांच्या डागडुजीची लगबग सुरु

## वारकरी भाविकांना होडीतून चंद्रभागेची सफर घडविण्याची तयारी

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२२ जुलै-**

आषाढी एकादशीच्या सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना होडीतून चंद्रभागेची सफर घडवून आणण्यासाठी येथील कोळी बांधवांची आपल्या होड्या सज्ज करण्यासाठी लगबग सुरु आहे. येथील कोळी समाजातील सुमारे दोनशे ते अडीचशे कुटुंबांचा उदरनिर्वाह आजही होडी व्यवसायावरच अवलंबून आहे.

आषाढी,कार्तिकी तसेच इतर यात्रांच्या काळात येथे लाखो भाविक दाखल होत असतात. विठ्ठलाचे दर्शन घेवून चंद्रभागेची होडीतून सफर करण्याचा आनंदही ते घेत असतात. ते होडीतून चंद्रभागेच्या पात्रात असणाऱ्या विष्णूपद तसेच गोपाळपूरपर्यंत जाणे पसंत करतात.

येथील कोळी बांधवांचाही उदरनिर्वाह मोठ्या प्रमाणात यावरच अवलंबून आहे. यात्रांच्या काळात चंद्रभागेला पुरेशा प्रमाणात पाणी असेल तरच या कोळी बांधवांना होडी व्यवसायामधून चार पैसे मिळतात. होडीतून चंद्रभागेच्या विष्णूपद मंदिरास जाण्यासाठी एका भाविकाला पन्नास ते



साठ रुपये द्यावे लागतात. साधारणपणे होडी व्यवसाय करणारी सुमारे दोनशे ते अडीचशे कुटुंबे आजही येथे कार्यरत आहेत. त्यामुळे यात्रांच्या काळात चार पैसे मिळावेत यासाठी अगोदर पासूनच कोळी बांधवांची होडीच्या डागडुजी करण्याची कामे सुरु असतात.

काही कोळी बांधव खास आषाढी यात्रेच्या अगोदर आपल्या जुन्या, मोडकळीस आलेल्या होड्या मोडून नवीन होड्या देखील तयार करतात.

यात्रांच्या काळात जुन्या होड्या पेक्षा नवीन होड्यांमधून चंद्रभागेची सफर करण्यास वारकरी भाविकांची जास्त पसंती असते. वारकरी, भाविक कुटुंबियांसमवेत होडीतून सफर करीत असताना अगदी नदीपात्रात फोटोसेशन देखील करीत असतात. काही हौशी भाविक होड्या चालविणाऱ्या कोळी बांधवांच्या जागेवर बसून स्वत: होड्या चालवण्याचे धाडस करुन त्याचे फोटो विविध सोशल मिडियांवरही टाकत असतात. त्यांना या सर्व आनंदाचा लाभ घडवून देण्यात कोळी बांधवांनाही आनंद व रोजगार प्राप्त होतो.

**आकर्षक घोड्यांचा मुखवटा**

होडीच्या पुढील बाजूस घोड्याच्या मुखवट्यामुळे होड्यांच्या रुबाबदारपणात चांगलीच भर पडत असते. होडीच्या लांबीवर घोड्याच्या मुखवट्याची उंची अवलंबून असते. होड्यांच्या घोड्याचे मुखवटे तयार करण्यासाठी देखील सागवान लाकडाचाच वापर केला जातो. सागवानावर केलेली कलाकुसर अधिक ठळकपणे दिसत असल्याने घोड्यांच्या मुखवट्यासाठी सागवान लाकडाचा खास वापर केला जातो.

**नवीन होडीसाठी एक ते दीड लाख खर्च**

साधारणपणे एक नवीन होडी तयार करण्यासाठी कमीत कमी एक ते दीड लाखाच्या आसपास खर्च येतो. पाण्यात जास्त कालावधीत टिकून राहण्यासाठी दर्जेदार सागवान लाकडाच्या फळ्यांचा तसेच लाकडांचा होडी तयार करण्यासाठी उपयोग केला जातो. जुन्या सागवान लाकडापासून फळ्या तसेच लाकूड काढून टिकाऊ होड्या बनविल्या जातात. होड्यांची बांधणी करण्यासाठी लोखंडी खिळ्या ऐवजी तांब्याच्या किंवा पितळी खिळ्यांचा वापर प्रामुख्याने केला जातो. लोखंडी खिळ्यांना लवकर गंज लागतो. त्यामुळे तांबे किंवा पितळी खिळे महाग जरी असले तरी त्यांचा खास होड्या तयार करण्यासाठी वापर केला जातो. एक होडी तयार करण्यासाठी सलग काम केले तर महिना ते पंधरा दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे सध्या येथील कोळी बांधवांची जुन्या होड्यांच्या डागडुजी बरोबरच नवीन होड्यांची कामे पुर्ण करण्याची लगबग दिसून येत आहे.